नवीन पेन्शन योजना रद्द करून, जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ सुनिश्चित करण्यासाठी समन्वय समितीच्या वतीने अभ्यास समितीस सादर केलेला प्रस्ताव.
पान ४ वर

# कर्मचारी टाइम्स

• मुंबई, १, जून २०२३ • वर्ष - १, अंक ५ • पाने ८ • किंमत १० रुपये फक्त.
शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त.
Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India.
www.karmacharitimes.com • संपादक - श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण Email - karmacharitimes@gmail.com

'कर्मचारी टाइम्स'
ALL-IN-1 QR CODE
वर्गणीदार व्हा...

## केंद्राप्रमाणे राज्य कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे!

मुंबई : राज्य कर्मचाऱ्यांकडून सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे ही मागणी सातत्याने करण्यात येत असून त्याबद्दल राज्याचे हित ध्यानात घेऊन केंद्राप्रमाणेच हा निर्णय लागू करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणेबाबत समन्वय समितीच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी या मुद्यावर सकारात्मक भूमिका दर्शविल्यामुळे आशा पल्लवित झाल्या आहेत. दर्शविली आहे. तज्ज्ञांच्या मते जुनी पेन्शन योजना लागू केल्यास, सेवानिवृत्तीचे वय वाढविणे राज्य सरकारच्या हिताचे असून, यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीमध्ये दरवर्षी ४ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. ज्यामुळे कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ घेण्यासाठी आणखीन २ वर्षे सेवेत रहावे लागेल. म्हणजेच सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे केल्यास राज्य सरकारचा व कर्मचाऱ्यांचाही फायदा होणार असल्याची बाब पुढे आली आहे.

शासनाकडून जुन्या पेन्शनवर गठित समितीतीच्या पुढील बैठकांमध्ये यावर सकारात्मक निर्णय होऊ शकतो. जुनी पेन्शन लागू करावयाची असल्यास, सेवानिवृत्तीचे वय वाढविणे देखील राज्य सरकारच्या हिताचे आहे, असे मत व्यक्त होत आहे.



महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवपदी मनोज सौनिक यांची निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण. सोबत संघटनेचे नवनियुक्त सचिव बाबाराम कदम, दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष रमेश लवांडे, कर्मचारी टाइम्सचे संचालक पराग आडिवरेकर. शासकीय सेवेतील कर्मचारी वर्गाबद्दल नेहमीच सकारात्मक असलेले मनोज सौनिक हे त्यांच्या कारकिर्दीत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी निश्चितपणे भरीव कार्य करतील, असा विश्वास भाऊसाहेब पठाण यांनी यावेळी व्यक्त केला.

## जुन्या पेन्शन योजनेसाठी समिती सकारात्मक ?

मुंबई : राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली व जुनी निवृत्तीवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली आहे. यावेळी बैठकांमध्ये झालेल्या सादरीकरणात कर्मचारी समन्वय समितीच्या मतांची सकारात्मक दखल घेण्यात आली आहे. त्यामुळे ही योजना लागू करण्यास समिती सकारात्मक असल्याची चर्चा आहे.

यापूर्वी गेल्या महिन्यात झालेल्या चर्चेतदेखील असाच प्रत्यय आला होता. या समितीसोबत बैठकीची दुसरी फेरी मंत्रालय येथे पार पडली. या बैठकीत समन्वय समितीच्या वतीने सुयोग्य असा प्रस्ताव समितीस सादर करण्यात आला. समिती निमंत्रक विश्वास काटकर यांनी यावेळी प्रस्तावाबाबत समिती सदस्यांना विस्तृत माहिती दिली. समिती अध्यक्ष सुबोधकुमार यांनी दूरश्राव्य पद्धतीने अमेरिकेतून कामकाजात सहभाग घेतला.

जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी राज्य सरकारी कर्मचारी १४ मार्च ते २० मार्च या सात दिवसांच्या कालावधीत संपावर गेले होते. या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी झालेल्या चर्चेत जुन्या योजनेप्रमाणेच आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याचे धोरण तत्त्व म्हणून लेखी मान्यता दिल्यानंतरच बेमुदत संप आंदोलन स्थगित करण्यात आले होते. या सर्व बाबींवर विचार करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीसोबत बैठकीची दुसरी फेरी मंत्रालयात पार पडली. विश्वास काटकर यांनी समन्वय समितीच्या वतीने बाजू मांडताना शासनाने दिलेल्या लेखी आश्वासनाची आठवण करून त्यानुसारच जुनी पेन्शन योजना शासनास देणे कसे शक्य आहे याची तपशीलवार माहिती देताना विनाअंशदान जुन्या निवृत्ती वेतना समान निवृत्ती वेतनाचा आग्रह धरला.

समन्वय समितीच्या मुकाणू समिती सदस्यांसह इतर संघटना सदस्यांनी सभेत उत्साहाने सहभाग घेतला. बैठकीला सुबोधकुमार श्रीवास्तव, के. पी. बक्षी व वैभव राजेघाटगे यांनी, समन्वय समितीच्या वतीने विश्वास काटकर, अशोक दगडे, शिवाजी खांडेकर, संतोष पवार, भाऊसाहेब पठाण आदी मान्यवरांनी सहभाग घेतला.

समन्वय समितीने शासनास सादर केलेला प्रस्ताव पान ४ वर सविस्तरपणे

## भाऊसाहेब पठाण यांच्या पाठपुराव्याला यश; चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा मार्ग मोकळा

मुंबई : गेली अनेक वर्षे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत अखेर राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्या केलेल्या प्रयत्नांमुळे यश मिळाले आहे. याबाबतची प्रसिद्धी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - अ मध्ये दिनांक २७ एप्रिल २०२३ अन्वये करण्यात आली आहे.

कनिष्ठ सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या आणि त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा असणाऱ्या गट ड मधील पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, पात्रतेच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे ही पदोन्नती करण्यात येणार आहे. त्याशिवाय ज्यांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मंडळाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेद्वारे निवड झाली आहे आणि सर्वसाधारण प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत, ज्यांचे वय १९ वर्षापेक्षा कमी नाही आणि ३८ वर्षापेक्षा जास्त नाही तसेच मागास प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत ज्यांचे वय १९ ते ४३ वर्षे दरम्यान आहे, अशांना यासाठी संधी मिळणार आहे. शासनाच्या आदेशानुसार अनुकंपा तत्वावरील व्यक्तींना यात संधी दिली जाणार आहे.

वाहन चालक गट क च्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या, ज्यांनी कनिष्ठ सहाय्यक पदास परीक्षा उत्तीर्ण केली आहे, अशांनाही या पदावर नियुक्ती दिली जाणार आहे. जे उमेदवार गट ड वाहनचालकाचे पद धारण करत आहेत, ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे, त्यांना पदोन्नती दिली जाणार आहे. राज्य सरकारी गट ड (चातुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी सातत्याने यासाठी प्रयत्न केले होते.

### तीन लाख रोजगार निर्मितीचे करार

मुंबई : स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करताना राज्यात ७५ हजार नोकऱ्या देण्याचे राज्य सरकारचे उद्दिष्ट आहे. बार्टी, सारथी आणि महाज्योती या माध्यमातून शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. १ लाख २५ हजार रोजगार उपलब्ध होण्यासाठी विविध संस्थांसोबत करार करण्यात आले आहेत. आगामी काळात तीन लाख रोजगार निर्माण करण्याचे सरकारचे ध्येय आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे छत्रपती शाहू महाराज करिअर मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते.

## खासगी क्षेत्रातील तज्ज्ञांची नियुक्ती करणार
## संचालक, उपसचिव कंत्राटी पद्धतीने भरणार!

नवी दिल्ली : खासगी क्षेत्रातील तज्ज्ञांची सरकारी विभागांमधील सहसचिव, संचालक आणि उपसचिव यांसारख्या महत्त्वाच्या पदांवर थेट कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. जून २०१८ मध्ये सरकारी विभागांमध्ये पहिल्यांदाच अशा प्रकारची भरती करण्यात आली होती. यानंतर आता अशा प्रकारच्या भरतीची ही तिसरी वेळ असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. सरकारने खासगी क्षेत्रातील तज्ज्ञांना थेट सरकारी क्षेत्रात आणण्यासाठी 'लॅटरल एंट्री' नामक पद्धत सुरू केली आहे.

कार्मिक व प्रशिक्षण विभागाने केंद्रीय लोक सेवा आयोग (यूपीएससी) ला १२ सरकारी विभाग व मंत्रालयांमध्ये 'लॅटरल एंट्री' द्वारे भरती प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले आहेत. लॅटरल एंट्री अर्थात मध्यम स्तरीय प्रवेश योजनेद्वारे सरकारी विभागांमध्ये थेट खासगी क्षेत्रातील विशेष तज्ज्ञांची भरती करणे असा आहे.

सामान्यत: सरकारी विभाग व मंत्रालयातील संयुक्त सचिव, संचालक आणि उपसचिवांची पदे वर्ग 'अ'च्या अधिकाऱ्यांकडून सांभाळली जातात; पण आता १२ सरकारी विभाग व मंत्रालयातील अशा पदांवर खासगी तज्ज्ञांची नियुक्ती करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यात कृषी मंत्रालय, नागरी विमान वाहतूक मंत्रालय, रसायने व पेट्रोकेमिकल्स विभाग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, अन्न व सार्वजनिक वितरण विभाग आणि अवजड उद्योग मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग, निवास व शहरी व्यवहार मंत्रालय, कायदा विभाग, उद्योग व आंतरिक उद्योग संवर्धन विभाग आणि शालेय शिक्षण व साक्षरता विभाग यांचा समावेश करण्यात आला आहे.

## रखडलेल्या २० टक्के शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : कोरोना महामारीमुळे गेले तीन वर्षे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना ब्रेक लागला होता. पण आता २० टक्के कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत आहेत.

महाराष्ट्र शासन बदली अधिनियम २००५ नुसार ३ वर्षे सेवा पूर्ण केलेला कर्मचारी बदलीस पात्र ठरतो. विनंती बदल्याही मोठ्या प्रमाणात केल्या जातात. सर्वसाधारणपणे एप्रिल ते मे महिन्यात या बदल्या होतात. यंदा मोठ्या संख्येने बदल्या होत असून मंत्रालय स्तरावर बदल्यांची मोठी धामधूम सुरू आहे. अनेक अधिकारी-कर्मचारी सध्या मंत्रालयात यासाठी धावपळ करताना दिसत आहेत. सन २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेत आले. पण त्यानंतर मार्च २०२० मध्ये कोरोना महामारी सुरू झाली. त्यामुळे २०२० आणि २०२१ या वर्षांत राज्यात कोरोना संसर्गामुळे बदल्या न करण्याचे धोरण तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राबवले होते. सामान्य प्रशासनाकडून तसे आदेश देण्यात आले होते. मागच्या वर्षी बदल्यांवरची स्थगिती उठली, पण बदल्यांचे प्रमाण अत्यल्प राहिले. पुढे जून-जुलैमध्ये राज्यात सत्तांतर झाले. सत्ताबदल झाल्याने आणि आता सरकारचे शेवटचे वर्ष असल्याने प्रशासन दरबारी मोठ्या प्रमाणात बदल्या करण्याचे घाटत आहेत. आता बदली न झाल्यास पुढे दोन वर्षे आहे त्या जागीच काम करावे लागणार आहे. त्यामुळे बदलीस इच्छुक कर्मचारी 'कामाला' लागले आहेत. महसूल, गृह विभागात बदलीसाठी चकरा मारणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. संबंधित विभागाच्या खातेप्रमुखाला बदल्यांचे अधिकार आहेत. महाराष्ट्र शासन बदली अधिनियम २००५ नुसार ३ वर्षे सेवा पूर्ण केलेला कर्मचारी बदलीस पात्र ठरतो. यंदा मोठ्या संख्येने बदल्या होत असून मंत्रालय स्तरावर सध्या तरी बदल्यांची मोठी धावपळ चालू आहे.

### शासकीय कार्यालयात शिवीगाळ, धक्काबुक्की

औरंगाबाद : औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाचे मुख्य अभियंता इंजि. दिलीप उकीर्डे व संजयकुमार भोसले यांना शासकीय कार्यालयात १८ मे, २०२३ रोजी जयकिशन कांबळे याने शिवीगाळ व धक्काबुक्की केली, तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या घटनेचा महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने निषेध केला असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कारवाईची मागणी केली आहे.

## वेतन आयोगाचा चौथा हप्ता जूनच्या वेतनासोबत

मुंबई : जुलै २०२२ मध्ये देय असलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा चौथा हप्ता महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना जून २०२३ च्या वेतनासोबत दिला जाणार आहे. तसा निर्णय राज्य शासनाच्या वतीने निर्गमित करण्यात आला असल्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

शासनाच्या या निर्णयाचे स्वागत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर तसेच राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी केले आहे.

जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत समन्वय समितीची बैठक झाली. जुन्या पेन्शन योजनेबरोबर सातव्या वेतन आयोगाचा चौथा हप्ता अद्यापही मिळाला नसल्याची बाब यावेळी संघटनेच्या उपस्थित सदस्यांनी यावेळी त्यांच्या ध्यानात आणून दिली. अखेर याची दखल घेत २४ मे २०२३ रोजी वेतन आयोगाच्या थकबाकीचा चौथा हप्ता जून २०२३ च्या वेतनासोबत देण्यात यावा, असा आदेश शासनाने निर्गमित केला असून त्याचे कर्मचारी संघटनांनी स्वागत केले आहे.

### महाराष्ट्रात लवकरच ७ कामगार रुग्णालय

मुंबई : महाराष्ट्रात कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या म्हणजेच ईएसआयसीच्या माध्यमातून एमआयडीसीच्या जागेत सात रुग्णालयांची उभारणी करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे कामगारांसाठी १००० पेक्षा जास्त खाटांची व्यवस्था होऊ शकेल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

केंद्रीय श्रम मंत्री भूपेंद्र यादव मुंबईत होते. त्यांच्याबरोबर बैठकीत एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या जागेत ईएसआयसी माध्यमातून सात रुग्णालय उभारण्याचा निर्णय झाला. यासाठी राज्य शासनाने जागा उपलब्ध करायची आहे. यापैकी तीन जागा निश्चित करण्यात आल्या. उरलेल्या चार जागा एक महिन्याच्या आत निश्चित केल्या जातील, असे ते म्हणाले.

## कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर राज्य सरकार संवेदनशील : किरण पावसकर



कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर कामगार नेते किरण पावसकर यांनी 'कर्मचारी टाइम्स' ला दिलेल्या मुलाखतीत अनेक मुद्यांचा उहापोह केला. मुलाखतकार : अनुज केसरकर

प्रश्न - सरकारच्या कामगार धोरणाबद्दल आपले मत काय आहे ?

उत्तर - सध्याच्या सरकारचे कामगारविषयी धोरण उत्तम आहे. असंघटित कामगारांनाही सोयी-सुविधा कशा मिळतील, याचा प्रयत्न सुरु केला आहे. याविषयी मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेतली होती. आमच्या सचिव सिंघल मॅडम यांनी एक मसुदा तयार केला आहे. जसा एखादा कामगार एखाद्या कंपनीत काम करतोय, त्यानुसार त्यांना फायदे मिळावेत, असे धोरण बनवण्याचे काम सुरु झाले आहे. त्यांनादेखील वैद्यकीय सुविधा आणि विमा योजना मिळाव्यात, या दृष्टीने प्रयत्न होत आहेत.

प्रश्न - कामगार चळवळीला सध्या ग्रहण लागले आहे असे तुम्हाला वाटते का?

उत्तर - कामगार चळवळीला ग्रहण लागलेलं नाही, पण कामगार चळवळीत थोडी शिथिलता यासाठी आली आहे की, सक्षम कामगार नेत्यांची कमतरता आहे. आपण कामगारांसाठी त्यांच्याकडे जाणं आणि कामगारांचे अनेक प्रश्न सोडवणं हे गरजेचे आहे. काही कामगार स्वत: नेते आहेत आणि स्वत:ते कॉन्ट्रॅक्टर पण आहेत, त्यांची कंपनी पण आहे तेच आमदार आणि नेतृत्व या कामगारांच करणार. तुम्ही पैसा कमवताय मग तुम्ही कामगारांना न्याय काय देणार? कामगार नेत्यांनी स्वतःची प्रतिमा स्वच्छ ठेवली तर चळवळ नक्कीच उभारता येईल.

प्रश्न - इथला कामगार वर्ग राजकीय पक्षांच्या दावणीला बांधला गेला असल्याचे सध्याचे जे चित्र दिसते आहे, त्याविषयी काय वाटते ?

उत्तर - होय, उदाहरणच द्यायचे झाले तर राज्य सरकारी गट (ड) चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांना त्यासाठी 'कर्मचारी टाइम्स' वृत्तपत्र सुरु करावे लागले. कर्मचाऱ्यांना दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिंदे आणि फडणवीस सरकार सत्तेत आल्यावर विरोधक आंदोलने करत असल्याचे दिसून येते. यापूर्वीही कामगारांना राजकारणी लोकांच्या संघटनांनी रस्त्यावर आणले आहे. यापुढे कामगारांनी आपला नेता कोण आणि आपल्याला नेतृत्व कोणाचं पाहिजे हे ओळखावं त्याशिवाय त्यांच्या चळवळीला आणि भविष्याला अर्थ राहणार नाही.

प्रश्न - कामगार नेता म्हणून शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे आपण कसे पाहता, व आपली कामगारविषयात पुढील भूमिका काय असेल ?

उत्तर - कामगार विषयक पुढील भूमिका ही माझी नक्कीच सकारात्मक राहील. पंतप्रधान मोदी यांनी असंघटित कामगारांना आरोग्याच्या संदर्भात विमा योजना असावी, त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या बाबतीत सुविधा असावी, तसेच बांधकाम कर्मचाऱ्यांसाठी एवढा निधी (सेस) आमच्याकडे उपलब्ध आहे की, दुपारचं भोजन त्यांना कसं देता येईल, सेफ्टी किट शूज कसे देता येतील, याकडे लक्ष दिले जाईल. चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनांसाठी तसेच बांधकाम कामगारांसाठी एक वेगळी यंत्रणा राबवली. आता मुख्यमंत्री शिंदे साहेबांकडे ज्या बैठकी झाल्या, त्यात आम्ही सगळ्या गोष्टी मांडल्या होत्या. त्यांच्यावर आता कोर्टात कुठेही चॅलेंज होणार नाही अशा पद्धतीने एक नियमावली बनेल आणि त्यांना न्याय दिल्यासारखा होईल.

प्रश्न - राज्य सरकारी गट (ड) चतुर्थ श्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे व 'कर्मचारी टाइम्स' या मुखपत्राचे सल्लागार म्हणून महासंघाच्या सभासदांना काय संदेश द्याल?

उत्तर - राज्य सरकार चतुर्थश्रेणी कर्मचारी जे आहेत त्यांनी त्यांच्या भावी पिढीसाठी काही तरी उपाययोजना करायला पाहिजे, असे मला वाटते. ती केली जात नाही आणि जे कर्मचारी निवृत्तीला आलेले आहेत त्यांना योग्य त्या वैद्यकीय सोयी उपलब्ध व्हायला हव्यात. कर्मचाऱ्यांचे भवितव्य सुरक्षित करून ठेवावे. वाढत्या वयानुसार वैद्यकीय खर्चदेखील वाढत आहे.

(पान ६ पहा)

### ई पोर्टलद्वारे देशभरात कामगारांची नोंदणी सुरु

मुंबई : केंद्र सरकारच्या वतीने ई श्रम पोर्टलच्या माध्यमातून असंघटित कामगारांची नोंदणी मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

या नोंदणीमध्ये आता टॅक्सी चालकांपासून डबेवाल्यांपर्यंत साधारणत: ४०० कॅटेगरी निर्माण करण्यात आल्या आहेत. या सर्वांना केंद्र आणि राज्य सरकार यांच्या समन्वयातून सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती केंद्रीय कामगार मंत्री भूपेंद्र यादव यांनी मुंबईत प्रसार-माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली.

या पोर्टला असंघटित कामगारांचा प्रतिसाद मिळत आहे. त्यांना शासन निश्चितपणे कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी भविष्यात प्रयत्नशील राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## बीडीओ आंदोलनाचा रोहयोवर परिणाम

**नांदेड :** पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांच्या आंदोलनामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची कामे मंदावली आहेत.

ऐन उन्हाळ्यात या कामांना लागलेला ब्रेक व पावसाळ्यात ही कामे करणे शक्य नसल्याने रोजगार हमी योजनेचा अडीच हजार कोटींचा निधी अखर्चित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आतापर्यंत केवळ १५८ कोटी रुपये खर्च झाल्याची नोंद आहे. पर्यायाने रोहयोवर खर्च होणाऱ्या निधीला ब्रेक लागला आहे. रोजगार हमी योजनेमुळे अनेकांना काम मिळत असते. महाराष्ट्रात दररोज २७३ रुपये इतकी मजूरी मिळत असते. ही कमी आहे पण त्याच्यावरदेखील आता परिणाम झाला आहे.

# बोगस कामगारांच्या शोधार्थ ॲप : सुरेश खाडे

**मुंबई :** राज्यात बोगस कामगारांची नोंदणी केल्याच्या काही तक्रारी आल्या आहेत. एकूण नोंदणीमध्ये १० टक्के नोंदणी बोगस असल्याची शक्यता आहे. हे पडताळण्याचे काम चालू आहे. यासाठी आम्ही एक ॲप तयार करत आहोत. यामध्ये नोंदणी केल्यावर कामगारांची नोंदणी खरी आहे की खोटी हे लक्षात येईल, अशी माहिती कामगार कल्याणमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघामध्ये पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. सुरेश खाडे म्हणाले की, कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय चालू करण्याचा प्रस्ताव सिद्ध करण्यात आला आहे.

कामगारांच्या तक्रारीसाठी हेल्पलाईन क्रमांक चालू करण्यात आला आहे. यासह ५५ वर्षांहून अधिक घरकामगारांसाठी सन्मान योजनेच्या अंतर्गत १० सहस्र रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. प्रत्येक तालुक्यात कामगारांच्या नोंदणीसाठी सेतू कार्यालय चालू करण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत राज्यात कामगारांविषयीचे २९ कायदे आहेत. ते एकत्रित करून केवळ ४ कायदे करण्याविषयीचा प्रस्ताव कामगार विभागाकडून सिद्ध करण्यात आला आहे.

त्याचबरोबर कोरोनाच्या कालावधीत रखडलेले कामगार रंगभूमीचे काम पुन्हा मार्गी लावण्यात येणार आहे. केंद्रशासनाने राज्यात ६ कामगार कल्याण रुग्णालयांना अनुमती दिली आहे. पुणे येथे कामगार कल्याण रुग्णालय उभारण्यासाठी ३५० कोटी रुपये संमत केले आहेत.

सध्याच्या परिस्थितीत १० जिल्ह्यांमध्ये कामगार भवन असून प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवन निर्माण करण्याची महाराष्ट्र शासनाची योजना आहे.

कामगारांचे प्रलंबित खटले सोडवण्यासाठी विधेयक आणले जाणार आहे. कारण सध्याच्या परिस्थितीमध्ये सुमारे ७ हजारांहून अधिक कामगारांचे खटले न्यायालयात प्रलंबित आहेत. हे खटले लवकरात लवकर सुटावेत, यासाठी यामध्ये दंडात्मक कारवाई करण्याचे विधेयक आणण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.



**महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव हे सेवानिवृत्त झाले. त्यावेळी त्यांना मंत्रालयातील सेवानिवृत्ती कार्यक्रमात राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी शुभेच्छा दिल्या, त्यावेळी त्याच्यासोबत कार्यालयीन सचिव बाबाराम कदम, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे पदाधिकारी, दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन रमेश लव्हांडे, तसेच पराग आडीवरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या मुख्य सचिव पदाच्या कार्यकाळात मनुकुमार श्रीवास्तव यांनी संघटनेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले तसेच अनेक बाबतीत सहकार्य केले, त्याबद्दल भाऊसाहेब पठाण यांनी त्यांचे आभार मानले.**

## सुट्टीच्या दिवशीही मुंबईत दस्त नोंदणी सुरू

**मुंबई :** महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दस्त नोंदणीसाठी पक्षकारांची दुय्यम निबंधक कार्यालयात होणारी गर्दी टाळण्यासाठी, पक्षकारांची गैरसोय होऊ नये, दस्तऐवज नोंदणीची सुविधा मिळावी, यासाठी मुंबई शहर, जिल्ह्यातील मुंबई महापालिका क्षेत्रातील एक सह दुय्यम निबंधक कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार मुंबई शहर बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सह दुय्यम निबंधक वर्ग २, मुंबई शहर क्र. ३ हे कार्यालय प्रत्येक शनिवार, रविवार तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार असल्याची माहिती, सह जिल्हा निबंधक साहेबराव दुतोंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

## अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याआधी घ्या परवानगी

**यवतमाळ :** ग्रामीणांच्या हाताला काम मिळावे म्हणून शासनाने सुरू केलेली रोजगार हमी योजना ही भ्रष्टाचारात लुप्त झाली आहे. प्रत्यक्ष मजुरांच्या नावाने कंत्राटदारच या योजनेचे काम करीत आहे. अशा अनेक घटना यापूर्वी उघडकीस आल्या आहेत. या योजनेतील निधी मोठ्या प्रमाणात हडपला जात आहे. परिणामी ही योजना सातत्याने वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अनेकांविरुद्ध गुन्हेही दाखल झाले आहेत.

मात्र आता गुन्हा दाखल करण्यापूर्वी शासनाकडून परवानगी घेण्याची गरज आहे.

रोजगार हमी योजनेतील अपहाराच्या प्रकरणात थेट गुन्हा दाखल केला जाऊ नये, त्यापूर्वी विभागीय चौकशी करून प्राप्त अहवालानुसारच पुढील कारवाई करावी, अशी मागणी ग्रामसेवक संघटनांनी लावून धरली होती. यासाठी आंदोलनही उभे केले होते, गटविकास अधिकाऱ्यांनीसुद्धा या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यामुळे राज्य शासनाने २४ एप्रिल रोजी परिपत्रक काढून प्राप्त तक्रारींची चौकशी झाल्यानंतरच अहवालावरून गुन्हे दाखल केले जावे, असे निर्देश दिले आहेत.

## सरपंच परिषदेची शिर्डी येथे बैठक

**वाडा :** महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेच्या राज्य पदाधिकाऱ्यांची शिर्डी या ठिकाणी बैठक पार पडली. या राज्यस्तरीय बैठकीत ग्रुप ग्रामपंचायत आबिटघरच्या सरपंच साक्षी संतोष साठे यांची पालघर जिल्हा सरपंच परिषद समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हिवरे बाजारचे आदर्श सरपंच तथा राष्ट्रपती पुरस्कार विजेते पद्मश्री पोपटराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या सरपंच परिषदेचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, संजय जगदाळे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

## वीस हजार अंगणवाडी कर्मचाऱ्यांची लवकरच भरती

**मुंबई :** राज्यात अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांच्या २० हजारांपेक्षा अधिक पदांच्या भरतीला मान्यता मिळाली आहे. लवकरच ही भरती सुरू करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. त्याशिवाय मानधनवाढीसह नवीन मोबाईल, विमा, अंगणवाड्यांसाठी वर्ग आदी विषयांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'वर्षा' निवासस्थानी बैठक घेण्यात आली. महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव मनोज सौनिक आदी या बैठकीला उपस्थित होते.

अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांच्या २० हजार १८६ पदांच्या भरतीला मान्यता मिळाली असून, ही भरती प्रक्रिया सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## वीज अधीक्षक अभियंतापदी खंदारे

**वसई :** महावितरणच्या वसई मंडल कार्यालयाच्या अधीक्षक अभियंता पदाचा पदभार संजय खंदारे यांनी नुकताच स्वीकारला. नाशिक परिमंडलाच्या पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता म्हणून यापूर्वी ते कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी महत्वाच्या प्रकल्पांवर काम केले. अधीक्षक अभियंता राजेशसिंग चव्हाण यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या जागेवर त्यांची बदलीद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रिकल विषयातील बी.टेक पदवी त्यांनी संपादित केली आहे.

## ३० हजार शिक्षकांची पहिल्या टप्प्यात भरती

**मुंबई :** राज्यात शिक्षकांच्या रिक्त जागा लवकरच भरण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ३० हजार आणि दुसऱ्या टप्प्यात २० हजार शिक्षकांची भरती केली जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

नवीन शैक्षिणक वर्ष सुरू होण्यापूर्वीच ही भरती करण्याचा आमचा विचार आहे. पहिल्या टप्प्यात ३० हजार शिक्षकांची भरती केली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात २० हजार शिक्षकांची भरती करण्याचा विचार असला तरी, विद्यार्थ्यांची आधार पडताळणी पूर्ण झाल्यानंतर शिक्षक भरतीचा नेमका आकडा जाहीर केला जाईल. आरक्षणानुसार ही पदे भरली जातील. उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील, असे केसरकर यांनी सांगितले.

बदलीसंदर्भात मंत्री गिरीश महाजन यांच्यासोबत चर्चा करणार आहे. माध्यमिक शिक्षकांप्रमाणे प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यासुद्धा रद्द करता येतील का; जेणेकरून शिक्षक स्थिर होतील, याबाबत चर्चा केली जाईल तसेच प्रत्येक शिक्षकाला त्यांच्या गावातच पोस्टिंग मिळेल असेही नाही, मात्र जवळच्या गावात पोस्टिंग देता येईल, असे केसरकर म्हणाले.

## नवीन अग्निशमन केंद्र 'फायरमनविना'

**बदलापूर :** कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या नवीन अग्निशमन केंद्रात सुमारे चार महिन्यांनंतर पाणी व टेलिफोन कनेक्शन सुरू झाले आहे. मात्र कर्मचाऱ्यांच्या कमतरतेअभावी फायरमनविनाच या अग्निशमन केंद्राचा कारभार सुरू असल्याचे समोर आले आहे.

सुमारे चार महिन्यांपासून कुळगाव-बदलापूर नगर परिषदेचे बदलापूर पश्चिम भागातील नवीन अग्निशमन केंद्र सुरू झालेले आहे. पूर्वी बदलापूर पूर्व भागात एमआयडीसी परिसरात नगर परिषदेचे एकमेव अग्निशमन केंद्र सुरू होते. वाढती लोकसंख्या लक्षात घेता बदलापूर पश्चिम भागातील मांजर्ली परिसरातही अग्निशमन केंद्राची उभारणी झाली पण आता फायरमन नसताना दुर्घटनेत स्थिती कशी हाताळणार? असा नागरिकांचा सवाल आहे.

## 'आव्हानांचा वेध घेऊन नांदेडचा आराखडा साकारू'

**नांदेड :** देशाच्या क्रमवारीत महाराष्ट्राने विविध क्षेत्रात आपला अपूर्व ठसा उमटवला आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याची विविधता व संधी लक्षात घेऊन नांदेडचा वैशिष्ट्यपूर्ण असा व्हिजन आराखडा आपल्या अभ्यासपूर्ण अनुभवातून मांडा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले. भविष्यातील विकासाच्या उपलब्ध संधी, स्वयंरोजगारासाठी उपलब्ध होणारे मार्ग, यासाठी जिल्ह्याची असलेली बलस्थाने, संधी, धोके व आव्हाने लक्षात घेऊन २५ वर्षांनंतरही परिपूर्ण ठरेल, असा आराखडा तयार होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा विकास आराखडा बाबत डॉ. शंकरराव चव्हाण जिल्हा नियोजन भवन येथे सर्व विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्ह्यातील शिक्षण, कृषी, कृषीपूरक उद्योग, पर्यटन, वैद्यकीय क्षेत्र, ऐतिहासिक वारसा, अध्यात्मिक शक्तीस्थळे, सिंचन, वने, आदिवासी क्षेत्र आदीबाबत भविष्यातील विविध संधी जाणून घेण्याच्या दृष्टिने या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सर्व अधिकाऱ्यांशी संवाद साधला. नांदेड जिल्ह्याला समृद्ध ऐतिहासिक वारसा आहे. या ठिकाणी पर्यटक हे केवळ भारतातूनच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यातून येत असतात. शीख भाविकांचा त्यात मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. चालुक्यापासून इतिहासाच्या पाऊल खुणा इथे उपलब्ध आहेत. त्याचबरोबर अनेक अभ्यासकांसाठीही नांदेड हे महत्वाचे ठिकाण राहिलेले आहे. त्याचा झपाट्याने विस्तारदेखील होत आहे. कृषीक्षेत्राने आपली जागतिक ओळख निर्माण केली आहे. नांदेड जिल्हातील जंगल, वनसंपदा, वन्यजीव, विविध धरणे, पुरातन मंदिरे, सुंदर शिल्पकला असलेली मंदिरे, शिक्षण, वैद्यकीय क्षेत्रात निर्माण झालेले प्रशिक्षण वर्गाचे जाळे हे सारे लक्षात घेता मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. याचबरोबर कृषीक्षेत्रालाही अनुभव आणि तंत्रकुशल युवकांची गरज निर्माण झाली आहे. युवकांनीदेखील याबाबतीत पुढाकार घेऊन पुढे आले पाहिजे तसेच स्वत:बरोबरच तालुका आणि जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे, असेही मत त्यांनी व्यक्त केले.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून भविष्यातील २५ वर्षांनंतरच्या काळाला पुरून उरेल, असा भव्य विकास आराखडा तयार करून आपण कामाला लागू, असा आशावाददेखील राऊत यांनी बोलून दाखविला.

## गुजराती कामगार भरती रद्द करण्याची मागणी

**उरण :** जेएनपीटातील कंटेनर टर्मिनलचे खासगीकरण झाले व टर्मिनल ३० वर्षांसाठी जे. एम. बक्शी कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आले. तिथे ज्या कामगारांची भरती झाली, त्यामध्ये गुजराती कामगारांचा भरणा मोठ्या प्रमाणात आहे. प्रकल्पग्रस्तांना डावलून गुजराती कामगारांची भरती करण्यात आली आहे. याबाबत कामगार नेते कॉ. भूषण पाटील यांनी आवाज उठविला आहे.

अनुभवी व शिक्षित प्रकल्पग्रस्त व स्थानिक कामगार उपलब्ध असूनदेखील त्यांना डावलण्यात येत आहे. तातडीने जेएनपीटी प्रशासनाने त्यांच्यासोबत मीटिंग लावून कारवाई करावी व तसे न केल्यास जेएनपीटी प्रशासन भवनासमोर आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## संगणक परिचालकांनी वेतनासाठी दिली जिल्हा परिषदेवर धडक

**यवतमाळ :** जिल्ह्यातील ग्रामपंचायतीत कार्यरत संगणक परिचालकांचे गेल्या तीन महिन्यांपासून मानधन अडकले होते. थकीत मानधन देण्याच्या मागणीसाठी त्यांनी जिल्हा परिषदेसमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला. त्यानुसार महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेच्या नेतृत्वात जिल्हा परिषदेवर धडक दिली.

जिल्ह्यात ७९२ संगणक परिचालक कार्यरत आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून त्यांचे मानधन मिळाले नाही. मात्र त्यांनी शासनाने सांगितलेले प्रत्येक काम वेळेत पूर्ण केले. गावपातळीवरील विविध कामांमध्ये पुढाकार घेतला. या परिचालकांना केवळ सात हजार रुपये मासिक मानधन मिळते. तेसुद्धा अनेकदा सहा-सहा महिने अडकून पडते. त्यामुळे संतप्त झालेल्या संगणक परिचालकांनी यापूर्वी जिल्हा परिषद व शासनाकडे वारंवार निवेदने दिली होती. राज्यस्तरावरून सीएससी-एसपीव्ही कंपनीमार्फत राज्यात विविध प्रकल्प राबविले जात आहे. याच कंपनीने संगणक परिचालकांची नियुक्ती केली आहे. मात्र कंपनी मानधन देण्यास टाळाटाळ करते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेने ८ मे रोजी जिल्हा परिषदेसमोर आत्मदहन करण्याचा इशारा २० एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनातून दिला होता. १२ दिवस लोटूनही मानधन न मिळाल्याने त्यांनी जिल्हा परिषदेवर धडक दिली. त्यांच्या आत्मदहनाच्या इशाऱ्याने पोलिसांचा प्रचंड मोठा फौज-फाटा तैनात करण्यात आला होता.

## जे. जे. हॉस्पिटलच्या परिचारिकांचा मेळावा

**मुंबई :** मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटलच्या जी. एन. एम. बॅच १९९२ चा स्नेहमेळावा मंगला हायस्कूल, कोपरी ठाणे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

तब्बल ३० वर्षांनी सर्व परिचारिका असलेल्या मैत्रिणी एकत्र आल्याने सहाजिकच उत्साहाला उधाण आले होते. सदर स्नेहमेळाव्याचे आयोजन या बॅचच्या सदस्य उद्योजिका नेहा निनाद धुरी उर्फ भारती सावंत यांनी केले होते.

उद्योजक दीपक सावंत यांनी स्नेहमेळाव्याच्या उत्कृष्ट व नेटक्या आयोजनाबद्दल नेहा निनाद धुरी यांचे कौतुक केले. या स्नेह मेळाव्यामुळे सर्वजणी एकत्र आलात. रोजच्या कामातून तुमच्या मैत्रिणींसाठी तुम्हाला वेळ देता आला ही चांगली उपलब्धता आहे. असे त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

## भूमिअभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांची वानवा

**तळा :** तळा भूमिअभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांची वानवा असल्याचे विदारक चित्र पहायला मिळत आहे. महसुलीचे हे महत्त्वाचे कार्यालय असून तालुका स्थापन झाल्यापासून सुमारे दहा वर्षांपासूची रिक्त पदे अद्याप ही भरलेली नसल्यामुळे इतर कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त भार पडत असल्यामुळे कर्मचारी आणि नागरिक हवालदिल झाले आहेत. जिल्हाधिकारी, संचालक भूमि-अभिलेख, कोकण विभाग मुंबई व जिल्हा भूमिअभिलेख विभागाच्या गलथान कारभाराचा फटका नागरिकांना बसत आहेत. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कामाचा निपटारा होत नसल्यामुळे नागरिकांना एका कामासाठी वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत.

भूमिअभिलेख कार्यालयात एकूण तेरा पदे मंजूर असून सद्य:स्थितीत शिपाई, भूमापक व उपअधीक्षक हे तिघेच कार्यरत आहेत. तळा तालुका डोंगराळ, दुर्गम असल्याने ग्रामीण भागातील जनता आपल्या कामानिमित्त या कार्यालयात येत असतात. या कार्यालयात महत्त्वाचे भूकरमापक, नगर भूमापक, प्रतिलिपी, आवक जावक, (बटवडा) लिपिक, दप्तर बंद, शिपाई अशी दहा पदे रिक्त आहेत. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर कामे खोळंबली असून नागरिकांना वेळ व आर्थिक नुकसानीचा फटका सहन करावा लागत आहे. या कार्यालयात मोजमापणी, फेरफार, वारसनोंद, फेरबदल, नकाशा, जुनी कागदपत्रे, व इतर अनेक कामे केली जातात. जमीन मोजमापीचे पैसे भरून देखील सहा-सहा महिने कामे होत नसल्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

## तब्बल २९० शिक्षकांच्या कोल्हापूरमध्ये बदल्या

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्षात नियमित सुरु होणाऱ्या शाळांसाठी बदली मागणारे शिक्षक जूनपासून रुजू होणार आहेत. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात तब्बल २९० शिक्षकांच्या यावेळी बदल्या करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे हवी त्या ठिकाणी बदली किंवा त्याच ठिकाणी कायम राहण्यासाठी शिक्षकांनी बनावट प्रमाणपत्रांचा आधार घेतल्याची कोणतीही तक्रार नाही.

संवर्ग एकमध्ये मराठी माध्यमातील ३६३, उर्दूच्या ५ शिक्षकांनी बदली मागितली होती. त्यापैकी मराठीच्या २८५, उर्दूच्या पाचही जणांचे बदली अर्ज मंजूर केले आहेत. बदली न झालेल्यांमध्ये ७८ जणांचा समावेश आहे. जिल्ह्यातील शिक्षकांची कोणताही गोंधळ न होता बदली प्रक्रिया झाल्याबद्दल शिक्षणाधिकारी आशा उबाळे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

## कॉर्पोरेटमध्येही टेन्शन कल्चर

### कर्मचाऱ्यांना मानसिक आजार झाल्याचे उघड

**मुंबई :** कॉर्पोरेट कंपनीत कामाला आहे म्हणजे चांगला पगार असणार, एअर कंडिशन्ड ऑफिसमध्ये बसून काम, अशी काहीशी भाबडी कल्पना आपल्या सगळ्यांचीच असते. मात्र या कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांवर देखील कामाचा ताण असून त्यांनाही टेन्शनचे कल्चर सहन करावे लागत आहे, ही महत्वाची बाब एका सर्वेक्षणातून समोर आली आहे.

आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट यांचा उपक्रम असलेल्या एम पॉवर या संस्थेने केला आहे. मानसिक आरोग्यविषयात काम करीत असून ३००० कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांचे सर्वेक्षण केले असून, त्यामध्ये हे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे.

कार्पोरेट क्षेत्रात कामाचा इतका ताण असतो की, त्यामुळे त्यांचे मानसिक आरोग्यच धोक्यात आले आहे. या कार्यालयीन कामकाजात मोठी स्पर्धा असून 'टार्गेट' पूर्ण करण्यासाठी येथील कर्मचारी हे जिवाचे रान करतात. त्या कामाच्या ताणाचा परिणाम त्याच्या कौटुंबिक जीवनावर होतो. गेले पाच महिने मुंबईसह देशातील विविध शहरांतील ३००० कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांचा मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून केलेल्या सर्वेक्षणात तब्बल ४८ टक्के कर्मचाऱ्यांना मानसिक आरोग्याचा धोका असल्याचे लक्षात आले असून, त्यापैकी ५६ टक्के महिलांना मानसिक आजाराचा धोका आढळला आहे.

ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. याचे कारण म्हणजे या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेत मोलाचा सहभाग आहे. यामुळे कर्मचारी वर्ग सक्षम असणे गरजेचे आहे.

## कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेने महसूल विभाग फायद्यात

**धुळे :** महसूल विभागातील कर्मचारी आणि अधिकारी यांच्या कार्यक्षमतेमुळे धुळे महसूल विभागात मोठ्या प्रमाणावर कारवाईतून महसूल प्राप्त झाला आहे.१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत तब्बल २३९ कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यातून २ कोटी ५७ लाख ५८ हजार रुपये इतका महसूल मिळाला आहे.

घरांच्या बांधकामांसाठी किंवा इतर कामांसाठी बऱ्याच ठिकाणी ठेकेदारांकडून बेकायदेशीर अवैध्य वाळू उत्खनन करून वाहतूक केली जाते. त्याविरोधात ही कारवाई प्रामुख्याने झाली आहे. धुळे ग्रामीण विभागात ही कारवाई मोठ्या प्रमाणावर झाली. त्यापाठोपाठ धुळे शहर, साक्री, पिंपळनेर, दोंडाईचा, शिरपुर, सिंदखेडा या भागात कारवाई केली गेली आहे. महसूल विभागाचे विशेष पथक यासाठी कार्यरत होते.

## कारवाई होण्याच्या भीतीने कर्मचाऱ्यांची बदलीतून माघार

**अहमदनगर :** जिल्हा परिषद बदल्यांमध्ये सवलत घेण्यासाठी सादर केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र बोगस आढळले तर थेट बडतर्फीची कारवाई करण्याचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी दिल्यामुळे कारवाई होईल, या भीतीने दोन दिवसांत ५० टक्क्यांहून अधिक कर्मचाऱ्यांनी माघार घेत बदली घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे अनेकांनी बोगस प्रमाणपत्र दिले होते, असे दिसून येते. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी बदल्यांसाठी सवलत मिळावी, यासाठी जी वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर केली होती, त्याची संबंधित कर्मचाऱ्यांनी १५ दिवसांत वैद्यकीय मंडळाकडून पडताळणी करून आणावी, तोपर्यंत बदल्यांचे आदेश तात्पुरते राहतील, असा पारदर्शी निर्णय जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला आहे. त्यामुळे बनावट प्रमाणपत्र सादर करणारे कर्मचारी धास्तावले आहेत. गेल्या दोन दिवसांत त्यांनी त्यांच्या निर्णयातून माघार घेतली आहे. ज्यांनी असे प्रकार केले असतील, त्यांनी आताच ते कबूल करून बदली सवलतीचा हक्क सोडावा, हीच अखेरची संधी आहे, असा इशारा त्यांनी दिला होता. बदली प्रक्रिया प्रत्येक विभागात सुरु असून त्याच्या अगोदर आता त्यातून माघार घेण्याचे प्रकार सुरु झाले आहेत.

श्री. येरेकर यांनी घेतलेल्या या निर्णयाचे प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण पोकळे तसेच अन्य क्षेत्रातील मान्यवरांनीही स्वागत केले आहे.

## निलंबित ११६ कर्मचाऱ्यांबाबत प्रशासन लवकरच निर्णय घेणार

**मुंबई** : विविध गुन्हयांमुळे निलंबित केलेल्या ११६ अधिकारी व अभियंत्यांना कोरोना काळात पालिकेने तात्पुरते सेवेत सामावून घेतले होते. पण आता कोरोनाची साथ संपल्यामुळे या ११६ कर्मचाऱ्यांबाबत प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

निलंबित केलेले ११६ अधिकारी व अभियंत्यांना करोना काळात पालिकेने पुन्हा एकदा सेवेत तात्पुरते सामावून घेतले. मात्र कोरोनाची साथ संपली तरी या निलंबित अधिकाऱ्याना पालिकेने अद्यापही सेवेत ठेवले आहे. त्यामुळे कोरोनाच्या नावाखाली ११६ अधिकारी व अभियंत्यांना पालिका प्रशासन पाठीशी घालत असल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. मात्र सद्य:स्थतीत 'कोविड-१९' या साथरोगाचा आणीबाणी स्वरुपातील प्रादूर्भाव राहिला नसल्याची घोषणा जागतिक आरोग्य संघटनेने नुकतीच केली आहे. त्यामुळे, आता या ११६ कर्मचाऱ्यांबाबत प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे.

निलंबित करण्यात आलेल्या ११६ कर्मचाऱ्यांपैकी ६० कर्मचाऱ्यांवर वैयक्तिक व समाजिक स्वरूपाच्या तक्रारी होत्या. उदा. कौटुंबिक, सामाजिक, वैयक्तिक स्वरूपातील आर्थिक किंवा सांपत्तिक तक्रारी अगर तत्सम फौजदारी गुन्हे होते.

## राज्य सरकारी गट ड कर्मचारी मध्यवर्ती महासंघ
## सचिवपदी बाबाराम कदम, संघटकपदी विश्वास रणदिवे यांची निवड



**मुंबई** : राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या सचिवपदी बाबाराम कदम यांची तर मुंबई संघटकपदी विश्वास रणदिवे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा हृद्य सत्कार मुंबई येथील संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी या दोघांचेही अभिनंदन केले तसेच त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छादेखील व्यक्त केल्या.

बाबाराम कदम यांनी यापूर्वी मुंबई विभागावर कार्य केले असून त्यांची कामगिरी ही संघटनेच्या वाढीसाठी उपयोगी राहिली आहे. त्यामुळेच राज्यस्तरीय पातळीवर सचिव म्हणून काम करताना त्यांना हा अनुभव निश्चित हितावह ठरेल, त्याचबरोबर विश्वास रणदिवे यांच्या संघटनात्मक कौशल्यामुळे ते संघटनेची बांधणी अधिक प्रभावीपणे करू शकतील तसेच मुंबई जिल्ह्यातील संघटना ही राज्यात इतर जिल्ह्यांसाठी निश्चितपणे अभिमानास्पद ठरेल, असा विश्वास भाऊसाहेब पठाण यांनी यावेळी आपल्या भाषणात व्यक्त केला.

दोघांनीही मिळालेल्या जबाबदारीचे सोने करू, असा विश्वास मनोगतातून व्यक्त केला. अन्य मान्यवरांचीही यावेळी समयोचित भाषणे झाली. मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार निवास कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व आमदार निवास कर्मचारीवर्ग यावेळी उपस्थित होते.

### ७/१२तील लबाड्यांना लगाम
## तलाठ्यांनी ३१ जुलैपर्यंत तफावत दुरुस्ती न केल्यास गुन्हे दाखल?

**पुणे** : सातबारा उताऱ्यावरील क्षेत्र आणि प्रत्यक्ष जमिनीवरील क्षेत्र यात तफावत असल्याची अनेक उदाहरणे राज्यात आहेत. तलाठ्यांच्या लबाड्यांमुळे हे प्रकार घडले. मात्र, या लबाडीमुळे अशा जमिनींचे व्यवहार थांबले होते. राज्यातील अशा चुकलेल्या हजारो सातबारांवरील क्षेत्राचे आकडे दुरुस्त करण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. त्यामुळे या जमिनींचे वर्षानुवर्षे अडकलेले व्यवहार पुन्हा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येत्या ३१ जुलैपर्यंत ही दुरुस्ती मोहीम राबविली जाणार असून, या मुदतीत सातबारा उतारे दुरुस्त न झाल्यास तलाठ्यांवर गुन्हे दाखल होणार आहेत.

राज्यात सुमारे २ लाख ६२ हजार सातबारा उतारे आहेत. मात्र, काही उताऱ्यांवरील क्षेत्र आणि जमिनीचे क्षेत्र जुळत नाही. त्यामुळे हे क्षेत्र नावावर असलेल्या जमीनमालक किंवा शेतकऱ्यांना भूमी अभिलेख विभागाच्या संगणकीय प्रणालीमुळे कोणतेही व्यवहार करता येत नाहीत. चुकलेल्या फेरफारांमध्ये दुरुस्ती होणे गरजेचे होते. हीच बाब ओळखून भूमी अभिलेख विभागाने सातबारा उताऱ्यांमधील दुरुस्तीची मोहीम हाती घेतली आहे. याबाबतचा प्रस्ताव जमाबंदी आयुक्त व भूमी अभिलेख संचालक निरंजन कुमार सुधांशू यांच्याकडे देण्यात आला आहे.

## निवृत्त पत्रकारांच्या निवृत्तीवेतनात वाढ

**मुंबई** : राज्यातील निवृत्त ज्येष्ठ पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या निवृत्तीवेतनात वाढ करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भात घोषणा केली. त्यानुसार आता ११ हजार रुपयांऐवजी २० हजार रुपये दरमहा निवृत्ती वेतन मिळणार आहे. तर शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकारिता कल्याण निधी, तसेच अधिस्वीकृती समितीही नेमण्याचा शासननिर्णय लगेचच जाहीर करू, असे त्यांनी यावेळी जाहीर केले.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघातर्फे पत्रकारिता पुरस्कार सोहळयाचे सहयाद्री अतिथीगृह येथे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उदयोगमंत्री उदय सामंत, कामगारमंत्री सुरेश खाडे, बंदर विकास व खनिकर्ममंत्री दादा भुसे, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी, तर भूमिका कार्यवाह प्रवीण पुरो यांनी यावेळी विशद केली.

'करोना असो वा इतर कोणती आपत्ती असो. बॉम्बस्फोट असो वा दहशतवादी हल्ला असो, पत्रकार हा कायम पुढे असतो. पत्रकारितेसोबतच तो सामाजिक जबाबदारीही पार पाडत असतो. पत्रकारांचे प्रश्न सोडविणे ही सरकार म्हणून आमची जबाबदारी आहे,' असे शिंदे यांनी स्पष्ट केले. पूर्वी प्रिंट मीडिया हा एकमेव होता. आता इलेक्ट्रॉनिकसोबत डिजिटल आणि सोशल मीडियाही आला आहे. आम्हीदेखील पत्रकारांच्या भल्यासाठीच काम करतो. कोणी विरोधात बातमी दिली, तर मी कधीही फोन करून विचारत नाही. पण जेव्हा सरकार चांगले काम करत असते तेव्हा चार शब्द जर चांगले लिहिले तर आमचाही हुरूप वाढतो, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

पत्रकारांच्या अनेक मागण्या प्रलंबित असून लवकरच त्या सोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, तसेच त्यांना न्याय दिला जाईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी यावेळी बोलताना दिली.

## कृषी विभाग गट अ बदल्या जाहीर

**मुंबई** : मंत्रालयासह राज्यभरातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा हंगाम सुरू झाला आहे. कृषी आणि समाजकल्याण विभागाने अ गटाच्या दोनशेहून अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केले.

मंत्रालयातील जवळपास ३२ विभागांत बदल्यांचे सत्र सुरू झाले आहे. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यविभागाने आज जवळपास २५० हून अधिक अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा निर्णय जाहीर केला. अ गटातील अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर करत विभागाने या कामी आघाडी घेतली आहे. लवकरच उर्वरित विभागातील बदल्यांचे आदेश जारी होणार आहेत, असे समजते.

## प्रभावी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठिशी शासन : मुख्यमंत्री

**मुंबई** : सर्वसामान्य माणसाचे समाधान हा राज्य शासनाचा प्राधान्यक्रम असून, त्यासाठी प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी सातत्याने नवनवीन संकल्पना राबविण्यावर भर द्यावा तसेच त्याची पारदर्शी पद्धतीने अंमलबजावणी करावी. प्रभावीपणे काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाठिशी शासन नेहमीच असेल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्याच्या हस्ते राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानातील १३ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, प्रशासनातील सेवांच्या गुणवत्तेमधील वाढ, लोकाभिमुखता व निर्णयक्षमता आणण्याकरिता तसेच सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्याकरिता अधिकारी व कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी ही एकाच रथाची दोन चाके आहेत. हे दोन्ही समान वेगाने व समान पद्धतीने एकत्रित चालल्यास महाराष्ट्र हे देशातील सर्वार्थाने प्रभावी व लोककल्याणकारी राज्य बनेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्याला समृद्ध करण्यासाठी शासन अनेकविध लोकहिताचे निर्णय घेत आहे. हे निर्णय, ध्येय धोरणे राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने काम केले पाहिजे. अधिकारी व कर्मचारी यांच्या कामामुळे समाजात शासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते. हे सर्वसामान्य लोकांचे सरकार आहे ही भावना निर्माण करण्यासाठी जलद व पारदर्शी पद्धतीने काम करावे. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक घटकाला सहज व सुलभ सेवा द्याव्यात. तसेच आपली जबाबदारी व कर्तव्य पार पाडत असताना नवनवीन तंत्रज्ञान आणि संकल्पना राबवून अधिक संवेदनशीलपणे काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले.

आपत्ती आणि संकट काळात शासन आणि प्रशासन अतिशय तत्परतेने आपली कर्तव्य, जबाबदाऱ्या पार पाडत असतात. घटनास्थळी अधिकारी उपस्थित आहेत ही बाब जनतेला आश्वस्त करते, समाधान आणि सुरक्षेची हमी देते. अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांची राज्याच्या सर्वांगीण विकासातील भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. हे वेळोवेळी आलेल्या आपत्ती किंवा राबविलेल्या योजना यांच्या फलश्रुतीवरून दिसते. काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून चुका होतात. त्याचा विचार करून मागे न रहाता अधिक प्रभावीपणे आपले कर्तव्य बजावा. सदैव सकारात्मक आणि व्यावहारिक दृष्टीकोन ठेवा. काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठिशी शासन सदैव खंबीर असेल, असेही ते म्हणाले.

## परिचारिकांच्या मागण्या १५ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन

**मुंबई** : कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागातील सहाय्यक परिचारिका प्रसविका आणि सार्वजनिक आरोग्य परिचारिकांनी महानगरपालिकेच्या एफ दक्षिण विभागातील कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर तीव्र आंदोलन केले. दरम्यान, परिचारिकांच्या सर्व मागण्या १५ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. मंगला गोमारे यांनी दिले. मात्र मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दि म्युनिसिपल युनियनने दिला.

पहिल्या, दुसऱ्या कालबद्ध पदोन्नतीचा मोबदला पूर्वलक्षी प्रभावाने तात्काळ द्यावा, आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक त्या सुविधां तात्काळ उपलब्ध कराव्या, लादण्यात येणाऱ्या विविध कामांबाबत नियोजन करावे, सर्व संवर्गाची रिक्त पदे त्वरित भरावी, डॉक्टरांच्या उपस्थितीविना नियमित लसीकरण कार्यक्रम आयोजित करण्याची सक्ती करू नये, प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये संगणक चालकाचे पद निर्माण करून भरती करावी, पी.एच.एन. संवर्गाची रिक्त पदे ए.एन.एम. संवर्गातून पदोन्नतीने तात्काळ भरावी, इंटरनेटकरिता लागणारे शुल्क आगाऊ देण्यात यावे, या सह अन्य मागण्यांसाठी दि म्युनिसिपल युनियनच्या नेतृत्वाखाली परिचारिका दिनाचे औचित्य साधून परिचारिकांनी मुंबई महानगरपालिकेच्या एफ दक्षिण विभागातील कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर आंदोलन केले.

यावेळी कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागातील सहाय्यक परिचारिका प्रसविका आणि सार्वजनिक आरोग्य परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**परिचारिका वेतनापासून वंचित**

**भाईंदर** : मीरा भाईंदर शहरात असलेल्या एकमेव पंडित भीमसेन जोशी या शासकीय रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या परिचारिकांना मागील दोन महिन्यांपासून वेतन दिले गेले नसल्याची बाब समोर आली आहे, परिचारिकांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे.

पालिकेचे असलेले परंतु नंतर शासनाकडे हस्तांतरित झालेले भाईंदर पश्चिम येथील पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाने करोनाकाळात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे डॉक्टर आणि परिचारिकाच्या मंजूर पदाची पूर्तता शासनाकडून करण्यात आली आहे. परंतु रुग्णालयाचे व्यवस्थापन हाताळण्याकडे शासनाचे पूर्णत: दुर्लक्ष झाले आहे. परिणामी रुग्णालयात सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता असून कंत्राटी परिचारिकांना वेतन मिळणे कठीण झाले आहे. सध्या रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने एकूण ५५ परिचारिका कार्यरत आहेत.

**परिचारिका पदाच्या जागा रिक्त**

मीरा-भाईंदर महापालिकेच्या वैद्यकीय विभागात परिचारिका पदासाठी एकूण ९६ पदे मंजूर आहेत. यातील ७२ पदे पालिकेकडून भरण्यात आली आहेत. परिचारिकांच्या पदाची पूर्तता करावी, अशी मागणी होत आहे.

## पालिका परिचारिकांसाठी पाच दिवसांचा आठवडा

**मुंबई** : मुंबई महानगरपालिकेच्या परिचारिकांना आता पाच दिवसांचा आठवडा लागू होणार आहे. या मागणीसाठी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेच्या नेतृत्वाखाली शेकडो परिचारिकांनी जोरदार आंदोलन केले. याची दखल घेत पालिका प्रशासनाने सकारात्मक आश्वासन दिले.

राज्य सरकारच्या धर्तीवर पालिकेतील परिचारिकांना पाच दिवसांचा आठवडा, आठवड्यातून दोन दिवस रजा द्यावी, अशी मागणी सातत्याने केली जात होती. मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांतील परिचारिकांना ५ दिवसांचा आठवडा, आठवड्याला २ रजा लागू करण्याचा प्रस्ताव त्वरित पाठवून २ दिवसांत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी वर्गाची मान्यता घेण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

## जागतिक परिचारिका दिनी जे.जे.रुग्णालयात जनजागृती

**मुंबई** : जागतिक परिचारिका दिनाचे औचित्य साधून परिचर्या महाविद्यालय सर जे. जे. समूह रुग्णालय परिसरात हा दिवस साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने परिचारिका सप्ताह हा सध्याच्या आधुनिक परिचारिका व्यवसायाच्या आद्य जनक मानल्या गेलेल्या फ्लॉरेन्स नाईटिंगल यांच्या स्मरणार्थ साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने जे. जे. रुग्णालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात प्रामुख्याने अवयवदान जनजागृती अभियान, मासिक पाळी व स्त्रियांच्या आरोग्याबाबत जनजागृती, वक्तृत्व स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले व प्रभात फेरीचे आयोजन केले गेले.

फ्लॉरेन्स नाईटिंगल यांचा १२ मे हा जन्मदिवस असून या जन्मदिवसाच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्या समाजसेविका कांताबेन पारेख, परिचर्या डॉ. अपर्णा संखे व विद्यार्थी समन्वयक हेमलता गजबे, विद्यार्थी प्रतिनिधी, सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी व विद्यर्थिनी यांची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी दीपप्रज्वलन करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले व पाहुण्यांच्या हस्ते विद्याथर्यांना पुस्तक व केक यांचे वाटप करण्यात आले. श्रीमती कांताबेन यांनी यावेळी उपस्थित परिचारिकांना मार्गदर्शन केले, तसेच या दिवसाचे महत्व विशद केले. परिचारिकांचे कार्य मानवतेच्या दृष्टीने कसे महत्वाचे आहे, याबाबतही त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## वन विभाग वरिष्ठांना ५ वर्षांतच बढती?

**अमरावती** : राज्याच्या वन विभागात सहाय्यक वनसंरक्षक ते अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक या पदांना ५ ते ६ वर्षांतच पदोन्नती दिली जाते. मात्र, वनरक्षक ते वनपरिक्षेत्राधिकारी यांना पदोन्नतीकरिता १५ वर्षांची प्रतीक्षा करावी लागते. वन विभागात कनिष्ठांना पदोन्नती देताना विषमता दिसून येते.

वन विभागात प्रादेशिक, वन्यजीव, सामाजिक वनीकरण, कार्यआयोजना, रोहयो असे उपविभाग तयार करण्यात आल्यानंतर वन कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कोणतेच ठोस धोरण आखले नाही. महाराष्ट्रात वनरक्षक ते वनपरिक्षेत्राधिकाऱ्यांच्या पदोन्नतीत केवळ एकच वनपाल पद आहे.

## ऑनलाईन कर्मचारी भरतीला ओहोटी

**मुंबई** : यंदा एप्रिल महिन्यात ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या पांढरपेशा कर्मचाऱ्यांच्या भरतीत गेल्या वर्षाच्या समान कालावधीतील भरतीच्या तुलनेत ६ टक्के घट झाली असल्याचे इनसाईट ट्रॅकर नावाच्या अहवालातून उघडकीस आले आहे. मात्र आर्थिक अनिश्चिततेचा काळ असूनही स्टार्टअप उद्योगांमधील कर्मचारी भरतीत लक्षणीय वाढ झाली असल्याचेही या अहवालातून दिसून आले आहे.

उपलब्ध माहितीनुसार यंदा एप्रिल महिन्यात ई - भरतीत ६ टक्के घसरण झाली आहे. सध्या संपूर्ण जगातच आर्थिक अनिश्चिततेचा काळ सुरू असल्यामुळे व्यवसायांसमोर आव्हाने उभी आहेत. या आव्हानांना न जुमानता भारतीय स्टार्टअप अर्थात नवउद्योगांमध्ये मात्र रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. अन्य क्षेत्रांना बदलत्या वातावरणाशी जुळून घेण्यासाठी वेगाने बदल स्वीकारावे लागत आहेत. यामुळे कर्मचारी भरताना सावधगिरी बाळगण्याचा कल मात्र सुरू राहील. प्रत्येक उमेदवाराला काटेकोरपणे मोजूनमापून घेतले जाईल. विशेषकरून नवउद्योग उमेदवार निवडताना चोखंदळपणा दाखवतील. तरीदेखील या क्षेत्रात नाविन्यकरण आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर रोजगार उपलब्ध होतच राहतील.

स्टार्टअप व्यतिरिक्त बँकिंग आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या, प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन या क्षेत्रांमध्येदेखील लक्षणीय रोजगार उपलब्ध होतील. यालट आरोग्यसेवा आणि बीपीओ स्टार्टअप या क्षेत्रांमध्ये रोजगार मागणीत घटच झाली असून, पुढेही असा कल सुरू राहील.

स्टार्टअप रोजगार पुरवण्यात बंगळुरु शहर आघाडीवर असून एकूण रोजगारापैकी ३३ टक्के भरती याच शहरात झाली आहे. त्यापाठोपाठ दिल्ली, मुंबई आणि पुणे शहरांत कर्मचारी भरती करण्यात आली असल्याचे निरीक्षण या अहवालात नोंदवण्यात आले आहे.


भारतात आणि विशेषत: महाराष्ट्रात देशी-विदेशी गुंतवणूकदारांनी प्रकल्प सुरु केल्यामुळे या क्षेत्रात नोकरीच्या संधीदेखील उपलब्ध झाल्या असून रोजगाराचे प्रमाण वाढणार आहे.

## महत्वाचे शासन निर्णय (जीआर)


www.maharashtra.gov.in

| विभाग | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | २६-०४-२०२३ | केंद्र शासन पुरस्कृत अटल यूजल (अटल जल) योजना राज्यात राबविणेबाबत. |
| मृद व जलसंधारण विभाग | २६-०४-२०२३ | गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबविणेबाबत. |
| शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | २७-०४-२०२३ | महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ च्या सुधारित नियमावली २०२३ यांस मान्यता देण्याबाबत. |
| सामान्य प्रशासन विभाग | ०२-०५-२०२३ | मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना नागरीकांकडून तसेच क्षेत्रिय कार्यालयांकडून पाठविण्यात येणारे टपाल स्वीकारण्यासाठी मंत्रालय मुख्य प्रवेशद्वाराजवळ मध्यवर्ती टपाल केंद्र सुरू करण्याबाबत. |
| सामान्य प्रशासन विभाग | ०२-०५-२०२३ | स्वातंत्र्य सैनिकांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीस ओळखपत्र देणेबाबत. |
| महिला व बाल विकास विभाग | ०४-०५-२०२३ | खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्याबाबत. |
| पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | ०८-०५-२०२३ | रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत. |
| उद्योग, उर्जा व कामगार विभाग | ०८-०५-२०२३ | मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना - २.० शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीज पुरवठा करण्याचे अभियान. |
| महिला व बाल विकास विभाग | १०-०५-२०२३ | अनाथ आरक्षण धोरणामध्ये भरतीविषयक तरतूद विहीत करणेबाबत. |
| शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ११-०५-२०२३ | शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३. |
| सामान्य प्रशासन विभाग | ११-०५-२०२३ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हास्तरावर सर्व स्वातंत्र्य सैनिक/त्यांचे जोडीदार यांचा सत्कार करणेबाबत. |

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



सरचिटणीस
श्री. भिकू हनवती साळुंके
०१-०६-२०२३



तुम्हाला लाभो उदंड आयुष्य,
हीच मनात सदैव इच्छा
तुमच्या स्वप्नांना येऊ दे बहर,
जन्मदिनी ह्याच शुभेच्छा !!!

-: शुभेच्छुक :-
अध्यक्ष श्री. सुधाकर गायकवाड
आणि
'कर्मचारी टाईम्स' परिवार

## संपादकीय

### भविष्याच्या विचारातून संघटन हवे...

जुन्या पेन्शन योजना लागू करण्यात यावी, या मागणीसाठी दोन महिन्यांपूर्वी शासकीय कर्मचारी वर्गाने राज्यभर एकत्र येऊन जो संघटनात्मक लढा दिला, त्याचा परिणाम म्हणून राज्य शासकीय स्तरावरून नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या आतापर्यंत झालेल्या दोन सकारात्मक बैठका. यातून मार्ग निघेल, अशा आशा दिसू लागल्या आहेत. पण समितीचा निर्णय कामगारांच्या हिताचा असेल तर तत्काळ अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने कार्यवाही केली पाहिजे. पुन्हा कर्मचाऱ्यांना आंदोलन करायला भाग पाडू नये, अशी अपेक्षा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सरकार संवेदनशील असल्याची ग्वाही जाहीर कार्यक्रमात दिली आहे. तसेच पेन्शनबरोबरच अन्य काही मागण्यादेखील त्यांनी पूर्ण करण्याच्या दिशेने सकारात्मक पावले उचलली आहेत, ही सुखावणारी बाब आहे. असे असले तरी भविष्यातील कामगार चळवळ ही आपल्यासाठी चिंतेची बाब आहे. याचे कारण म्हणजे नवीन कामगार कायद्यानुसार सरळसेवा भरतीपेक्षा सरकार व खासगी संस्थादेखील कंत्राटी पद्धतीने म्हणजेच बाह्यस्त्रोताने कामगार अथवा कर्मचारी वर्गाची भरती केली जात आहे. भविष्यातील हे मोठे आव्हान आहे. सध्यादेखील शासकीय सेवेत अनेक कंत्राटी कामगार आहेत. त्यांना वर्षानुवर्षे काम करूनदेखील शासकीय लाभ मिळत नाहीत. त्यांना कायमस्वरुपी नोकरी मिळावी, यासाठी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ ही शासनमान्य संघटना सातत्याने प्रयत्नशील आहे. पण त्यादृष्टीने सरकारने सकारात्मक पावले उचलण्याची आवश्यकता आहे. अन्य उद्योगातदेखील शिकाऊ कामगार या संकल्पनेखाली कामगारांचे शोषण होत आहे. वेतन, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य, बोनस, कामाचे तास, सुट्टी यांचा कसलाही ताळमेळ नसल्यामुळे ही वेठबिगारी सुरु असल्याचे विदारक चित्र आजच्या काळात आपल्याला दिसून येत आहे. शासकीय सेवांमध्येही भविष्यात अशी स्थिती आपल्याला अधिक प्रकर्षाने दिसून येईल, असेच वातावरण सध्यातरी आहे. यासाठी केंद्रीय तसेच राज्य स्तरावर कामगार मंत्रालयांकडून योग्य ती दखल घेऊन यातून मार्ग काढण्याची गरज आहे. निश्चितकालीन कामगार या नव्या व्याख्येनुसार कामगार असुरक्षित केले गेले आहे. त्यामुळे भविष्यात संघटित कामगार हे इतिहासजमा होण्याचीच दाट शक्यता आहे. असंघटित कामगारांना न्याय देण्यासाठी शासकीय स्तरावरून वेगवेगळे निर्णय जाहीर केले जातात किंवा त्यांच्यासाठी कल्याणकारी मसुदा तयार करण्यासाठी कष्ट केले जातात. पण ही वरवरची मलमपट्टी आहे, हेच खरे. कारण त्यांना कायमस्वरुपी न्याय यातून मिळणार नाही तसेच त्यांचे भवितव्य सुरक्षित होईलच, याची खात्री नाही. बांधकाम कामगार कल्याण कर ही नवी नियमावली काढत जमा झालेल्या निधीचा कितपत उपयोग आतापर्यंत या कामगारांवर झाला, हाही एक अभ्यासाचा विषय आहे. त्यामुळे शासकीय स्तरावरील निर्णयाची अंमलबजावणी करण्याची इच्छाशक्ती नसल्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नाही. सध्याच्या यांत्रिकी युगात कामगार अथवा कर्मचारी कपात करण्याची प्रथा रुढ झाली आहे शिवाय आवश्यक ते मनुष्यबळाऐवजी यांत्रिक मदतीने काम करून घेतले जात आहे. माहिती व तंत्रज्ञान युगामुळे नोकऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. नव्या अर्थशास्त्रात कामगार हिताचा निर्णय होताना दिसून येत नाही. त्यामुळे भविष्यकाळ हा कामगार अथवा कर्मचारी चळवळींसाठी अनुकूल दिसत नाही. याबाबतीत आताच सर्वांनी एकत्र येऊन तसेच संघटन वाढवून मार्ग काढण्याची गरज आहे. धोरणात्मक निर्णयातून आपण आपलेच नव्हे तर आपल्या पुढच्या पिढीचेही भवितव्य कसे सुरक्षित ठेवू शकतो, त्यासाठी समाजाची घडी विस्कळीत होऊ देणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.

**OPS (जुनी पेन्शन योजना) झेंडा-३**

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्यांचे नाव | एक्स वाय झेड |
| २. | पदनाम | वर्ग ३ |
| ३. | कार्यालय | महात्मा फुले कृषि विद्यापीठ |
| ४. | जन्मतारीख | ०१.०८.१९७६ |
| ५. | रुजू दिनांक | ०१.०९.२००६ |
| ६. | सेवानिवृत्ती दिनांक | ३१.०८.२०३४ |
| ७. | अर्हताकारी सेवा | २८ वर्षे १ महिना ० दिवस |
| ८. | अर्हताकारी सवेचा सहामाही कालावधी | ५६ |
| ९. | अंतिम वेतन | ४८९०० |
| १०. | निवृत्तीवेतन | २४४५० |
| ११. | सेवानिवृत्ती उपदान | अंतिम वेतन X अर्हताकारी सेवा कार्यकाळ/४ ६८४६०० |
| १२. | अंशराशी कृत भाग | ९७८० |
| १३. | अंशराशीकरण रक्कम | ९७८० X १२ X ८.३७१ ९८२४२१ |
| १४. | रजा रोखीकरण | ४८९०० X १० ४८९००० |
| १५. | निवृत्तीवेतन | २४४५० |
| १६. | अंशराशीकरण वजा जाता देय निवृत्तीवेतन | १४६७० |
| १७. | म.भत्ता १३२% | ३२२७४ |
| १८. | **एकुण देय निवृत्तीवेतन** | ४६९४४ |
| १९. | **जुन्या पेन्शन योजनेनुसार मिळणारी एकूण रक्कम** | १४७१४२१ |

**DCPS/NPS (नवीन पेन्शन योजना)**

| | | नवीन पेन्शन |
|---|---|---|
| १. | १०% कर्मचारी हिस्सा | १५०२२४० |
| २. | १४% शासन हिस्सा | २००६४८४ |
| ३. | व्याज ७.०१% | २४९१२० |
| ४. | **एकूण जमा** | ३७५७८४४ |
| ५. | **नवीन पेन्शन नुसार परतावा रक्कम** | ७५१५६९ |
| ६. | गुंतवणुक NPS ८०% | ३००६२७५ |
| ७. | **नवीन देय पेन्शन** | १६७०२ |
| ८. | नवीन आणि जुनी मधील पेन्शन फरक | ३०२४२ |
| ९. | नवीन आणि जुनी मधील परतावा फरक | ७१९८५२ |

**भाग-१ (OPS-MPS तुलनात्मक विश्लेषण)**

दिनांक ९ मे २०२३ रोजीच्या अभ्यास समितीच्या व्दितीय बैठकीत होणाऱ्या चर्चासत्रात सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, नगरपालिका-नगरपरिषद कर्मचारी समन्वय समितीच्या प्रतिनिधींना सहभागाची संधी देत असल्याबद्दल समितीतील मान्यवरांचे आम्ही आभारी आहोत.

**जुन्या पेन्शन धोरणाला सर्वोच्च कायदयाचे व वेतन आयोगाचे समर्थन :-** (अ) मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९८२ मध्ये डी. एस. नाकरा विरुद्ध भारत सरकार या प्रकरणात न्यायनिवाडा देताना खालील मत मांडले आहे.

"सरकारी कर्मचाऱ्यांना पेन्शन देणे म्हणजे धर्मादाय (Charity) बाब नाही. कार्यनिष्ठेने काम केलेल्या मागील सेवेची भरपाई हा पेन्शन देण्यामागील हेतू आहे. मागील सेवेची नोंद घेऊन त्याच्या आयुष्याच्या उतरणीच्या काळात त्याला पेन्शनरूपी सामाजिक सुरक्षा पुरविणे हे शासनाचे कर्तव्य आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचा तो हक्क आहे." मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने जुन्या पेन्शन योजनेचे अधिष्ठान मजबूत केले आहे.

ब) चौथ्या वेतन आयोगाने (१९८६) सुध्दा जुन्या पेन्शन योजनेची निकड मान्य केली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचा तो हक्क आहे, असा शिक्कामोर्तबही केला आहे.

**समन्वय समितीची रास्त भूमिका :-**

दि. २१ एप्रिल २०२३ रोजी जुनी परिभाषित निवृत्तीवेतन योजना (OPS) व राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या अभ्यास समिती समवेत समन्वय समितीची प्रथम बैठक दि. २१ एप्रिल २०२३ रोजी संपन्न झाली. या बैठकीत अभ्यास समितीस शासनाने ठरवून दिलेल्या कार्यकक्षेबाबत उहापोह झाला. संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने जुन्या पेन्शनप्रमाणे (OPS) आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याचे धोरण तत्व म्हणून लेखी स्वरुपात मान्य केले आहे. त्यामुळे OPS आणि या योजनांचा तुलनात्मक अभ्यास करून शिफारस किंवा अहवाल सादर करावयाचा झाल्यास उपरोक्त स्वीकारलेल्या तत्वानुसार दिलेली हमी महत्त्वाची ठरते. अभ्यास समितीने जरी नव्या स्वरुपात पेन्शन योजनेचा 'नव-ढाचा' मांडण्याचा प्रयत्न केला तरी, जुन्या पेन्शनप्रमाणे (OPS) प्रस्तावित पेन्शनचे आर्थिक स्वरुप (५० टक्के मूळ वेतन + महागाई भत्ता) कायम राहिल. जुन्या पेन्शनप्रमाणे आर्थिक लाभ व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित तेव्हाच होईल जेव्हा मिळणारे निवृत्ती वेतन जुन्या परिभाषित पेन्शन योजनेप्रमाणेच (OPS) निश्चित होईल, शासनाने दिलेली हमी त्यामुळे महत्त्वाची ठरते,

**समन्वय समितीच्या वतीने खालील प्रमाणे तपशिलवार प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. या प्रस्तावात व्यक्त करण्यात आलेली स्थिती किंवा आकडेवारी शासनाच्या विविध आर्थिक स्वरुपाच्या अहवालावर आधारित आहे. कोठेही काल्पनिक मांडणी करण्यात आलेली नाही, ही बाब मा. समितीने लक्षात घ्यावी अशी विनंती आहे.**

१. "जुनी पेन्शन योजना सर्वांना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करा" संघटनेच्या या मागणीला

# जुन्या पेन्शन योजनेला लागू करण्यासाठी कर्मचारी समन्वय समितीचा महाराष्ट्र शासनास प्रस्ताव

जुन्या पेन्शनप्रमाणे (**OPS**) खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याच्या धोरणात्मक निर्णयानुसार, नवीन पेन्शन योजना रद्द करुन, जुन्या पेन्शन योजने प्रमाणे आर्थिक लाभ सुनिश्चित करण्यासाठी समन्वय समितीच्या वतीने अभ्यास समितीस सादर केलेला प्रस्ताव.

समितीमार्फत होणाऱ्या तुलनात्मक अभ्यासास मूर्त स्वरुप देण्याचा शासनाचा प्रधान हेतु, समिती स्थापनेमागे आहे. त्यासाठी शासन वचनबध्द (commited) असल्याचे लिखित स्वरुपातील धोरण शासनाने जाहिर केले आहे सदर धोरण खालील प्रमाणे आहे. "जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे (OPS) आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याचे धोरण तत्व म्हणून मान्य करणे'' असे मान्य केले आहे."

**उपरोक्त धोरणाच्या परिप्रेक्षातच समितीने पुढील शिफारस अहवाल/निष्कर्ष काढावेत असेच शासनास अभिप्रेत आहे.** "जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे" ही शब्द श्रृंखला, संभाव्य पेन्शन योजनेचे स्वरुप निश्चित करते. त्यामुळे या योजनेस नांव जरी "जुनी पेन्शन" असे दिले नाही तरी या नवीन योजनेस, जे मूर्त स्वरुप लाभेल, त्याचे परिणाम जुन्या पेन्शनप्रमाणे खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षेत सुनिश्चित होणार आहेत. त्यामुळे शासनाने या संदर्भात घेतलेल्या धोरणात्मक निर्णयास क्षति पोहोचणार नाही याविषयी काळजी घेणे अनिवार्य आहे.

२. अभ्यास समितीला प्रथम, राष्ट्रीय पेन्शन योजनेव्दारे (NPS) जुन्या पेन्शन योजनेच्या (OPS) तुलनेत कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक सुरक्षितता साधली जात नाही, हा निष्कर्ष पक्का करुन, सदर पेन्शन योजना रद्द करण्याची शिफारस केली जाणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील तक्ता बोलका आहे."

**NPS धारक सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी व जुनी पेन्शन योजना धारक कर्मचारी यातील तुलनात्मक स्थिती**

नाव - श्री. भास्करराव
मूळ वेतन - ३४,३००/-
एकूण सेवा - १५ वर्ष ६ महिने
NPS पेन्शन - २५०६/-
मिळू शकणारी जुनी पेन्शन - १७,१५०/-

नाव - श्री. शिवशंकर
मूळ वेतन - ५६,९००/-
एकूण सेवा - १७ वर्ष ६ महिने
NPS पेन्शन - ४९००/-
मिळू शकणारी जुनी पेन्शन - २८,४५०/-

३. 'जुनी पेन्शन' असे नांव न देता जरी दुसऱ्या एखाद्या नावाने तयार केलेल्या योजनेनुसार प्राप्त होऊ शकणारे निवृत्तीवेतनाचे स्वरुप, खालील प्रमाणे असेल तरच आर्थिक लाभाची यथायोग्य सुनिश्चितता होऊ शकेल.

<u>सूत्र -</u> १. शेवटचे मूळ वेतनाच्या ५० टक्के निवृत्तीवेतन असेल तसेच सदर निवृत्तीवेतनाचे ४० टक्के अंशराशीकरण अनुज्ञेय ठरेल. २. निश्चित झालेल्या निवृत्ती-वेतनाच्या अनुषंगाने अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता प्राप्त होईल. ३. भविष्य निर्वाह निधी (G.P.F.) १२% ची कपात अनुज्ञेय असेल.

४. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या धारक, कार्यरत कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना जुन्या पेन्शन धोरणाप्रमाणे म्हणजेच १९८२/८४ च्या नियमानुसार, "**कुटुंब निवृत्तीवेतन व सेवानिवृत्त उपदान देण्याचा निर्णय दि. ३१ मार्च २०२३ रोजी शासनाने घेतला आहे.** मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचा विचार करून शासनाने न्यायप्रिय धोरण राबविले असेल तर अशाच स्वरुपाचे धोरण जिवीत (alive) NPS कर्मचाऱ्यांबाबत ठेवणे सुसंगत ठरते. शासनाने कुटुंब निवृत्तीवेतनाबाबत पूर्वलक्षी प्रभावाने घेतलेल्या या धोरणास अभ्यास समितीची मान्यता असणारच आहे. त्यामुळे जिवीत धारक कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने जुन्या पेन्शनप्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करणे सर्वाथाने समन्यायाचे ठरेल.

५. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) दि. १ नोव्हेंबर २००५ पासून महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आली. १७ वर्षांच्या कालावधीनंतर या योजनेची फलनिष्पत्ती तपासली असता शासनामार्फत "आर्थिक व सामाजिक सुरक्षेला" पूर्णपणे बगल देण्यात आल्याचे दिसून येते. दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांचे सेवाजीवनानंतरचे आयुष्य पूर्णपणे उध्वस्त झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या योजनेचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज ठरते. उतारवयातील जीवनाची चिंता या कर्मचाऱ्यांना सेवाजीवनात सतत सतावत राहिली तर दैनंदिन कर्तव्य पार पाडताना त्याची मानसिक स्थिती कशी असेल हा मानवी चेहरा दर्शविणारा विचार, सांप्रत शासनाने करणे क्रमप्राप्त आहे. या बाबीचे पडसाद समितीच्या अभ्यास कार्यात उमटणे अपरिहार्य आहे.

**६. जुन्या पेन्शनप्रमाणे लाभ सर्वांना अनुज्ञेय केल्यास शासनावर २०३५ पर्यंत कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही. उलटपक्षी काही बाबतीत शासनाची भरपूर बचत संभवते. उदाहरणार्थ -**

अ) राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS), शासनाला दरमहा प्रत्येक कर्मचाऱ्यांमागे १४ टक्क्यांचे अंशदान भरावे लागते. सदर अंशदान भरण्याची गरज राहणार नाही.

ब) NPS योजनेत कर्मचाऱ्यांकडून १० टक्के अंशदान वसूल केले जाते. सदर अंशदान बंद करुन कर्मचाऱ्यांस पूर्वीप्रमाणे "भविष्य निर्वाह निधी योजना" लागू केल्यास कर्मचाऱ्यांकडून दरमहा कमीत कमी १२ टक्के वसुली होऊ शकते. म्हणजेच शासनाचा वेतनावरील प्रत्यक्ष खर्च २ टक्क्यांनी कमी होईल.

क) पेन्शन धोरणात बदल केल्यामुळे पुढील १२ वर्षात शासनावर कोणताही आर्थिक अतिरिक्त भार पडणार नाही कारण सन २००५ व त्यानंतर नियुक्त झालेले कर्मचारी सन २०३५ नंतर सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे सन २०३५ नंतर निवृत्ती वेतनाच्या खर्चात टप्प्याटप्याने वाढ होऊ शकते. १२ वर्षानंतर सेवानिवृत्ती वेतनावर वाढणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी, आवश्यकता असल्यास, १२ वर्षांच्या १२ खर्चविषयक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात या शिर्षावरील भविष्यातील खर्चासाठी वेगळ्या निधीची तरतूद करणे शक्य आहे. १२ वर्षानंतरच्या संभाव्य खर्चाच्या रक्कमेची तजवीज करणे कल्याणकारी शासनाचे कर्तव्यच ठरते.

दुसरे असे की, दरवर्षी महसूली उत्पन्न १० टक्क्यांच्या आसपास वाढते. १२ वर्षानंतर त्यात १२० टक्क्यांची वाढ संभवते. तत्कालीन एकूण महसूली खर्चाचा विचार केल्यास वेतन-निवृत्तीवेतनावरील खर्चाचा आकडा वाढलेला दिसेल परंतु एकूण **महसूली खर्चाची** टक्केवारी मात्र २० टक्केच राहिल. आज या शीर्षावरील खर्च १९ टक्के आहे. यावरून भविष्यातील चित्र स्पष्ट होत आहे.

(ड) गेली १७ वर्षे "फंड मॅनेजरकडे" भरलेली **अंशदानाची २४ टक्के रक्कम** संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त होईल त्यावेळी केंद्र शासनाला ती रक्कम परत द्यावीच लागेल. त्या एकूण रक्कमेतील ४० टक्के रक्कम शासनाकडे राहिल अशी सध्याच्या नियमात तरतूद आहे. म्हणजेच सदर अंशदानाची परतफेड टप्याटप्याने राज्य शासनास होणार आहे. त्यामुळे राज्य शासनावरील तत्कालीन आर्थिक भार सुसहय होण्यास मदत होणार आहे.

ई) कर्मचारी जेव्हा सेवानिवृत्त होतो

> **विश्वास काटकर**
> **निमंत्रक**
> **समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य**

तेव्हापासून त्याचे मासिक वेतन मिळणे बंद होते. त्यामुळे निवृत्तीमुळे रिक्त पद भरेपर्यंत एकतर वेतनावरील होत असलेला खर्च निरंक असतो किंवा त्या जागी नवनियुक्ती झाल्यास, नवनियुक्त कर्मचाऱ्याचे वेतन कमीत कमी स्तरावर असते. त्यामुळे सेवानिवृत्तीमुळे वेतनावरील खर्चाची पूर्णपणे किंवा त्या प्रमाणात बचत होत असते. म्हणजेच सेवानिवृत्तीमुळे **निवृत्ती वेतनावरील खर्च जरी वाढत असला तरी उपरोक्त निकर्षांप्रमाणे वेतनावरील खर्च त्या प्रमाणात कमी होत असतो.** यामुळेसुध्दा शासनाच्या आर्थिक भाराला सुसहयता प्राप्त होत असते. शासनाच्या एकूण अर्थभाराचा विचार करताना या बाजूचादेखील विचार होणे आवश्यक आहे.

जुन्या पेन्शनमुळे (OPS) मिळू शकणारे लाभ व त्याच्या तुलनेत नवीन पेन्शन (NPS) मध्ये मिळणारे लाभ या संदर्भात वर्ग-१ते वर्ग-४मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभाची तुलनात्मक स्थिती दर्शविणारी विवरणपत्रे समितीच्या माहिती व अभ्यासासाठी, सोबत सादर करीत आहे. (झेंडा-२=वर्ग-१, झेंडा३-=वर्ग-३, झेंडा-४=वर्ग-४)

**भाग - २ (राज्याच्या अर्थभाराचे तुलनात्मक विश्लेषण)**

**१. सरकारच्या आर्थिक भाराचा वस्तुनिष्ठ विचार :-** राज्य शासनाच्या वार्षिक अर्थसंकल्पाचा तपशिलवार विचार केल्यास काही गृहितकांचा वस्तुनिष्ठ विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्य शासन प्राप्त महसूली उत्पन्नातून विविध शीर्षांवर खर्च करीत असते. अर्थात या खर्चात विकासकार्याला प्राधान्य देणे ही महत्त्वाची जबाबदारी कर्तव्य-भावनेने अग्रभागी ठेवावी लागते. एकूण महसुली उत्पन्नाच्या प्राप्तीतून समाजातील, राज्यातील सर्व घटकांचे समाधान करणे प्राधान्याचे असते. त्या दृष्टीने विचार करता सरकारी कर्मचारी हा सुध्दा समाजातील लक्षणीय घटक आहे, ही बाब मान्य करावी लागेल. आजपर्यंत झालेल्या देशाच्या एकूण विकासात सरकारी कर्मचाऱ्यांचे योगदान मान्यच करावे लागेल. सरकारी व सार्वजनिक सेवा ही देशसेवेची संधी आहे या संकल्पनेची ही जाणीव ठेवून या घटकाकडे पाहणे न्यायाचे ठरते. त्या दृष्टीने एकूण आर्थिक बाजूचा विचार करताना खालील निष्कर्षांचा गुणात्मक विचार करणे आवश्यकच आहे. सरकार खर्चाचा तपशील देताना सरकारी कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या वेतन निवृत्तीवेतनाच्या खर्चात **कर्जावरील प्रदान झालेल्या व्याजाच्या रकमेचा समावेश करुन** कर्मचाऱ्यांवरील एकूण खर्चाचा आकडा फुगविला जातो. त्याचे कारण अनाकलनीय आहे.

**१. वेतनावरील खर्च :-** सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन दिले जाते. त्या बदल्यात त्यांचेकडून आरोग्य, शिक्षण, प्रशासन, कर संकलन, विविध योजना वगैरे बाबतीत काम करुन घेतले जाते. यामध्ये नैसर्गिक, मानवी आपत्ती (युध्दे), महामारी वगैरे आपत्ती काळातील शीघ्रगतीच्या कामाचा समावेश आहे. या सर्व कार्यकर्तव्यासाठी दिलेला आर्थिक मोबदला म्हणजे वेतन होय. आरोग्य शिक्षण, शेती, पाटबंधारे, बांधकाम, प्रशासन, करसंकलन वगैरे विभागातील कामे सरकारी कर्मचाऱ्यांच्या कष्टाने पूर्ण होत असतात. ही सर्व कामे म्हणजे "विकास कामेच" आहेत. म्हणजेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होत असलेला खर्च म्हणजे विकासावर होत असलेला खर्च आहे. ते काम म्हणजे रोजगार हमी योजना नव्हे. ही जान सरकारने ठेवल्यास, वेतनावर होणारा खर्च अनाठायी नसून तो विकासासाठी आवश्यक खर्च आहे. सन २०२१-२०२२ मध्ये हा खर्च एकूण महसूली जमेच्या ३० टक्के इतका आहे. (कृपया विवरणपत्र **झेंडा-५** पहावा)

**२. निवृत्ती वेतनावरील खर्च :-** दिर्घकाळ सेवा बजावलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळणे हा त्यांचा हक्क आहे, असा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. उतारवयात सरकारी कर्मचाऱ्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी निवृत्ती वेतन देऊन त्याला सामाजिक सुरक्षा बहाल करणे हा सरकारच्या कल्याणकारी कार्याचा एक भाग ठरतो, सन २०२२ २०२३ या आर्थिक वर्षात हा खर्च एकूण महसूली उत्पन्नाच्या १२ टक्के इतका आहे. (कृपया विवरण पत्र **झेंडा-६** पहावे)

**३. कर्जावरील व्याजाचे प्रदान :-** राज्याने वेळोवेळी घेतलेल्या कर्जावरील व्याज प्रदानाची रक्कम सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन-निवृत्तीवेतनाच्या खर्चात गृहित धरली जाते ही रक्कम एकूण महसूली उत्पन्नाच्या १२ टक्के असते. सदर व्याज प्रदानाची रक्कम सरकारी कर्मचारी वेतन खर्चात गृहित धरून खर्चाचा आकडा फुगविला जातो. या बाबतीत गुणात्मक विचार करून व्याज प्रदानाची रक्कम स्वतंत्र शीर्षाखाली गृहीत धरणे संयुक्तिक आहे. वेतन निवृत्तीवेतनाच्या खर्चात या व्याज प्रदानाचा समावेश करणे आम्हांस संयुक्तिक वाटत नाही. (विवरणपत्र **झेंडा-७** पहावे)

**२. जुनी पेन्शन (OPS) व नवीन पेन्शन योजना (NPS) या योजनेत सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चातील तुलनात्मक फरक :-**

जुन्या पेन्शन योजनेमध्ये सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (GPF) ही महाराष्ट्र शासनाची व्यवस्था असल्यामुळे GPF मध्ये कर्मचाऱ्यांची कमीत कमी ६ व जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांच्या इच्छेनुसार कपात करता येते. सदर कपातीचा दर १२% गृहित धरण्यात आला तर जुन्या पेन्शन योजनेत शासनाला कर्मचाऱ्यांच्या **वेतनावर ८८% खर्च येतो/येईल.**

नव्या अंशदायी पेन्शन योजनेची कर्मचाऱ्यांच्या हिश्याची १०% वर्गणी शासनाच्या हिश्याची रक्कम १४% अशी एकूण २४% रक्कम एन.एस.डी.एल. कडे दरमहा भरावी लागेल/ लागते त्यामुळे नव्या पेन्शन योजनेत शासनाला **प्रत्यक्ष वेतनावर ११४% खर्च येतो/ येईल.**

सोबत जुनी पेन्शन योजना (OPS) व नवीन पेन्शन योजना (NPS) या योजनेत सहभागी झालेल्या किंवा सहभागी होऊ घातलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चातील तुलनात्मक फरक दर्शविणारे विवरणपत्र **झेंडा-८** प्रमाणे जोडले आहे.

**३. आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षी जुन्या पेन्शन योजनेमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या, सेवानिवृत्ती वेतन व भविष्य निर्वाह निधी अंतिम परवाना रक्कम, ग्रॅच्युटी, रजा रोखीकरण या सेवानिवृत्ती लाभावर झालेल्या खर्चाची वस्तुस्थिती :-** आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षी महाराष्ट्र राज्याची महसूली जमा ३,३३,३११ कोटी झालेली त्यातून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनावर व भविष्य निर्वाह निधी अंतिम परतावा रक्कम, ग्रॅच्युईटी, रजा रोखीकरण या सेवानिवृत्ती लाभावर ३८,५११ कोटी रुपये आर्थिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये खर्च झालेले आहेत आणि हा खर्च एकूण महसूली जमेच्या

३८,५११+
३,३३,५११X१०० =
११.५५% झालेला आहे.

म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षी **सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्ती लाभावर** एकूण महसुली जमेच्या ११.५५% खर्च झालेला आहे.

थोडक्यात आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षी सेवानिवृत्त वेतन व सेवानिवृत्ती लाभावर झालेल्या खर्चामध्ये, ग्रॅज्युईटी, भविष्य निर्वाह निधी अंतिम परतावा रक्कम रजा रोखीकरण या लाभांचाही समावेश आहे. त्या लाभाचे प्रमाण ३% पेक्षा जास्त आहे. या लाभांचा विचार केला तर फक्त सेवानिवृत्ती वेतनावर एकूण महसूली जमेच्या फक्त ०८% खर्च २०२१-२०२२ मध्ये झालेला आहे. (विवरणपत्र **झेंडा-७** पहावे)

**४. आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षी एन.पी.एस. आणि डिसीपीएस योजनेत सहभागी झालेल्या ५,२५,००० कर्मचाऱ्यांच्या नवीन पेन्शनच्या २४% वर्गणीवर खर्च होत असलेली आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.**

१. ५,२५,००० x सरासरी १०% वर्गणी ६६०० रुपये प्रतिमहिना = ३४६ कोटी रुपये महिन्याला तर वर्षाला = ३४६ कोटी रुपये प्रति महिना x १२ महिने = **४१५८ कोटी रुपये** एन.पी.एस. योजनेची १०% वर्गणी पाठवावी लागत आहे. आणि खर्च एकूण महसूली जमेच्या ४१५८ x ÷ ३,३३,३११ x १०० =१.२५% होत आहे.

२. ५,२५,००० x सरासरी १४% वर्गणी ९४०० रुपये प्रतिमहिना = ४९३ कोटी महिन्याला रुपये तर वर्षाला = ४९३ कोटी रुपये प्रति महिना x १२ महिने = **५९२२ कोटी रुपये** एन.पी.एस. योजनेची १४% वर्गणी पाठवावी लागत

**(पान ५ पहा)**

(पान ४ वरून)

आहे आणि हा खर्च एकूण महसूली जमेच्या ५९२२ x ÷ ३,३३,३११ x १०० = १.७६% होत आहे.

३. ५,२५,००० एन.पी.एस. कर्मचाऱ्यांची २४% वार्षिक वर्गणी एन. एस. डी. एल. कडे **१०,०८० कोटी रुपये आर्थिक वर्ष** २०२१-२०२२ या वर्षी पाठवले जात आहेत आणि हा खर्च एकूण महसूली जमेच्या १०,०८० ÷ ३,३३,३११ x १०० = **३% होत** आहे.

**५. आर्थिक वर्षे २०२१-२०२२ या वर्षी महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या १७,००,००० कर्मचाऱ्यांना एन.पी.एस. योजना लागू केली असती तर नवीन पेन्शनच्या २४% वर्गणीवरील होणाऱ्या खर्चाची माहिती :-**

आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षी महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या सर्वच म्हणजेच १७,००,००० कर्मचाऱ्यांना एन.पी.एस. योजना लागू केली असती तर या १७,००,००० कर्मचाऱ्यांच्या २४% वर्गणीवर होणाऱ्या खर्चाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

१. १७,००,००० सरासरी १०% वर्गणी ६,६०० रुपये प्रति महिना = १,१२२ कोटी रुपये महिन्याला तर वर्षाला = १,१२२ कोटी रुपये प्रति महिना x १२ महिने = **१३,४६४ कोटी रुपये** एन.पी.एस. योजनेची १०% वर्गणी पाठवावी लागली असती आणि खर्च एकूण महसूल जमेच्या १३४६४ ÷ ३,३३,३११ x १०० = ४% झाला असता,

**२.** थोडक्यात १७,००,०००x सरासरी १४% वर्गणी ९,४०० रुपये प्रति महिना = १,५९८ कोटी रुपये महिन्याला तर वर्षाला १५९८ कोटी रुपये प्रति महिना = १२ महिने = **१९,१७६ कोटी रुपये** एन.पी.एस. योजनेची १४% वर्गणी पाठवावी लागली असती आणि खर्च एकूण महसूली जमेच्या १९,१७६ ÷ ३,३३,३११ x १०० = ५.७५% झाला असता.

३. थोडक्यात १७,००,००० कर्मचाऱ्यांच्या २४% **वर्गणीचे ३२६४० कोटी रुपये एन. एस. डी. एल** कडे पाठवावे लागले असते आणि आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षांमध्ये हा खर्च एकूण महसूली जमेच्या ३२,६४० ÷ ३,३३,३११ x १००=**९.७९%** झाला असता आणि यात ग्रेज्युटी आणि रजा रोखीकरण या सेवानिवृत्ती लाभांचा समावेश नाही या लाभांचा विचार केला तर हा खर्च एकूण महसूली जमेच्या **११%** असता.

थोडक्यात सर्वच म्हणजे १७,००,००० कर्मचाऱ्यांच्या नवीन पेन्शनच्या २४% वर्गणीवरील खर्च हा २०२१-२०२२ मध्ये **एकूण महसूली जमेच्या ११% झाला** असता आणि तो खर्च या वर्तमान सरकारला करावा लागला असता जो हे कर्मचारी २०३७ नंतर सेवानिवृत्त होणार आहेत त्यावेळी अस्तित्वात असलेल्या सरकारला जुनी पेन्शन देण्यासाठी करावा लागेल आणि तो सरासरी खर्च एकूण महसुली जमेच्या ११% होईल कारण आर्थिक वर्ष २००४-२००५ ते आजतागायत म्हणजेच २०२१-२०२२ पर्यंत एकूण महसूली जमेच्या सरासरी ११% झालेला आहे.

**६. जुनी पेन्शन योजना (OPS) लागू असताना आणि जुनी पेन्शन योजना बंद करुन नवीन पेन्शन योजना (NPS) लागू केल्यानंतर वचनबध्द खर्चात (In Committed Expenditure ) होणाऱ्या बदलाचे प्रमाण :**

**अ.** जुनी पेन्शन योजना लागू असताना आर्थिक वर्ष २०२१-२०२२ यावर्षी झालेल्या वचनबध्द खर्चाची टक्केवारी

१) वेतन ३२.३३%
२) निवृत्तीवेतन ११.५५%
३) व्याजप्रदान १२.०५%
५५.९३%

**ब.** जुनी पेन्शन योजना (OPS) बंद करून नवीन पेन्शन योजना (NPS) लागू केल्यानंतर होणाऱ्या वचनबध्द खर्चाची टक्केवारी

१) वेतन ४३.८८%
(नवीन पेन्शन योजना लागू केल्यामुळे नवीन पेन्शनची २४% वर्गणी एन.एस.डी.एल. कडे पाठवावयाची असल्याने वेतन खर्चात २४% ने वाढ झाल्याने वेतन खर्चातील ही वाढ महसुली जमेच्या **११.५५%** ने होत आहे)
२) निवृत्तीवेतन निरंक
३) व्याजप्रदाने १२.५५%
५५.९३%

**७. सन २००५ नंतर नियुक्त झालेले कर्मचारी हे २०३७ नंतर सेवानिवृत्त होणार आहेत. या ५,२५,००० कर्मचाऱ्यांच्या २०२२ ते २०३७ या १५ वर्षांच्या कालावधीत नवीन पेन्शनची २४% वर्गणी एन.एस.डी.एल. कडे पाठवावी लागणार आहे. त्याची अंदाजित आकडेवारी व एकूण महसूल जमेच्या किती खर्च होणार आहे त्याची टक्केवारी :-**

आर्थिक वर्षे २०२१-२०२२ मध्ये ५,२५,००० कर्मचारी हे नवीन पेन्शन योजनेत सहभागी आहेत त्याची नवीन पेन्शनची २४% वर्गणी १०,०८० कोटी रुपये दरवर्षी x १५ वर्षे = **१,५१,००० कोटी रुपये** एन.एस.डी.एल. कडे पाठवावे लागणार आहेत यात **दरवर्षीची** ३% वेतनवाढ आणि ७% महागाई भत्ता याचा विचार केला तर या १५ वर्षात **३,००,०००** रुपये नवीन पेन्शनची, २४% वर्गणी एन.एस.डी.एल. कडे पाठवावी लागणार आहे. हा खर्च एकूण कोटी महसूली जमेच्या सरासरी ६% आसपास होणार आहे. फक्त ही आकडेवारी सध्या नवीन पेन्शन योजनेत सहभागी झालेल्या ५,२५,००० कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील आहे.

जसजसे या नवीन पेन्शन योजनेत कर्मचारी सहभागी होत जातील तसातसा या नवीन २४% वर्गणीवरील खर्चात वाढ होत जाऊन २०२३ ते २०३८ या कालावधीत एकूण महसूली जमेच्या सरासरी १०% च्या आसपास होणार आहे.

**८. डीसीपीएस आणि एन.पी. एस. योजनेतील कर्मचाऱ्यांची सध्यस्थिती :-**

१. एन.पी.एस. योजनेत सहभागी झालेले ३,०८,३५४ शासकीय कर्मचाऱ्यांची २४% वर्गणी **एप्रिल २०२२ अखेर २०,७८८ कोटी रुपये एन. एस. डी. एल. कडे जमा आहेत**. त्यात २०२२- २०२३ या वर्षांची २४% वर्गणी ४,००० कोटी रुपये आणि ५% व्याज परतावा २,००० कोटी रुपये असे **एकूण २६,७८८ कोटी रुपये** एन.एस.डी.एल. कडे जमा आहेत.

२. १,२५,०२४ प्राथमिक व माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे **१५,००० कोटी रुपये** एस.एस.डी.एल. कडे जमा आहेत.

३. अकृषी विद्यापीठे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, व्यवसाय शिक्षण, ज्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि ज्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे अशी महामंडळे यांचे कर्मचारी यांची डी.सी.पी.एस. योजनेतील आजपर्यंतची २४% वर्गणी **१०,००० कोटी रुपये.**

**९. जुनी पेन्शन योजना सन २०२३-२०२४ या वर्षी लागू केल्यामुळे महाराष्ट्र शासनाला होणार फायदा :- १. आर्थिक वर्षे २०२३-२०२४ या वर्षी जुनी पेन्शन योजना लागू केल्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांचे २६,७८८ कोटी रुपये महाराष्ट्र शासनाला परत मिळतील.**

२. **आर्थिक वर्षे २०२३-२०२४ या वर्षी जुनी पेन्शन योजना लागू केल्यामुळे १,२५,०२४ प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक, विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एन.एस.डी.एल. कडे जमा केलेले १५,००० कोटी रुपये जुनी पेन्शन योजना लागू केल्यामुळे महाराष्ट्र शासनाला परत मिळतील.**

३. **अकृषी विद्यापीठ, आय.टी.आय., तंत्रनिकेतने व्यवसाय शिक्षण संस्था जुनी पेन्शन लागू अशी अभिमत विद्यापीठे यांचे शिक्षण व शिक्षकेतर कर्मचारी व ज्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे अशी महामंडळे यांचे कर्मचारी यांची डीसीपीएस योजनेतील अखेरची शिल्लक रक्कम म्हणून १०,००० कोटी रुपये एनपीएस योजनेची आरंभीची शिल्लक म्हणून एन.एस.डी.एल. कडे जुनी पेन्शन योजना लागू केल्यामुळे पाठवावी लागणार नाही.**

४. **आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये जुनी पेन्शन योजना लागू केल्यामुळे एनपीएस योजनेची २४% वर्गणी १०,०८० कोटी रुपये एन.एस.डी.एल. कडे पाठवावी लागणार नाही.**

५. **आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये जुनी पेन्शन योजना लागू केल्यामुळे महाराष्ट्र शासनाला ६१,८६८ कोटी रुपयांचा फायदा होईल.**

६. ५,२५,००० **कर्मचारी जे एनपीएस योजनेत सहभागी झालेत त्या कर्मचाऱ्यांची सन २०२२-२०३७ या कालावधीतील १५ वर्षांची एनपीएस योजनेची २४% वर्गणी ३,००,००० कोटी एन.एस.डी.एल. कडे पाठवावी लागणार नाही. (वरील मुद्दा ७ पहावा)**

**१०. प्रस्तावाचा सविनय सारांश :-** कर्मचारी-शिक्षकांना, ज्या उद्देशाने जुन्या पेन्शन योजनेद्वारे (OPS) आर्थिक व सामाजिक हक्काची सुरक्षा बहाल करण्यात आली होती. ती रद्द करून नवीन अंशदान पेन्शन योजना [राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS)] दि. १ नोव्हेंबर २००५ पासून महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आली. गेल्या १७ वर्षांच्या अनुभवानंतर, सदर जुन्या पेन्शन ऐवजी लागू करण्यात आलेली नवीन अंशदान पेन्शन योजना (NPS) कर्मचारी-शिक्षकांच्या सेवानिवृत्तीनंतर आर्थिक कुचंबणा करणारी ठरत आहे. कर्मचारी व शिक्षकांना सामाजिक सुरक्षेची कोणतीच हमी या नवीन अंशदान पेन्शनमुळे मिळत नाही. त्यामुळे NPS बाबतच्या वर्तमान स्थितीचा एकूणात पुनर्विचार करुन सदर अंशदान पेन्शन योजना (NPS) रद्द करुन, जुन्या पेन्शनप्रमाणे (OPS) आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देऊ शकणारी पेन्शन योजना, अस्तित्वात आणण्याची शिफारस अभ्यास समितीने करावी अशी विनंती आहे. सदर संभाव्य पेन्शन योजनेतील सेवानिवृत्तीवेतनाचे स्वरुप "संबंधितांच्या शेवटच्या मूळ वेतनाच्या ५०% अधिक अनुज्ञेय महागाई भत्ता" असे असावे. शासनाने दिलेल्या हमीनुसार सदरची कार्यवाही उचित ठरेल.

**११. नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन (OPS) लागू करण्या संदर्भातील समस्या-एक संकीर्ण बाब.** दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या संबंधित शाळांना शासनाकडून १००% अनुदान दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर मिळाले आहे, असे कारण दाखवून जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिनांकापासून वेतनवाढ, वरिष्ठ वेतनश्रेणी इत्यादी सर्व लाभ देण्यात आले आहेत. शासनाच्या इतर विभागात १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. त्याच समन्यायाने शिक्षण विभागातील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे न्यायाचे ठरेल. समिती समोर ही संकिर्ण समस्या मांडून जुन्या पेन्शन संबंधातील अन्याय दूर व्हावा ही अपेक्षा आहे.

हा दोन भागातील कर्मचाऱ्यांच्या जीवनाशी निगडीत असणारा प्रस्ताव/ अहवाल तयार करण्यात खालील व्यक्तींचा महत्वाचा हातभार लागला. समन्वय समितीच्यावतीने आम्ही त्यांचे आभारी आहेत.

१. प्रविण पाताडे, राजाध्यक्ष
नितीन भोईर, राज्य प्रवक्ता
महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन.
२. रविंद्र बोरकर, सहाय्यक लेखाधिकारी, वाई.
३. पदाधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

**OPS (जुनी पेन्शन योजना) झेंडा-४**

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्याचे नाव | एक्स वाय झेड |
| २. | पदनाम | वर्ग ४ |
| ३. | कार्यालय | महात्मा फुले कृषि विद्यापीठ |
| ४. | जन्मतारीख | ०१.०८.१९७२ |
| ५. | रुजू दिनांक | ०१.०९.२००६ |
| ६. | सेवानिवृत्ती दिनांक | ३१.०८.२०३४ |
| ७. | अर्हताकारी सेवा | २८ वर्षे १ महिना ० दिवस |
| ८. | अर्हताकारी सवेचा सहामाही कालावधी | ५६ |
| ९. | अंतिम वेतन | **२६३२०** |
| १०. | निवृत्तीवेतन | **१३१६०** |
| ११. | सेवानिवृत्ती उपदान | अंतिम वेतन X अर्हताकारी सेवा कार्यकाळ/४ **३६८४८०** |
| १२. | अंशराशी कृत भाग | **५२६४** |
| १३. | अंशराशीकरण रक्कम | ५२६४ X १२ X ८.२८७ **५२३४७३** |
| १४. | निवृत्तीवेतन | **१३१६०** |
| १५. | अंशराशीकरण वजा जाता देय निवृत्तीवेतन | **७८९३** |
| १६. | म.भत्ता १३२% | **१७३७१** |
| १७. | **एकूण देय निवृत्तीवेतन** | **२५२६७** |
| १८. | **जुन्या पेन्शन योजनेनुसार मिळणारी एकूण रक्कम** | **७८६६७३** |

**DCPS/NPS (नविन पेन्शन योजना)**

| | | नविन पेन्शन |
|---|---|---|
| १. | १०% कर्मचारी हिस्सा | ८६३६९४ |
| २. | १४% शासन हिस्सा | ११३५६०७ |
| ३. | व्याज ७.०१% | १३७१०० |
| ४. | **एकूण जमा** | **२१३६४०१** |
| ५. | **नवीन पेन्शन नुसार परतावा रक्कम** | **४२७२८०** |
| ६. | गुंतवणुक ८०% | १७०९१२१ |
| ७. | **नवीन देय पेन्शन** | **९४९५** |
| ८. | नवीन आणि जुनी मधील पेन्शन फरक | १५७७२ |
| ९. | नवीन आणि जुनी मधील परतावा फरक | **३५९३९३** |

**संदर्भ ग्रंथ**

१. महाराष्ट्र शासन वित्त विषयक विवरणपत्र २०२१-२२
२. महाराष्ट्र शासन वित्त विषयक विवरणपत्र २०२२-२३
३. महाराष्ट्र शासन वित्त विषयक विवरणपत्र २०२३-२४
४. महाराष्ट्र शासन संक्षिप्त अर्थसंकल्प २०१४-१५
५. महाराष्ट्र शासन संक्षिप्त अर्थसंकल्प २०२१-२२
६. महाराष्ट्र शासन संक्षिप्त अर्थसंकल्प २०२२-२३
७. महाराष्ट्र शासन संक्षिप्त अर्थसंकल्प २०२३-२४
८. माहिती अधिकारातील माहिती.

**OPS (जुनी पेन्शन योजना) झेंडा-२**

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्यांचे नाव | एक्स वाय झेड |
| २. | पदनाम | वर्ग १ |
| ३. | कार्यालय | महात्मा फुले कृषी विद्यापीठ |
| ४. | जन्मतारीख | ०१.०८.१९७२ |
| ५. | रुजू दिनांक | ०१.०९.२००६ |
| ६. | सेवानिवृत्ती दिनांक | ३१.०८.२०३४ |
| ७. | अर्हताकारी सेवा | २८ वर्षे १ महिना ० दिवस |
| ८. | अर्हताकारी सवेचा सहामाही कालावधी | ५६ |
| ९. | अंतिम वेतन | **३१९९८६** |
| १०. | निवृत्तीवेतन | **१५९९९३** |
| ११. | सेवानिवृत्ती उपदान | अंतिम वेतन X अर्हताकारी सेवा कार्यकाळ/४ ४४७९८०४ |
| १२. | अंशराशी कृत भाग | **६३९९७** |
| १३. | अंशराशीकरण रक्कम | ६३९९७ X १२ X ८.९३ ६२१५१३३ |
| १४. | निवृत्तीवेतन | **१५९९९३** |
| १५. | अंशराशीकरण वजा जाता देय निवृत्तीवेतन | **९५९९६** |
| १६. | म.भत्ता १३२% | **२११११९१** |
| १७. | **एकूण देय निवृत्तीवेतन** | **३०७१८७** |
| १८. | **जुन्या पेन्शन योजनेनुसार मिळणारी एकूण रक्कम** | **९४१४९९३** |

**DCPS/NPS (नवीन पेन्शन योजना)**

| | | नवीन पेन्शन |
|---|---|---|
| १. | १०% कर्मचारी हिस्सा | ८७२९८०८ |
| २. | १४% शासन हिस्सा | ११७७२४१५ |
| ३. | व्याज ७.०१% | १४५५६६१ |
| ४. | **एकूण जमा** | **२१९५७८८४** |
| ५. | **नवीन पेन्शन नुसार परतावा रक्कम** | **४३९१५७७** |
| ६. | गुंतवणुक NPS ८०% | १७५६६३०७ |
| ७. | **नवीन देय पेन्शन** | **९७५९१** |
| ८. | नवीन आणि जुनी मधील पेन्शन फरक | २०९५९६ |
| ९. | नवीन आणि जुनी मधील परतावा फरक | **५०२३४१६** |

४. आर्थिक वर्षे २००५-०६ ते आर्थिक वर्षे २०२३-२४ या कालावधीत मागील १९ वर्षात महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरवर्षी एकूण महसूली जमेच्या किती खर्च झालेला आहे त्याची आकडेवारी व टक्केवारी **झेंडा-५**

| वर्षे | महसुली जमा (कोटी रुपये) | वेतनावरील खर्च (कोटी रुपये) | एकुण महसुली जमेशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००५-०६ | ४८,४३८ | १८,७५५ | ३८.७२% |
| २००६-०७ | ६२,१९५ | १९,८८२ | ३१.९७% |
| २००७-०८ | ७९,५८३ | २२,८७९ | २८.७५% |
| २००८-०९ | ८१,२७१ | २४,४७८ | ३०.१२% |
| २००९-१० | ८६,९१० | ३४,४६८ | ४०.८१% |
| २०१०-११ | १,०५,८६८ | ४१,७४६ | ३९.४३% |
| २०११-१२ | १,२१,२८६ | ४५,४६७ | ३७.४९% |
| २०१२-१३ | १,४२,९४७ | ५३,२९५ | ३७.२८% |
| २०१३-१४ | १,४९,८२२ | ५९,७३५ | ३९.८७% |
| २०१४-१५ | १,६५,४१५ | ६२,१२३ | ३७.५६% |
| २०१५-१६ | १,८५,०३६ | ६८,४५१ | ३६.९९% |
| २०१६-१७ | २,०४,६९३ | ७२,०७५ | ३५.२१% |
| २०१७-१८ | २,४३,६५४ | ७५,०८८ | ३०.८२% |
| २०१८-१९ | २,७८,९२४ | ८०,२०६ | २८.७५% |
| २०१९-२० | २,८३,१९० | १,००,८०६ | ३५.६०% |
| २०२०-२१ | २,६९,२६८ | ९९,६११ | ३६.९६% |
| २०२१-२२ | ३,३३,३११ | १,०७,७७६ | ३२.३३% |
| २०२२-२३ | ४,३०,९२४ सुधारीत अंदाज | १,२८,८७१ | २९.९१% |
| २०२३-२४ | ४,४९,५२२ अंदाजीत | १,४४,७७१ | ३२.७१% |

आर्थिक वर्षे २००५-०६ ते आर्थिक वर्षे २०२३-२४ या कालावधीत मागिल १९ वर्षात महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरवर्षी सरासरी ३४.७७% एकुण महसुली जमेच्या झालेला आहे.

५. आर्थिक वर्षे २००५-०६ ते आर्थिक वर्षे २०२३-२४ या कालावधीत मागील १९ वर्षात महाराष्ट्र शासनाच्या जुन्या पेन्शन योजनेमधील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतन व ग्रॅच्युईटी भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदान रजा रोखीकरण व गटविमा या इतर सेवानिवृत्ती लाभावर एकूण महसूली जमेच्या दरवर्षी किती खर्च झालेला आहे त्याची आकडेवारी व टक्केवारी. **झेंडा-६**

| वर्षे | महसूली जमा (कोटी रुपये) | सेवानिवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभावरील खर्च (कोटी रुपये) | एकुण महसूली जमेशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००५-०६ | ४८,४३८ | ३,८६८ | ०७.९९% |
| २००६-०७ | ६२,१९५ | ४,११९ | ०६.६२% |
| २००७-०८ | ७९,५८३ | ४,६८२ | ०५.८८% |
| २००८-०९ | ८१,२७१ | ६,३३१ | ०७.७९% |
| २००९-१० | ८६,९१० | ६,९४६ | ०७.९९% |
| २०१०-११ | १,०५,८६८ | ९,८८६ | ०९.३४% |
| २०११-१२ | १,२१,२८६ | ११,६८२ | ०९.६३% |
| २०१२-१३ | १,४२,९४७ | १३,४३० | ०९.४०% |
| २०१३-१४ | १,४९,८२२ | १५,१८६ | १०.१४% |
| २०१४-१५ | १,६५,४१५ | १७,३८५ | १०.५१% |
| २०१५-१६ | १,८५,०३६ | १८,६४३ | १०.०८% |
| २०१६-१७ | २,०४,६९३ | २१,७६० | १०.६३% |
| २०१७-१८ | २,४३,६५४ | २३,८५३ | ०९.७९% |
| २०१८-१९ | २,७८,९२४ | २६,५४५ | ०९.५२% |
| २०१९-२० | २,८३,१९० | २७,७४१ | ०९.७९% |
| २०२०-२१ | २,६९,२६८ | ३२,२६७ | ११.९८% |
| २०२१-२२ | ३,३३,३११ | ३८,५११ | ११.५५% |
| २०२२-२३ | ४,३०,९२४ सुधारीत अंदाज | ४६,६१४ | १०.८१% |
| २०२३-२४ | ४,४९,५२२ अंदाजीत | ५४,७३६ | १२.१८% |

आर्थिक वर्षे २००५-०६ ते आर्थिक वर्षे २०२३-२४ या १९ वर्षाच्या कालावधीत जुन्या पेन्शन योजनेमधील सेवानिवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्ती लाभावर दरवर्षी सरासरी ९.५६% एकुण महसूली जमेच्या खर्च झालेला आहे. यातुन ग्रॅच्युईटी भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदान रजा रोखीकरण व गटविमा या इतर सेवानिवृत्ती लाभावरील ३% खर्च वजा केला असता. जुन्या पेन्शनमधील फक्त सेवानिवृत्ती वेतनावर दरवर्षी एकुण महसूली जमेच्या सरासरी ६.८% खर्च झालेला आहे.

७. आर्थिक वर्षे २००५-०६ ते आर्थिक वर्षे २०२३-२४ या कालावधीत मागिल १९ वर्षात महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर व जुन्या पेन्शनमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनावर व इतर सेवानिवृत्ती लाभावर व शासनाने घेतलेल्या कर्जाच्या व्याजावर एकूण महसूली जमेच्या दरवर्षी किती खर्च झालेला आहे. त्याची आकडेवारी व टक्केवारी. **झेंडा-७**

| वर्षे | महसूली जमा (कोटी रुपये) | कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च (कोटी रुपये) | सेवानिवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्ती लाभावरील खर्च (कोटी रुपये) | शासनाने घेतलेल्या कर्जाच्या व्याजावर झालेला खर्च (कोटी रुपये) | वेतन आणि सेवा-निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभावर आणि व्याजाप्रमाणे यावर झालेल्या एकूण खर्च (कोटी रुपये) | एकुण महसूली जमेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २००५-०६ | ४८,४३८ | १८,७५५ | ३,८६८ | १०,५२३ | ३३,१४६ | ६८.५३% |
| २००६-०७ | ६२,१९५ | १९,८८२ | ४,११९ | ११,९८६ | ३५,९८४ | ५७.८६% |
| २००७-०८ | ७९,५८३ | २२,८७९ | ४,६८२ | १२,९३२ | ४०,७९३ | ५०.८८% |
| २००८-०९ | ८१,२७१ | २४,४७८ | ६,३३१ | १३,०२७ | ४३,८३६ | ५३.९४% |
| २००९-१० | ८६,९१० | ३४,४६८ | ६,९४६ | १४,८३८ | ५६,२५२ | ६४.७२% |
| २०१०-११ | १,०५,८६८ | ४१,७४६ | ९,८८६ | १५,६४८ | ६७,२८० | ६३.५५% |
| २०११-१२ | १,२१,२८६ | ४५,४६७ | ११,६८२ | १७,५०५ | ७४,६५४ | ६१.५५% |
| २०१२-१३ | १,४२,९४७ | ५३,२९५ | १३,४३० | १९,०७६ | ८५,८०१ | ६०.०२% |
| २०१३-१४ | १,४९,८२२ | ५९,७३५ | १५,१८६ | २१,२०७ | ९६,१२८ | ६४.१६% |
| २०१४-१५ | १,६५,४१५ | ६२,१२३ | १७,३८५ | २३,९६५ | १,०३,४७३ | ६२.५५% |
| २०१५-१६ | १,८५,०३६ | ६८,४५१ | १८,६४३ | २५,७७१ | १,१२,८६५ | ६०.९९% |
| २०१६-१७ | २,०४,६९३ | ७२,०७५ | २१,७६० | २८,५३२ | १,२२,३६७ | ५९.७८% |
| २०१७-१८ | २,४३,६५४ | ७५,०८८ | २३,८५३ | ३३,०१८ | १,३१,९५९ | ५४.१६% |
| २०१८-१९ | २,७८,९२४ | ८०,२०६ | २६,५४५ | ३४,०२१ | १,४०,७७२ | ५०.४६% |
| २०१९-२० | २,८३,१९० | १,००,८०६ | २७,७४१ | ३३,५६१ | १,६२,१०८ | ५७.२४% |
| २०२०-२१ | २,६९,२६८ | ९९,६११ | ३२,२६७ | ३६,९७० | १,६८,८४८ | ६२.७१% |
| २०२१-२२ | ३,३३,३११ | १,०७,७७६ | ३८,५११ | ४०,१५८ | १,८६,४४५ | ५५.९४% |
| २०२२-२३ (सुधारीत अंदाज) | ४,३०,९२४ | १,२८,८७१ | ४६,६१४ | ४५,८८१ | २,२१,३६६ | ५१.३७% |
| २०२३-२४ (अंदाजीत) | ४,४९,५२२ | १,४४,७७१ | ५४,७३६ | ५०,६४८ | २,५०,१५५ | ५५.६५% |

आर्थिक वर्षे २००५-०६ ते आर्थिक वर्षे २०२३-२४ या १९ वर्षाच्या कालावधीत वचन बद्ध खर्चावर Committed Expenditure (वेतन+निवृत्ती वेतन+व्याज प्रदाने) यावर एकूण महसूलीच्या जमेच्या दरवर्षी सरासरी ५८.७३– खर्च झालेला आहे. यातुन इतर सेवानिवृत्ती लाभावरील (ग्रॅच्युईटी, भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदान रजा रोखीकरण, गट विमा) हा खर्च वजा केला असता सरासरी ५५.७३% खर्च झालेला आहे.

३) जुनी पेन्शन योजना (OPS) व नवीन पेन्शन योजना (NPS) या योजनेत सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांचा वेतनावर होणाऱ्या खर्चातील तुलनात्मक फरक **झेंडा-८**

| अं.क्र. | मुद्दा | जुनी पेन्शन योजना (OPS) | नविन पेन्शन योजना(NPS) |
|---|---|---|---|
| १. | खर्च | कर्मचाऱ्यांचा वेतनावरचा खर्च १००% | कर्मचाऱ्यांचा वेतनावरचा खर्च १००% |
| २. | सामान्य भविष्य निर्वाह निधीची वर्गणी | सामान्य भविष्य निर्वाह निधीची (GPF) एकुण वेतनाच्या पुस्तकी समायोजनाद्वारे कपात होणारी वर्गणी १०% शासनाचा कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष वेतनावर होणारा खर्च ९०% | सामान्य भविष्य निर्वाह निधीची (GPF) एकुण वेतनाच्या पुस्तकी समायोजनाद्वारे कपात होणारी वर्गणी निरंक शासनाचा कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष वेतनावर होणारा खर्च १००% |
| ३. | शासनाची वर्गणी | जुन्या पेन्शन योजनेत शासनाची वर्गणी निरंक | नवीन पेन्शन योजनेत शासनाची वर्गणी १४% |
| | एकूण | शासनाचा कर्मचाऱ्यांच्या वेतनावर एकूण होणारा खर्च ९०% | शासनाचा कर्मचाऱ्यांच्या वेतनावर एकूण होणारा खर्च ११४% |

थोडक्यात जुन्या पेन्शन योजनेत पुस्तकी समायोजनाद्वारे सामान्य भविष्य निर्वाह निधीची १०% वर्गणी कपात होत असल्याने आणि जुन्या पेन्शन योजनेत शासन हिस्सा द्यावा लागत नसल्याने कर्मचाऱ्यांच्या वेतनावर ९०% खर्च होतो.

नवीन पेन्शन योजनेत (GPF) ही सामान्य भविष्य निर्वाह निधीची सुविधा नसल्याने (GPF) ची कपात पुस्तकी समायोजनाद्वारे होत नसल्याने कर्मचाऱ्यांना १००% वेतन द्यावे अधिक शासनाला १४% वेतन द्यावे.

थोडक्यात जुन्या पेन्शन योजनेत कर्मचाऱ्यांच्या वेतनावर ९०% होणारा खर्च जुनी पेन्शन योजना बंद केल्यामुळे आणि नविन पेन्शन योजना लागू केल्यामुळे कर्मचाऱ्यांचा वेतनावरचा खर्च ११४% पर्यंत वाढतो.


म्हणजेच जुन्या पेन्शन योजनेच्या तुलनेत नवीन पेन्शन योजनेत २४% जादा वेतन द्यावे लागते.

# महिला परिचारिकांच्या आंदोलनाकडे सरकारचे दुर्लक्ष

**मुंबई** : आपल्या विविध मागण्यांसाठी महिला परिचारिका शासनाकडे आग्रही आहेत तसेच त्यांनी केलेल्या उपोषणाकडेही शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्यात तीव्र नाराजी आहे.

सरकार अंशकालीन म्हणत असले तरी बहुधा दिवसभरच त्यांना राबावे लागते. बऱ्याच वेळा आठ-दहा किलोची बॅग सोबत घेऊन परिचारिका वा इतर कर्मचाऱ्यांसोबत वाडी- वस्त्यांवर फिरावे लागते. निवृत्तीपर कोणतेही लाभ त्यांना मिळत नाहीत. पेन्शन सोडाच, वर्षानुवर्षी ग्रामीण आरोग्य सांभाळण्यासाठी राबल्यानंतर कसलाही लाभ न घेता त्यांना घरी जावे लागणार आहे. त्यामुळे काम सोडले तर जगायचे कसे, असा प्रश्न येतो. त्यामुळे झेपते तोपर्यंत काम करीत राहायचे, अशीच बऱ्याच जणींची स्थिती आहे. राज्यभरात मिळून दहा हजाराहून अधिक त्यांची संख्या आहे. आतापर्यंत ५० हून अधिक वेळा त्यांनी आंदोलने केली आहेत. किमान वेतन तरी लागू करा, अशी त्यांची मागणी आहे.

''मुख्यमंत्री हे सत्तेवर आल्या-पासून आपला हात दात्याचा राहिला आहे, हे दातृत्व या महिला परिचर आणि ग्रामोन्नती अभियानात राबणाऱ्या प्रेरिकांच्या वाट्यालाही यावे आणि त्यांच्याही मानधनात किमान वेतन नसले तरी अंगणवाडी सेविकांइतके मानधन मिळावे,'' अशी अपेक्षा जनता दल सेक्युलर मुंबई पक्षाचे अध्यक्ष प्रभाकर नारकर, महाराष्ट्र श्रमिक सभेचे सरचिटणीस केतन कदम यांनी एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



# अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाची आयसीडीएस आयुक्तालयाला भेट

**नवी मुंबई** : अंगणवाडी कर्मचाऱ्यांची अनेक प्रकारची थकित देयके त्वरीत अदा करणे व अन्य प्रश्नांबाबत अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने आयसीडीएस आयुक्तालयाला भेट दिली व उपलब्ध उपायुक्त श्री लोंढे, श्री देवरे, श्री क्षीरसागर व श्रीमती लोंढे यांची भेट घेऊन त्यांच्याशी संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा केली. या चर्चेमधून अनेक प्रश्न मार्गी लागले.

गेल्या काही महिन्यांपासून अंगणवाडी कर्मचाऱ्यांची अनेक प्रकारची देयके थकित आहेत. आहार पुरवठादार महिला बचत गटांनादेखील अनेक महिने आहाराचे अनुदान मिळालेले नाही. याबाबत संघटनेने दिनांक १७ एप्रिल रोजी देखील निवेदन दिलेले होते. परंतु सुधारणा झालेली नाही, उलट या थकित देयकांच्या यादीमध्ये दोन महिन्यांचे मानधन देखील जोडले गेले आहे. त्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे जगणे कठीण झालेले आहे त्यामुळे संघटनेने मागण्यांचे निवेदन सादर केले. या शिष्टमंडळात राज्य अध्यक्षा शुभा शमीम, कोषाध्यक्ष आरमायटी इराणी, कार्याध्यक्ष संगीता कांबळे, मुंबई अध्यक्षा स्नेहा सावंत, मीना मोहिते, विभावरी सारंगकर, सुप्रिया परब, सुप्रिया पवार, ज्योस्त्ना पोळ, आहार पुरवठादार बचतगटाच्या अरुणा रोडगे यांचा समावेश होता.

# कामगारविरोधी कायद्याबाबत इंटकचे आंदोलन

**नागपूर** : कामगारांची सामाजिक सेवा सुरक्षा रद्द करणारा मंजूर केलेला कामगार विरोधी काळा कायदा केंद्र शासनाने रद्द करावा, कर्मचाऱ्यांच्या हिताच्या जुन्याच कायद्याची अंमलबजाणी करण्यात यावी. अशा आशयाचा प्रस्ताव राष्ट्रीय नागपूर कॉर्पोरेशन एम्प्लॉइज असोसिएशन (इंटक) च्या वतीने कामगार मेळाव्यात पारित करण्यात आला.

इंटकच्या वतीने यापूर्वीदेखील कामगार कायद्यातील बाबींचा अभ्यास करून त्या कामगारांच्या विरोधात कशा आहेत. तसेच अहितकारी आहेत, याबाबतचा आढावा शासनाला दिला गेला होता. मात्र, त्याबाबत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अखेर राज्यभर आंदोलने करून शासनावर दबाव टाकण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे.

नागपूर मेहतर विविध बहुउद्देशीय सहकारी संस्था समाज भवन गीता मंदिर येथे महानगरपालिका कर्मचारी व सफाई कामगारांचा भव्य कामगार मेळावा आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष सुरेंद्र टिंगणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर जिल्हा इंटक कमिटीचे अध्यक्ष विनोद पटोले, मनपाचे माजी विरोधी पक्षनेता तानाजी वनवे, नागपूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या ज्येष्ठ नागरिक सेलचे अध्यक्ष अब्दुल गफ्फार शेख, मनपा सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भीमराव मेश्राम तसेच नागपूर मनपाचे कर व कर आकारणी विभागाचे अधीक्षक गौतम पाटील आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

मेळाव्यात संघटनेचे संघटनमंत्री मनपा सेवेतून सेवानिवृत्त झाल्यामुळे गौतम गेडाम व कार्यकारिणी मंडळ सदस्य विश्वास सेलसूरकर यांचा तसेच नागपूर मनपा कर्मचारी सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष ईश्वर मेश्राम, नागपूर मेहतर विविध बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे सचिव जानोरकर व उपस्थित संचालकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक जनरल सेक्रेटरी रंजन नलोडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष प्रवीण तंत्रपाळे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री दत्ता डहाके कार्याध्यक्षा, संजय मोहले सचिव, प्रसिद्धी प्रमुख हेमराज शिंदेकर, योगेश बोरकर, सत्येन चंदनखेडे, कुणाल यादव, प्रफुल्ल टिंगणे, वसंत पाटील, विकास सरोदे, सुरेंद्र होरे, संजय गाटकिने, प्रकाश चमके, प्रवीण उकर्डे, सुनील दातार, विनोद इंगळे, मीना मेश्राम व कमल घोडमारे आदींनी प्रयत्न केले.

# महापालिकेचा कारभार आता सुलभ

## ई-गव्हर्नन्स प्रकल्प कार्यान्वित : कार्यालयातील येरझाऱ्या थांबणार

**कोल्हापूर**: 'महापालिकेचं काम आणि सहा महिने थांब', असं म्हणायचं आता काही कारण उरणार नाही. कारण आता महापालिकेचा कारभार अधिक सुलभ तसेच गतिमान होणार आहे. नागरिकांना आपल्या कामासाठी महापालिकेचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत, अधिकाऱ्यांना विनंत्याही कराव्या लागणार नाहीत. तुम्ही घरातूनच ही कामे करू शकणार आहात. महापालिकेचा ई-गव्हर्नन्स प्रकल्प महाराष्ट्र दिनापासून सुरू झाला आहे.

या प्रकल्पाचा ठेका मोनार्च टेक्नॉलॉजी कंपनीला दिला असून, कंपनीने नागरिकांना समजेल, हाताळण्यास सोयीचे होईल, असे एक सुटसुटीत ॲप्लिकेशन तयार केले आहे. त्याचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना दिले आहे. महापालिकेच्या वेबसाइटवर जाऊन घरबसल्या सुविधांचा लाभ घेणे शक्य झाले आहे. नवीन ई-गव्हर्नन्स प्रकल्पद्वारे नागरिकांना देण्यात येणाऱ्या सर्व सेवा ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत. यामध्ये विविध सेवांच्या अर्जाबाबत सद्य:स्थिती संबंधित नागरिकांना एसएमएसद्वारे समजणार आहे तसेच विविध विभागांना प्राप्त अर्जाबाबत माहिती संबंधित विभागप्रमुखांना एसएमएसद्वारे उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या आलेल्या अर्जावर विनाविलंब कार्यवाही होऊन कार्यालयीन कामकाज गतिमान होण्यास मदत होणार आहे. नागरिकांना या सेवांचा लाभ ऑनलाइन यंत्रणेअंतर्गत संकेतस्थळ तसेच मोबाइल ॲपद्वारे देण्यात येणार आहे. कर भरणा करण्यासाठी संकेतस्थळ, नागरी सुविधा केंद्र, मोबाइल ॲप कि-ऑस्क इत्यादी पर्यायांचा वापर करता येणार आहे. नवीन ई-गव्हर्नन्स यंत्रणेत एकूण २२ सॉफ्टवेअर मोड्यूल्सचा समावेश आहे.

# एसटीचे लाइव्ह लोकेशन लवकरच

**मुंबई** : एसटी नेमकी कुठे पोहोचली, कुठे थांबली आहे, याची त्याचक्षणी माहिती मिळावी यासाठी एसटी महामंडळाने सर्व बसमध्ये 'व्हीटीएस' यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेतला. मात्र अद्यापही पाच हजार बसमध्ये व्हीटीएस यंत्रणा बसविणे बाकी आहे. उन्हाळ्याचा हंगाम संपल्यानंतर साधारणत: दोन महिन्यानंतर एसटीचे लाइव्ह लोकेशन (ठावठिकाणा कळणार आहे. रेल्वेच्या धर्तीवर राज्य परिवहन महामंडळ प्रवाशांच्या सोयीसाठी 'व्हीटीएस' यंत्रणा कार्यान्वित करत आहे. ही यंत्रणा बसविल्यानंतर प्रवाशांना संबंधित एसटीबाबतची योग्य माहिती यातून मिळणार आहे.

# गुणवंत कामगारांचे संघटन व्हावे :भारती चव्हाण

**एकलहरे** : प्रत्येक गुणवंत कामगार म्हणजे स्वत: एक संस्था असतो. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील गुणवंत कामगारांचे संघटन करून आपण आर्दश व्यक्तींचा समूह तयार करू शकतो. गुणवंतांच्या आचार, विचार व कार्यामुळे समाजापुढे आदर्श निर्माण होऊन प्रत्येक घटकाला चांगले कार्य करण्याची प्रेरणा देऊ शकतो, त्यासाठी गुणवंत कामगारांनी प्रथम संघटित होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या राज्याध्यक्ष डॉ. भारती चव्हाण यांनी केले.

जिल्हास्तरीय गुणवंत कामगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर गुणवंत कामगार मंडळ नाशिक जिल्हाध्यक्ष विलासराव गोडसे, कार्याध्यक्ष सुभाष गिते, डॉ. नंदा, अनघा धोडपकर उपस्थित होते. यावेळी कामगार भूषण शिंदे, गुणवंत कामगार प्रशांत कापसे, रमेश जगताप, के. के. मोरे, संजय गोरडे, पोपटराव देवरे, किरण भावसार, अनघा धोडपकर, सुभाष गिते, आर्दीनी मनोगत व्यक्त करून आपला परिचय करून दिला.

महाराष्ट्रातील प्रत्येक गुणवंत कामगार हा या राज्याची संपदा आहे. उत्तम मनुष्यबळ असेल तर राज्याचा विकास झपाट्याने होत असतो. राज्याची प्रगती करायची असेल तर कामगारांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. त्यांच्यातून गुणवंत कामगार अधिकाधिक निर्माण करण्यावर भर राहिला पाहिजे, महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे, याचे श्रेय गुणवंत कामगारांना मोठ्या प्रमाणावर आहे, असेही डॉ. भारती चव्हाण यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले.

या कार्यक्रमास नाशिक जिल्हा गुणवंत कामगार कल्याण मंडळाच्या सदस्यांनी काही महत्त्वाचे ठराव मंजूर करून डॉ. भारती चव्हाण यांना निवेदन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलासराव गोडसे यांनी केले. किरण भावसार यांनी सूत्रसंचालन केले. प्रशांत कापसे यांनी आभार मानले.

# फायलींचा प्रवास आता ऑनलाइन

**पुणे** : पालिकेतील गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी विविध विषयांची / कामांची कागदपत्रे, निविदा, वर्क ऑर्डर व संबंधित फायली या लवकरच हद्दपार होणार असून, महापालिकेतील सर्व कार्यालये 'पेपरलेस' केली जाणार आहेत. त्यासाठी संकेतस्थळावर 'आयडब्ल्यूएमएस' हा स्वतंत्र आयपी तयार करून, सर्व विभागांचे आवक- जावक आणि कार्यालयीन कागदपत्रे ऑनलाइन तपासली जाणार आहेत. याची सुरुवात विद्युत विभागापासून करण्यात आली असून, पुढील सहा महिन्यांत हा प्रयोग प्रत्येक विभागात अंगीकारला जाणार आहे.

# सफाई कामगारांच्या मागण्यांसाठी आमरण उपोषणाचा इशारा

**सातारा** : सातारा पालिकेतील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या जागेवर त्यांच्या वारसांना नोकरी मिळावी आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेससह सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध सघटनांच्यावतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

निवेदनात म्हंटले आहे, लाड आणि पागे कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती आदेश न दिल्याने सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांवर अन्याय झाला आहे. ३० दिवसांत नियुक्ती देण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश असताना दोन वर्षे झाली तरीही आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे याबाबत कामगार वर्गामध्ये प्रचंड प्रमाणावर नाराजी आहे.

प्रलंबित सफाई कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता यादीनुसार नियुक्ती आदेश देण्यात यावेत, राहती घरे नावावर करण्यात यावीत, जातवैधता प्रमाणपत्र व लहान कुटुंबाची अट काढून टाकावी या मागण्या असून त्या मान्य झाल्या नाहीत तर सेवामुक्त झालेले कर्मचारी व त्यांचे वारस हे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसणार आहेत. निवेदन देताना अशोक मारुडा व सफाई कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# वन्यजीव कार्यालय स्थलांतरविषयी चर्चा?

**वारणावती** : चांदोली वन्यजीव कार्यालय ढेबेवाडी ता. कराड येथे स्थलांतर करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे स्थानिक तसेच लोकप्रतिनिधींतून नाराजी व्यक्त केली जात आहे.

लोकप्रतिनिधींनी याविषयी उग्र नाराजी व्यक्त केली आहे. त्याचे कारणही तसेच आहे. कार्यालय स्थलांतराविषयी स्थानिकांसह लोकप्रतिनिधींनाही याबाबत काहीही माहिती दिलेली नाही. याविषयी कोणालाही कसलीही माहिती न देता कार्यालय स्थलांतर करण्याचा प्रस्ताव तयार करून तो मंजूर होईपर्यंत ही माहिती लपवून ठेवण्यामागचे गुपित बाहेर येणे गरजेचे आहे, असे याबाबत त्यांचे म्हणणे आहे.

# रोहयोवर बीडीओंचा बहिष्कार; ३५० ग्रामपंचायतीत कामे ठप्प

**लातूर**: महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील अनेक जबाबदाऱ्या शासनाने गटविकास अधिकाऱ्यांच्या खांद्यावर टाकल्या आहेत. याला विरोध दर्शविण्यासाठी जिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांनी रोहयोच्या कामांवर बहिष्कार टाकला आहे. परिणामी, जिल्ह्यात ग्रामपंचायत स्तरावर सुरू असलेली जवळपास १२०० कामे ठप्प असून, या कामावर कार्यरत असलेल्या १३,५०० मजूरांची गैरसोय सुरू आहे.

रोजगार हमी योजनेंअंतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समिती विभागाकडून गावस्तरावर विविध कामे केली जात आहेत. जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये १२०० कामे सुरू होती. यामध्ये १३ हजार ५०० मजूर कार्यरत होते. परंतु शासनाने रोहयोंतर्गत कामातील जबाबदारीत बदल केले आहेत.

ग्रामपंचायत स्तरावरील साप्ताहिक हजेरी यापूर्वी रोजगार सेवक करीत होता. आता रोजगार हमीच्या कामांचे नियोजन करताना कुशल व अकुशल कामांचे ६०:४० टक्के प्रमाण राखण्याची जबाबदारी गटविकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली असून, बीडीओंकडून इतर कामांचा ताण पाहता मजूरांचे मस्टर पडताळणी देता येणार नसल्याचे सांगण्यात येत आहे.

# वनकर्मचाऱ्यांना मिळाले सुरक्षा साहित्य किट

**आष्टी** : आलापल्ली वनविभाग अंतर्गत येत असलेल्या वनपरिक्षेत्र कार्यालय मार्कंडा (कं) प्रादेशिक कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांना सुरक्षात्मक साहित्य किटचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाष्ट निष्कसन अधिकारी आलापल्ली वनविभागाचे पी. डी. बुधनवार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आष्टीच्या सरपंच बेबी बुरांडे, मार्कडा (कं) च्या वनपरिक्षेत्र अधिकारी भारती राऊत आदी उपस्थित होते. पावसाळयात व हिवाळयात जंगलातील कीटक, सर्प यांच्यापासून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची सुरक्षा व्हावी म्हणून सुरक्षात्मक शूज, किट यांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

# सर्वाधिक तिकीट विक्री करणाऱ्या वाहकांचा सन्मान

**नवी मुंबई** : नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाने (एनएमएमटी) डिजिटल व्यवहाराला प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे. तिकीट विक्रीसाठीही आधुनिक साधनांचा उपयोग केला जात असून फोन पे द्वारे सर्वाधिक तिकीट विक्री करणाऱ्या सहा वाहकांचा नुकताच विशेष सन्मान केला आहे.

तंत्रस्नेही युगात ऑनलाइन डिजिटल व्यवहाराला महत्त्व प्राप्त झाले आहे. एनएमएमटीमध्येही या प्रणालीचा उपयोग केला जात आहे. जानेवारी २०२२ पासून फोन पे चा उपयोग सुरू करण्यात आला आहे. जानेवारी २०२२ मध्ये ४ हजार असणारा अर्थव्यवहार जानेवारी २०१६ मध्ये १६ हजारांपेक्षा जास्त झाला आहे. या प्रणालीद्वारे २६ लाख रुपयांची तिकीट विक्री झाली होती. यावर्षी १ कोटी ८ लाख रुपयांची तिकीट विक्री झाली आहे.

पालिकेच्या ॲम्फिथिएटरमध्ये झालेल्या कार्यक्रमप्रसंगी आयुक्त राजेश नार्वेकर, अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, सुजाता ढोले, नितीन नार्वेकर, परिवहन व्यवस्थापक योगेश कडुस्कर, अरुणा यादव, प्रशांत सकपाळ, तुषार गरूड, इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# राज्य सरकार संवेदनशील : किरण पावसकर

(पान १ वरून)

आजारी पडल्यानंतर त्याची किंमत जास्त आहे. एखादी गाडी घेणं परवडतं, पण एखादं ऑपरेशन करणं सध्या परवडत नाही. त्याविषयी आपल्याला काय करता येईल?

आता मी '**कर्मचारी टाइम्स**' चा सल्लागार आहे, पुढच्या वेळेस सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक होईल तेव्हा, मी त्यांना काही सूचना देणार. तेच तेच प्रश्न परत परत न मांडता चाकोरी बाहेर जाऊन काही प्रश्न मांडणार आहे, ते आपण सरकारकडून सोडवणूक करून घ्यायचे असे माझ्या मनात आहे, ते केले जाईल. शिंदे साहेब असताना ते अशक्य नाही. कारण त्यांना सामान्य माणसाच्या समस्यांची जाणीव आहे. त्यांना कळतंय, ही एक चळवळ समक्ष व्हावी.

माझं म्हणणं स्पष्ट आहे, बाळासाहेब आणि दत्ताजी साळवी यांनी या मुंबई शहरात एक चळवळ उभारली होती. सगळ्या कॉम्रेड कम्युनिस्टांना बाजूला करून त्यांनी भारतीय कामगार सेना नावाची युनियन जन्माला घातली. त्याच जागी आम्ही शिंदे साहेबांना बघतो. शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली अशी एक चळवळ इकडे यावी की, प्रत्येक नागरिकाला व कामगाराला वाटावं की, इकडे आम्हालां न्याय द्यायला कोणीतरी समक्ष आहे. म्हणून आम्ही राष्ट्रीय कर्मचारी सेना या नावाने पक्षाची युनियन चालू केली. त्याच्या अध्यक्षपदी मी आहे. ही चळवळ योग्य त्या पद्धतीने चालली आहे.

**प्रश्न - या कामगारांच्या कामगार नेत्याला कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विधानपरिषदेत हे सरकार संधी देईल असे आपणांस वाटते का?**

**उत्तर** - शंभर टक्के शिक्षकांचे प्रतिनिधी येतात, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी येतात, सगळ्यांचे प्रतिनिधी येतात. कामगार प्रतिनिधींना पण त्याच पद्धतीने कामगार प्रतिनिधी म्हणून त्यांच्यात सामावून घ्यावे, अश्या पद्धतीची मागणी मी माझ्यासाठी करणे चुकीचे आहे. दोन टर्म म्हणजे बारा वर्ष मी विधान परिषदेवर काम केले आहे. तिथे असंख्य प्रश्न असे असतात की, ज्यांच्यासाठी आपण सभागृहात आवाज उठवू शकतो, तो सभागृहातला आवाज या सरकारी यंत्रणेला प्रशासनालाही त्यांच्याकडे लक्ष द्यावे लागते. सक्षम कामगार नेता हा सभागृहात असावा. कामगारांविषयी असलेले, मग त्या घरांविषयी, पोलिसांविषयी असेल, निवृत्त झालेल्या पोलिसांची आम्ही आता एक संघटना केली आहे. निवृत्त पोलिसांची फार मोठी संघटना आम्ही सोबत घेतली आहे. त्यांना सुविधा मिळाव्या, मेडिकल मिळावं, यासाठी मोठा उपक्रम हाती घेतला आहे. निवृत्त झाल्यावर युनियनचा सभासद असावा म्हणून, तसेच जोपर्यंत आयुष्य जगत आहे, तोपर्यंत तो सभासद असेल अशा पद्धतीने काम चालू आहे.

# वर्गणीदारांसाठी सूचना

१. '**कर्मचारी टाइम्स**' अंकाची वर्षिक वर्गणी ३०० रुपये असून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.
२. वर्गणी मनीऑर्डर, धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाईन किंवा युपीआयद्वारे स्वीकारली जाते. कार्यालयात प्रत्यक्ष रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.
३. वर्गणी भरताना सोबत स्वत:चे नाव, पत्ता सुवाच्च अक्षरात नोंद करणे, ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.
४. मनीऑर्डर स्लीप भरताना त्यावर संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.
५. '**कर्मचारी टाइम्स**' कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशीरात उशीरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरु करण्यात येतो.
६. '**कर्मचारी टाइम्स**' चे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बहुधा १ तारखेलाच पोस्टात दिले जातात. तेव्हा १५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रार प्रतीसह '**कर्मचारी टाइम्स**' कार्यालयास कळवावे. अंक पाठविण्यात येईल. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.
७. एक महिना उलटून गेल्यानंतर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदविता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची नोंद घेतली जाणार नाही.
८. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली जात नाही, वारंवार कळवूनही पत्ता बदलला जात नाही, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वी अंक बंद झाला, अशा स्वरुपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे अवश्य करू शकता, त्याची दखल घेतली जाईल.
९. अर्धवट पत्त्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येत असतात, यापुढे सलग तीन महिने अंक परत येतील, त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवत नाही, तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.
१०. '**कर्मचारी टाइम्स**' चे अंक किरकोळ विक्रीसाठी '**कर्मचारी टाइम्स**' कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

**संपर्क** : राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई - ४०००३२.

**संपर्क** : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६

**ईमेल** : karmacharitimes@gmail.com

**वेबसाईट** : www.karmacharitimes.com

# आवाहन

'**कर्मचारी टाइम्स**' मध्ये सर्व संवर्गातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संबंधीची माहिती, बातम्या तसेच घडामोडी यांची माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बातम्या, घडामोडी, लेख प्रसिद्धीसाठी पाठवावेत. जाहिरातीसाठी देखील आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क **संपादक : 'कर्मचारी टाइम्स', द्वारा राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२. भ्रमणध्वनी: ९८९०९१६५८८**

**ईमेल : karmacharitimes@gmail.com**

♦♦♦

# ‘जत्रा शासकीय योजनांची’ गावागावात पोहोचविण्याचे ध्येय

**जालना** : राज्य सरकारच्या विविध विभागांच्या विविध शासकीय योजना लोकाभिमुख करून त्यांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी जिल्ह्यात ‘जत्रा शासकीय योजनांची, सर्वसामान्यांच्या विकासाची’ हे अभियान १५ जूनपर्यंत राबविण्यात येणार आहे. या अभियाना अंतर्गत विविध योजनांच्या माध्यमातून सुमारे एक लाख लोकांना लाभ देण्यासाठी काटेकोर नियोजन करण्याच्या तसेच मे महिन्यात तालुकानिहाय शिबिरं आयोजित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिल्या आहेत.

‘जत्रा शासकीय योजनांची सर्वसामान्यांच्या विकासाची’ या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, उपजिल्हाधिकारी रवींद्र परळीकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता सानप यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड म्हणाले की, १५ जूनपर्यंत चालणारे ‘जत्रा शासकीय योजनांची सर्वसामान्यांच्या विकासाची’ हे शासनाचे महत्त्वाकांक्षी अभियान असून, हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी जबाबदारीने व दक्षतेने उत्तम नियोजन करावे. उद्दिष्टानुसार योजनानिहाय लाभार्थ्यांची निवड करून त्यांची अद्ययावत माहिती जिल्हा प्रशासनाकडे विहीत नमुन्यात तातडीने सादर करावी. योजनानिहाय लाभार्थ्यांना दिलेला लाभ याबाबतची अद्ययावत माहितीदेखील नियमितपणे विहीत नमुन्यात भरून प्रशासनाकडे सादर करावी. या अभियानाचा आढावा नियमितपणे घेतला जाईल. त्यामुळे विभागप्रमुखांनी ‘जत्रा शासकीय योजनांची सर्वसामान्यांच्या विकासाची’ हे अभियान यशस्वी करावे.



**‘कर्मचारी टाइम्स’च्या कार्यालयप्रमुख सौ. छाया करे यांना वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा देताना संपादक भाऊसाहेब पठाण, कार्यकारी संपादक अशोक शिंदे, उपसंपादक गुरुदत्त वाकदेकर, अक्षरजुळणी विभागप्रमुख रिद्धी कुबल, वितरण विभागाचे नंदकुमार साने, कृष्णा भरडे आणि मनोहर दिवेकर.**

## नव्या गणवेशाला कामगार संघटनांचा विरोध

**मुंबई** : मुंबईची स्वच्छता राखण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्या सफाई कामगारांना अधिकाधिक सुविधा देणे गरजेचे असताना दुसरीकडे प्रशासन त्यांच्या रंगीत गणवेशावर खर्च करत आहे. मात्र, याला सफाई कामगार व कर्मचारी संघटनांनी विरोध केला आहे.

वर्षानुवर्षे असलेला खाकी गणवेश बदलून आता रंगीत गणवेश देण्यात येणार आहे. मुंबई महापालिकेच्या ‘अ’ प्रभागात प्रायोगिक तत्त्वावर येथील सफाई कामगारांना नवीन गणवेश देण्यात आला असून, लवकरच २७ हजार सफाई कर्मचाऱ्यांना नवीन गणवेश देण्याची तयारी सुरू आहे.

# बांधकाम वापरातील बदलाचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर सकंलन विभागाच्या वतीने शहरामधील सात लाख मिळकतींचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यामधून विभागाला वाढीव बांधकाम, वापरात बदल आणि नवीन मालमत्तांचा शोध लागणार आहे. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीत वर्षाकाठी तब्बल ५०० कोटी रुपयांची भर पडणार आहे. त्यासाठी शहरात ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण करून मालमत्तांना क्रमांक दिले जाणार आहेत. या कामासाठी ठेकेदाराची नेमणूक केली असून तीन वर्षांसाठी ४८ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेकडे ५ लाख ८८ हजार मिळकतींची नोंद आहे. मात्र, शहरामध्ये आजपर्यंत सर्वंकष म्हणजेच सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण झाले नाही. त्यामुळे शहरात सुमारे एक लाख मालमत्ताधारकांनी नोंद केलेली नाही. परिणामी, पालिकेच्या तिजोरीमध्ये कर जमा होत नाही. त्याचा फटका महापालिकेला बसत आहे. यावर्षी कर संकलन विभागाने ८१७ कोटी रुपयांचा कर वसूल केला आहे, तर २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये १ हजार कोटी रुपये वसूल करण्याचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे. त्यासाठी शहरातील नोंद न झालेल्या तसेच बांधकामामध्ये बदल केलेल्या व्यावसायिक मिळकतींची नोंद होणे आवश्यक आहे. शहराच्या अनेक भागांमध्ये व्यावसायिक मिळकतींची नोंद विभागाकडे निवासी मिळकत म्हणून आहे. अशा मिळकतींचा शोध घेऊन त्यांच्याकडून व्यावसायिक कर आकारला जाणार आहे.

शहरातील अशा मिळकतींचा शोध घेण्यासाठी सर्वंकष सर्वेक्षण करण्यात येणार आहे त्यामध्ये मे. स्थापत्य कन्सल्टंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या ठेकेदाराने ६१ कोटी रुपये दर सादर केला होता. एकच ठेकेदार पात्र झाल्याने त्याला दर कमी करण्याची सूचना करण्यात आली. त्याने ४७ कोटी ९५ लाख ७० हजार रुपये सुधारित दर सादर केला. त्यानुसार त्यांच्याकडून शहरातील मालमत्तांचा सर्व्हे करण्यासाठी स्थायी समिती बैठकीत मान्यता घेण्यात आली.

# कृषी सहायकावर हल्ला; कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**बीड** : चुकीचे तसेच नियमबाह्य काम करण्यास नकार दिल्यामुळे कृषी सहायक शुभम प्रकाश हेंद्रे यांच्यावर तिघांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेच्या निषेधार्थ राज्यभरात लेखणीबंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य कृषी सहायक संघटना सदस्य, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. आरोपींवर कडक कारवाई करावी, यासाठी बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

कृषी विभागाकडे अपुरे मनुष्यबळ व सुविधांचा अभाव असताना ही कृषी विभागाचे कर्मचारी व अधिकारी क्षेत्रीय स्तवरावर उत्तम कार्य करत आहेत. अशा परिस्थितीत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मारहाण करून मानसिक खच्चीकरण करणाऱ्या अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घातला पाहिजे. असे प्रकार होत राहिले तर कर्मचारी व अधिकाऱ्यांना काम करणे अवघड होईल. त्यामुळे कृषी सहायक हेंद्रे यांना मारहाण करणाऱ्या आरोपींना जामीन मिळू नये, यासाठी पोलिसांनी प्रयत्न करावेत, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली. यावेळी त्यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होत कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवासी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत यांच्यामार्फत निवेदन दिले.

## शुद्धोधन पांडे यांचा दापोलीत सत्कार

**दापोली** : महसूल खात्यात २८ वर्ष सेवा करून संगमेश्वर येथील मंडळ अधिकारी शुद्धोधन राजाराम पांडे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल संगमेश्वरचे तहसीलदार सुहास थोरात यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. महसूल विभागात तलाठी म्हणून दापोलीतून शुद्धोधन पांडे यांनी आपल्या सेवेला सुरुवात केली. सेवेतील २८ वर्षांच्या कालखंडात तब्बल दहा वेळा त्यांना उत्कृष्ट सेवेबद्दल उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मान करण्यात आला होता. मंडळ अधिकारी म्हणून ते संगमेश्वर येथून सेवानिवृत्त झाले.

# सरळसेवा भरतीसाठी हेल्पलाइन कार्यान्वित

**लातूर** : जिल्हा परिषद अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा भरती प्रक्रिया अंतर्गत ४७१ पदे भरण्यात येणार आहेत. लवकरच याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार आहे. सदर सरळसेवा भरती प्रक्रियेच्या माहितीसाठी हेल्पलाइन क्र. ०२३८२- २५८९६९ सुरू करण्यात आला असून, इच्छुकांनी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत कार्यालयीन कामकाजादिवशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे. अधिकाधिक लोकांपर्यंत याबाबतची माहिती मिळावी तसेच शासकीय पद्धतींविषयीदेखील जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी अशाप्रकारचा हा उपक्रम निश्चित उपयुक्त ठरणार आहे.

आरोग्य विभाग व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा सुधारीत आकृतीबंध मंजूर झाल्याने या विभागांतर्गतची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. उर्वरित विभागा अंतर्गतची पदेही शासन निर्देशानुसार ८० टक्क्यांप्रमाणे रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. शासन निर्देशानुसार सन २०१९ मध्ये भरती प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नसल्यामुळे सन २०१९ मधील उमेदवारांना वयामध्ये या भरती मर्यादेत शिथिलता देण्यात आली आहे.

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी द्यावीत

**दाभाडी** : सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी अदा करावी या मागणीचे साकडे शिष्टमंडळातर्फे पालकमंत्री दादा भुसे यांना घालण्यात आले.

मालेगाव तालुक्यात गेल्या तीन वर्षांपासून शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक हे सेवानिवृत्तीच्या सर्व रकमेपासून वंचित आहेत. दरमहा मिळणारी पेन्शनही थकीत आहे. उपदान, अंशराशीकरण, सातव्या वेतन आयोगाचा तिसरा हप्ता आदी रकमा देय असून त्या प्रलंबित आहेत. या प्रश्नी लक्ष घालण्याचे साकडे निंबा निकम यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने पालकमंत्री दादा भुसे यांना घातले. यावेळी भुसे यांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले बांधकाम भवनचे उद्घाटन

**पालघर** : देशातील विविध राज्यांतील बांधकाम विभागांपेक्षा महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग कामामध्ये अग्रस्थानी असल्याचे सार्वजनिक बांधकाम, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ‘बांधकाम भवन’ या नूतन इमारतीचे तसेच रेल्वे फाटक क्र. ४७ अ कोळगांव येथील उड्डाणपुलाचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

सदर कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, सुनील भुसारा, राजेश पाटील, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रेल्वेचे जाळे देशात मोठ्या प्रमाणात पसरले असून रेल्वे वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी रेल्वे फाटक बसविण्यात आले आहे. इतर वाहनांची वाहतूक सुरळीत होण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी उड्डाण पूल बांधण्यात आले. कोळगावातील उड्डाण पुलामुळे वाहतूक कोंडीची समस्या मिटणार आहे. विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी राज्य शासन निधी कमी पडू देणार नाही, असे ते म्हणाले.

# औरंगाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांना ईडीची नोटीस; महापालिका आवास योजना घोटाळ्याचा ठपका

**औरंगाबाद** : महानगरपालिकेच्या पंतप्रधान आवास योजनेच्या निविदेत घोटाळा झाल्याप्रकरणी जिल्हाधिकारी तथा तत्कालीन महापालिका आयुक्त आस्तिककुमार पाण्डेय यांना ईडीने नोटीस बजावली आहे. पाण्डेय यांना ईडीच्या मुंबईतील कार्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. यापूर्वी याच प्रकरणात उपायुक्त अपर्णा थेटे यांचीदेखील चौकशी करण्यात आली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजनेतील ४० हजार घरे बांधण्यासाठी चार हजार कोटी रुपयांच्या बांधकाम निविदा काढण्यात आल्या होत्या. मात्र, निविदा प्रक्रियेत कंपनीकडून घोटाळा करण्यात आल्याचे आरोप आहेत. त्यामुळे या प्रकरणात सुरवातीला पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, पुढे या प्रकरणात ईडीची एन्ट्री झाली. ज्या कंपन्यांना काम मिळाले होते, त्या कंपन्यांशी संबंधित लोकांवर ईडीने एकाचवेळी ९ ठिकाणी छापेमारी केली होती. पुढे या प्रकरणात ईडीने महानगर-पालिकेच्या अधिकाऱ्यांना मुंबई कार्यालयात बोलावून त्यांची चौकशीदेखील केली. आता याच प्रकरणात तत्कालीन महापालिका आयुक्त आस्तिककुमार पाण्डेय यांना ईडीकडून नोटीस बजावण्यात आली आहे. औरंगाबाद महानगर-पालिका हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजनेतील ४० हजार घरे बांधण्यासाठी चार हजार कोटी रुपयांच्या बांधकाम निविदा काढण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेत अनेक कंपन्यांनी सहभाग नोंदवला होता. काही कंपन्यांनी अटींचे पालन न करता फसवणूक करण्याच्या प्रयत्न केल्याचे समोर आले. त्यामुळे अधिक चौकशी केल्यावर यातील समर्थ कन्स्ट्रक्शन, इंडोग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिसेस आणि जग्वार ग्लोबल सर्व्हिसेस या तीन कंपन्यांनी एकाच ‘आयपी’ अ‍ॅड्रेसवरून निविदा भरल्याचे महापालिका आयुक्त अभिजित चौधरी यांच्या लक्षात आले. ईडीने वेगवेगळ्या ९ ठिकाणी छापेमारी केली होती. त्यानंतर काही अधिकाऱ्यांची मुंबईच्या ईडी कार्यालयात चौकशी करण्यात आली. आता तत्कालीन महापालिका आयुक्त आस्तिवकुमार पाण्डेय यांना देखील नोटीस देण्यात आली आहे.

## ३०० कामगारांचा तीन कोटींचा विमा

**बीड** : येथील बीड क्रेडाईच्या वतीने कामगार दिनानिमित्त आरोग्य शिबिर पार पडले. यावेळी क्रेडाईच्या वतीने जवळपास ३०० कामगारांचा एकूण ३ कोटी रुपयांचा अपघात विमा विनामूल्य काढण्यात आला.

सदरील कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कामगार अधिकारी एस.जी. मुंडे उपस्थित होते. व्यासपीठावर बीड क्रेडाईचे अध्यक्ष संतोष जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिरात ३०० पेक्षा अधिक कामगारांनी नोंदणी केली. डॉ. अमोल जोगदंड, डॉ. मनोज मेंगडे, डॉ. भालेराव यांनी कामगारांच्या आरोग्याची मोफत तपासणी केली. कामगार दिनाचे औचित्य साधून घेतलेल्या या मेळाव्यात ३०० कामगारांचा ३ कोटी रुपयांचा अपघात विमा विनामूल्य काढण्यात आला.

# प्रशासनात लघुलेखन लिपीचे महत्त्व :केसरकर

**शिर्डी** : राज्यात अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून टायपिंग इन्स्टिट्यूट कार्यरत आहेत. कालांतराने या संस्थांचे डिजिटल युगात संगणकीकरण झाले. मात्र, आजही प्रशासनात लघुलेखन लिपीचे महत्त्व टिकून आहे, असे मत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केले.

टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांच्या संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन शिर्डी येथे पडले. या अधिवेशनाचे उद्घाटन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. महेश पालकर, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे माजी अशासकीय सदस्य रमेश खानविलकर, अहमदनगर जिल्हा मजूर संघाचे संचालक उत्तमराव घोगरे, सहकारमहर्षी बाबूराव तनपुरे कारखान्याचे चेअरमन नामदेव ढोकणे पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस, संघटनेचे अध्यक्ष प्रकाश कराळे, हेमंत ढमढेरे यांच्यासह राज्य कार्यकारिणीचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रशासनातील लघुलेखन लिपीचे महत्व विशेष आहे. बदलत्या काळातदेखील त्यांचे महत्तव अबाधित राहिले आहे. तंत्रज्ञान कितीही पुढे गेले तरी निश्चितपणे या लिपीचा वापर हा काही कमी होणार नाही उलट त्याची गरज ही भविष्यात उपयोगातच राहणार आहे, असा विचारदेखील यावेळी श्री. केसरकर यांनी आपल्या भाषणातून बोलताना व्यक्त केला.

प्रारंभी संस्थाचालकांचे प्राचार्यपद कायम ठेवणे व किमान वेतन कायदा लागू करू नये, ही आग्रही मागणी करून शासनाकडील १२ मागण्या व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडील १३ मागण्या सादर करण्यात आल्या. संघटनेचे महासचिव हेमंत ढमढेरे यांनी आभार मानले.

यावेळी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते संघटनेची दिनदर्शिका व हिरकणी स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक कराळे यांनी केले.

**राजेंद्र दर्डा यांच्या कार्याचा गौरव**

महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन संस्थांच्या संघटनेच्या हीरकमहोत्सवी ‘हिरकणी’ या विशेषांकात प्रसिद्ध केलेल्या एका लेखात तसेच कार्यक्रमातही तत्कालीन शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

२००८-०९ मध्ये टंकलेखन व्यवसाय डबघाईला आलेला होता. हे लक्षात घेऊन दर्डा यांनी जीसीसी टीबीसी अभ्यासक्रम २०१३ मध्ये मंजूर केला.

## कामगार कल्याणचा १२ लाखांचा लाभ

**यवतमाळ** : कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध योजना राबविल्या जातात. यामध्ये आर्थिक लाभासोबतच साहित्याच्या स्वरूपात मदतीचा हात दिला जातो. येथील जयभारत चौकातील कामगार कल्याण केंद्रातून सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात कामगारांच्या खात्यात विविध योजनाअंतर्गत एकूण १२ लाख रुपये जमा करण्यात आले.

कामगारांच्या पाल्यांसाठी सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजना, क्रीडा शिष्यवृत्ती योजना, उच्चशिक्षण शिष्यवृत्ती, परदेश शिष्यवृत्ती, अपंग शिष्यवृत्ती, एमपीएससी, यूपीएससी शिष्यवृत्ती, पाठ्यपुस्तक साहाय्य योजना, एमएससीआयटी योजना, साहित्य पुस्तक प्रकाशन आणि कामगारांसाठी शिवणयंत्र अनुदान आदी योजना राबविल्या जातात.

## शासनाचा जनहितकारी उपक्रम एकत्रित राबवूया

**इचलकरंजी** : शासकीय योजनांची जत्रा हा जनहितकारी उपक्रम लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने हातात हात घालून राबवूया आणि विकासाची गंगा घरोघरी पोहोचवूया, असे आवाहन खासदार धैर्यशील माने यांनी केले.

राज्य शासनाने सामान्यांच्या हिताच्या योजना घरोघरी पोहोचविण्यासाठी शासकीय योजनांची जत्रा हा उपक्रम सुरू केला आहे, याबाबत महापालिकेत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रशासक सुधाकर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

माने म्हणाले, शासनाचे उद्दिष्ट पूर्ण करत जनतेला योजनांचा लाभ द्यावा. तालुका उद्दिष्टपूर्तीसाठी आम्ही कमी पडणार नाही.

# संचमान्यता अंतिम झाल्यानंतर पवित्र पोर्टल होणार ॲक्टिव्ह

## शिक्षक भरती ऑगस्टमध्ये !

**यवतमाळ** : तब्बल अडीच लाख बेरोजगार उमेदवारांना प्रतीक्षा असलेल्या शिक्षक भरतीचा मुहूर्त येत्या ऑगस्ट महिन्यात निघाला आहे. सध्या कार्यरत शिक्षकांची संचमान्यता १५ मेपर्यंत पूर्ण करून त्यानंतर नव्या शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टल ॲक्टिव्ह करण्याचे नियोजन प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी शालेय शिक्षण विभागाला कळविले आहे. त्यामुळे आता याबाबत लवकरच पुढील नियोजन निश्चित करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

फेब्रुवारी-मार्चमध्ये शिक्षक भरतीसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी घेण्यात आली. २४ मार्च रोजी या परीक्षेतील दोन लाख ४० हजार डी.एड, बी.एड धारकांचा निकालही जाहीर करण्यात आला.

मात्र, दोन महिने उलटूनही शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टलच्या हालचाली नसल्याने उमेदवारांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. याच दरम्यान उमेदवारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यामुळे शासनाला पदभरतीचे वेगवान नियोजन करणे भाग पडले आहे. आता लवकरच याची कारवाई अथवा अंमलबजावणी होईल, याबाबतच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

दरम्यान, प्राथमिक शाळा शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांमधील ज्यांच्या बदल्यांना उच्च न्यायालयाने स्थगिती दिली, अशांना सध्या तरी मूळ शाळेवरून मुक्त करू नका, असा आदेश राज्याच्या ग्रामविकास विभागातील उपसचिव पो. द. देशमुख यांनी सर्व जि. प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिला.त्यामुळे आता शिक्षकांना मोठा दिलासा मिळालेला आहे. मूळ शाळेतून मुक्त करण्याच्या मुद्यांवरून त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त होत होती.

प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांच्या सहाव्या फेरीतील बदल्यांना काही शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यामुळे उच्च न्यायालयाने बदल्यांबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश राज्य सरकारला दिला होता.

त्यानुसार या याचिकांवर जूनच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होणार आहे. वयाच्या सीमारेषा निश्चित करण्यासाठी ३० जून २०२२ अशी डेडलाइन ग्राह्य धरण्यात आल्याने ही नवी समस्या पुढे आली. याशिवाय अतिदुर्गम भागात बदली झालेल्यांमध्ये १५३ शिक्षिकांचा समावेश आहे. त्यामुळे या बदल्यांना स्थगितीची मागणी करत सुमारे २०० शिक्षकांनी कोर्टात आव्हान दिले आहे. या याचिकेच्या सुनावणीकडे आता लक्ष लागलेले आहे.

## पेन्शन जमा न केल्यास साखळी उपोषण करणार

**गोरेगाव** : सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन मागील दोन महिन्यांपासून न झाल्याने या कर्मचाऱ्यांना विविध आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यासंदर्भात वारंवार पाठपुरावा करूनसुध्दा संबंधित विभागाने याची दखल घेतली नसल्यामुळे संतप्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी पंचायत समितीसमोर साखळी उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंब निवृत्तीवेतन हे अद्याप मिळालेले नाही. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन दर महिन्याच्या १ तारखेला झाली पाहिजे, असे शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत. पण, कर्मचाऱ्यांना दोन महिन्यांची पेन्शन मिळाली नाही.

# कळसकर समिती अहवाल; आरटीओ कर्मचाऱ्यांची निदर्शने

**मुंबई** : राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यासाठी ८ मे रोजी दोन तास आंदोलन केले. मुंबईतील परिवहन आयुक्त कार्यालयासह राज्यातील ५० कार्यालयांत सकाळच्या सत्रात उग्र निदर्शनांसह लेखणीबंद आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनात सहभागी कर्मचाऱ्यांनी प्रशासनाच्या एकूण नियोजनशून्य कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

बंधनकारक करण्यात आलेल्या आकृतीबंधाचा प्रस्ताव कर्मचारी संघटनेने प्रशासनास सन २०१६ सादर केला होता. यानंतर आकृतीबंधास शासन-स्तरावर मान्यतेसाठी सलग सहा वर्षे प्रखर लढा द्यावा लागला. अखेर त्यासंबंधीचा शासन निर्णय २३ सप्टेंबर २०२३ रोजी निर्गमित झाला. शासन निर्णय सहा महिन्यांहून अधिक काळ होऊनही आकृत्तीबंध कार्यान्वित होऊन रितसर अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. यामुळे पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती लाभापासून वंचित रहावे लागले असून, संपूर्ण राज्यात कामकाजात सुसूत्रता नसल्याने वारंवार सोमवार ८ मे रोजी मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यभरात आंदोलन करण्यात आले.

# सीप्झचा अविस्मरणीय लढा

युनियनच्या वतीने १९८५ पासून अनेक लढे सुरु झाले. सीप्झ झोनमधील इलेक्ट्रॉनिक उद्योगातील लढ्यामध्ये किमान वेतन व आठ तासांची ड्युटी मिळवून देणे, हे मोठे काम होते.

सरकारने इलेक्ट्रॉनिक उत्पादने बनवून निर्यात करण्यासाठी उद्योगांना खास सवलती दिल्या होत्या. मालक वर्ग कामगारांची पिळवणूक करून अल्प वेतन आणि बारा तास काम देऊन विदेशांनी भारतीयांना जशी वागणूक दिली तशी देत असत. त्या परिसरात ५४ कंपन्यांच्या झोनसाठी डेव्हलपमेंट कमिशनरची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची दादागिरी चालायची. मे. टंडन मॅनेजिंग्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेड हा सर्वात मोठ्या कारखान्याचा मालक श्री. टंडन हा पंजाबी होता. तो कंपन्यांच्या संघटनेचा अध्यक्ष होता. त्याला प्रचंड अहंकार होता. त्याच्या अधिकाऱ्यांमुळे त्यांच्यावर हल्ला झाला होता. त्यामुळे पोलिसांनी संरक्षण दिले होते.

या विभागात पहिली पाळी सकाळी ७ वाजता सुरु व्हायची ती दुपारी ३ वाजता संपायची. दुसरी पाळी दुपारी ३ वाजता सुरु होऊन रात्री ११ वाजेपर्यंत असायची. या कंपन्यांमध्ये महिला कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर होता. या महिला अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण, वसई, विरार या भागातून यायच्या.

सकाळी सहा वाजता ह्या महिला कामगारांना घाटकोपर किंवा अंधेरी स्थानकावरून कंपनीची बस त्यांना अल्प दरात घेऊन यायच्या. एवढ्या लांबून प्रवास करून कामावर यायचे म्हणजे या महिलांना पहाटे ४ वाजता उठून तयारी करावी लागायची. प्रवासात किमान एक तास तरी लागत असे. हजारो महिला या परिसरात काम करायच्या. त्यांना संघटना बनविण्यास मनाई होती. तरी महिला कामगार त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरोधात एकजूट झाल्या आणि त्यांनी संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले. संघटनेच्या वतीने या महिला कामगारांच्या अनेक तक्रारी घेण्यात आल्या. त्यांचे आंदोलन चिरडण्यासाठी कामगार व गृह राज्यमंत्री विलास सावंत यांना सिप्झच्या ग्रुप्स द्वारा कामगारांच्या भेटीसाठी संघटनेच्या वतीने आमंत्रण आले. त्यांना कामगारांच्या व्यथा समजत होत्या. त्यांना विशेष सहानुभूती होती. मंत्री होण्याच्या अगोदर ते युवक काँग्रेसमध्ये काम करत होते. त्यामुळे त्यांनी सरकारच्या वतीने या प्रश्नावर त्यांनी समिती नेमली. समितीला अहवाल सादर करण्यास सांगितले.

समितीमध्ये विजय कांबळे यांना घेण्यात आले. कमिटीने कामगारांना किमान वेतन जाहीर केले. हा संघटनेचा फार मोठा विजय होता.

सिप्झचा लढा जिंकल्यानंतर विजय कांबळे आणि श्रमिक उत्कर्ष सभेचा बोलबाला झाला. त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी मिळत गेली. कामगारांचा ओढा संघटनेच्या कार्यालयाकडे वाढू लागला. अनेक नवे कारखाने जोडले गेले. तारापूर येथील अनेक कारखाने संघटनेकडे आले. सुरुवातीच्या काळात कामाचा ताण वाढला होता. रात्री ११ वाजेपर्यंत काम चालायचे. व्यवस्थापनाबरोबर चर्चा करण्यासाठी विजय कांबळे, कृष्णा मोकल यांच्याबरोबर मी देखील जाऊ लागलो. त्यावेळी रात्री उशीरापर्यंत चर्चादेखील होत असत. श्री. मोकल हे अभ्यासू होते तसेच त्यांना दांडगा अनुभवदेखील होता. व्यवस्थापनाशी चर्चा करून

**अनिल गणाचार्य**
यांच्या आठवणीतून भाग १

कामगारांचे प्रश्न कसे सोडवायचे, याचे कसब त्यांच्याकडे होते. कायद्याचा सखोल अभ्यास होता.

विजय कांबळे हे तापट स्वभावाचे होते. व्यवस्थापनाला दमात घेऊन त्यांच्यावर दबाव करत. त्यामुळे कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूकदेखील होत असे. अशावेळेस तरी तणावाच्या माणसाशी ते मैत्रीने वागत. तरीही त्यांच्या स्वभावात असलेला कर्मचारी वर्ग किंवा कामगार हा त्यांना थोडा वचकून असायचा.

विजय कांबळे आणि कृष्णा मोकल ही राम-लक्ष्मणाची जोडीच होती. कांबळे दम देऊन तर मोकल गोड बोलून काम करत. श्रमिक उत्कर्ष सभा या संघटनेतील कामात मला त्यांना कडू अनुभव येत गेले. द्वारसभा घेताना मला श्री. कांबळे विचारात घेत नसत. त्यामुळे काम करताना फार मोठी अडचण होत असायची.

हा अस्वस्थ करणारा अनुभव आल्यानंतर ३० सप्टेंबर १९८९ रोजी त्यांनी श्रमिकमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

श्रमिक उत्कर्ष सभेत पुन्हा त्यांचा प्रवेश झाला तो २००० साली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गोविंदराव आदिक यांच्या सहीने नियुक्ती झाली. त्यानंतर कृष्णा मोकल यांच्या आग्रहाने त्यांनी पुन्हा श्रमिक उत्कर्ष सभेचे कामकाज बघायला सुरुवात केली. त्यानंतर मोठ्या हुशारीने कामाला सुरुवात झाली. ग्रांड स्टील, एशियन पेंट्स, एमआयसी क्लब, प्रेस मेटल, फोरमेकेम, ऑक्सकॉन्स, ग्रिफॉन लॅबोरेटरी, मुंबई ग्राहक पंचायत, हाफकिन इन्स्टिट्यूट, वाडेर गिमयाना, कॅडिट्स इंडिया, रत्न ऑटोक्स, नॅशनल गॅरेज, तारापूर येथील अनेक कंपन्या, कोल्हापूर येथील फाईव्ह स्टार इंडस्ट्रीयल इस्टेट, कागल, तळोजा येथील अनेक कंपन्यांची कामे आली. श्रुत्या कामगारांचे प्रश्न सोडविणे, संघटन वाढविणे, हे काम अत्यावश्यक सुरू होते.

श्रमिक उत्कर्ष सभेचे सेक्रेटरी पद सांभाळत असतानाच २००१ साली गाजलेले आंदोलन म्हणजे गोदरेज कंपनीत केलेले कंत्राटी कामगारांचे आंदोलन. यात ८५० कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली. अनेकांना कारावास भोगावा लागला होता. यात कामगारांचे प्रभारी कमिटी पदाधिकारी संदीप पाटील (सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी), बापू काळे, अनंत धुरी, अरविंद बोरीचा, प्रकाश गांधी, संतोष नाईक, जगदीश गोळे, नितिन परब, प्रमोद गावडे यांचा सक्रीय सहभाग होता. कोल्हापूर येथील मे. ओसवाल एफ. एम. हॅमरल टेक्सटाईल लि. या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील कापड बनविणाऱ्या कंपनीतील कारखान्याच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व सोयी सवलतीचा करार ११ मे २०१० मध्ये केला.

त्यानंतर अंधेरी येथील सीप्झ झोनमधील कामगारांनी किमान वेतन मिळवून देण्यासाठी केलेले आंदोलनदेखील फार महत्वाचे होते. हे देखील लक्षात राहण्यासारखेच होते.

राष्ट्रीय मालाडी वाहतूक आणि जनरल श्रमिक उत्कर्ष सभा या माथाडी संघटनेची स्थापना करण्यात आली. वाडी येथील एमआयसी क्लब येथे झालेल्या कार्यक्रमात संघटनेच्या कार्याध्यक्षपदी माझी निवड करण्यात आली.

माथाडी क्षेत्रात १२ संघटना असून कामगारांचे प्रश्न सुटत नाहीत, महाराष्ट्र शासनाच्या विविध मंडळातून माथाडींच्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही, म्हणून ही संघटना स्थापन करण्यात आली असून तिच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करण्याचा निर्णय घेऊन व्यक्त केला. संघटनेची स्थापना शरद पवार यांच्या ७२व्या वाढदिवशी म्हणजे १२-१२-२०१२ रोजी झाली.

(पुढील अंकात गोदरेज कामगारांचा भव्य लढा)

# वरळीकरांची ससेहोलपट कधी थांबणार ?



वरळी येथील पोदार वैद्यकीय महाविद्यालयातील एक २२ वर्षीय विद्यार्थी २५ एप्रिल, २०२३ रोजी रुग्णालयाच्या आवारातील झाडावरून पडून गंभीर जखमी झाला, त्याला अत्यावश्यक असलेले वैद्यकीय उपचार वेळेवर न मिळाल्यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. तत्पूर्वी नोव्हेंबर, २०२१ मध्ये वरळी बी.डी.डी. चाळ परिसरातील वेगवेगळ्या चाळी या कामगार वस्तीमध्ये झालेल्या घरगुती गॅस सिलिंडरच्या स्फोटात चार महिन्यांच्या बालकासह एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघातानंतर जखमी कुटुंबाला वेळीच उपचार न मिळाल्यामुळे ही दुर्दैवी व हृदयद्रावक घटना घडली. या कोवळ्या बालकाचा मृत्यू माणुसकीला काळीमा फासणारा आणि शासन-प्रशासन तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींची असंवेदनशीलता व अनास्था स्पष्ट करणारी आहे.

आज सर्वत्र विविध आजारांनी ग्रासलेले आहे. यात हृदयविकार आणि तत्सम घातक अशा अन्य आजारांचा समावेश आहे. अशा आजारांमध्ये तातडीच्या व अत्याधुनिक वैद्यकीय उपचार करण्याची आवश्यकता असते.

ऐतिहासिक संदर्भ असलेल्या जुन्या बी.डी.डी. व अन्य चाळी आणि झोपडपट्ट्या असलेल्या मुंबईतील वरळी विभागात कामगार आणि मध्यमवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणावर राहतात. वरळीकरांना वैद्यकीय उपचारांसाठी वरळीतील पोदार रुग्णालय; परळ येथील के.ई.एम. रुग्णालय किंवा मुंबई सेंट्रल येथील नायर रुग्णालयात न्यावे लागते. तथापि, पोदार रुग्णालयात अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि सुविधा नसल्यामुळे, सदर रुग्णाला नायर किंवा के.ई.एम रुग्णालयात नेण्याचा सल्ला तेथील डॉक्टर देतात. ही दोन्ही रुग्णालये दूर, तसेच नेहमीच वाहतुकीची कोंडी असलेल्या विभागात असल्यामुळे, रुग्णालयात नेण्यापूर्वीच वाटेत किंवा वेळेवर पोहचू न शकल्यामुळे रुग्णालयात त्या अत्यवस्थ रुग्णाचा मृत्यू होतो, हे विदारक सत्य आहे.

इंग्रज १९४७ साली देश सोडून गेले, तेव्हा त्यांनी मुंबईकरांसाठी बांधलेली शासकीय रुग्णालये आजही रुग्णसेवेत कार्यरत आहेत. मात्र, स्वातंत्र्यानंतर किती नव्या शासकीय रुग्णालयाची यात भर पडली आहे, हा संशोधनाचा विषय होऊ शकतो. त्यावेळी मुंबई भौगोलिकदृष्ट्या फक्त सायन आणि माहिमपर्यंत मर्यादित होती आणि लोकसंख्या सुमारे दोन-अडीच लाखांच्या आसपास होती. आता, पनवेल, कल्याण आणि विरारपर्यंत मुंबई विस्तारली असून, लोकसंख्या जवळपास सव्वा कोटी इतकी आहे.

वरळीतील नागरिकांच्या जीवाशी होत असलेली हेळसांड थांबवण्यासाठी, अत्यवस्थ रुग्णांना पोदार रुग्णालयात तातडीच्या व अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी वरळी बी.डी.डी. चाळ क्र. १ मधील शांती वैभव बुध्द विहार, नवतरुण क्रीडा मंडळ व माता रमाई महिला प्रेरणा मंडळ या संस्थेच्या वतीने गेली चार वर्षे शासन-प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे निवेदने देऊन पाठपुरावा केला जात आहे. वरळीत जनजागृती मार्च; पोदार रुग्णालयाच्या आवारात निदर्शने; सह्यांची मोहिम तसेच महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशन-प्रसंगी वरळी ते विधानभवन अशी मूक पदयात्रा काढून विविध प्रकारे शासन-प्रशासनाचे लक्ष वेधण्याचाही याद्वारे प्रयत्न केला. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. वरळीकरांच्या जीवन-मरणाशी संबंधित ही समस्या गंभीर असून, विचार करून पोदार रुग्णालयात अत्यावश्यक व अत्याधुनिक वैद्यकीय उपचार होतील, अशी व्यवस्था उपलब्ध व्हावी आणि वरळीकरांची ससेहोलपट थांबावी हीच अपेक्षा.

**- रजनीश कांबळे**

# मंत्रालय उपाहारगृहामध्ये उत्कृष्ट सेवा बजावणारे

## कोरोना योद्धा



परशुराम सितप

मागील अंकात आपण मंत्रालयातील उपाहारगृहामध्ये घराप्रमाणे सेवा देणारे शिवाजी आव्हाड यांची माहिती वाचली. या अंकात आपण परशुराम गंगाराम सितप यांची माहिती देत आहोत. सध्या ते मंत्रालय येथील उपाहारगृहामध्ये कूपन विक्रेता या पदावर काम करीत आहेत. त्यांच्या आतापर्यंतच्या या वाटचालीत त्यांनी केलेला संघर्ष आपल्याला दिसून येतो.

परशुराम सितप यांनी १ एप्रिल, १९७९ रोजी पगार ३/- रुपये रोज पासून मंत्रालयातील उपाहारगृहामध्ये कामाला सुरुवात केली. तो काळ अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा होता. सुरुवातीच्या काळात त्यांनी बॉय वेटर पदावर काम करण्यास प्रारंभ केला. त्यावेळी त्यांना खूप हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. ते कामावर रुजू झाले. त्यानंतर आपल्या कामावर निष्ठा ठेवत त्यांनी गेल्या ४४ वर्षांच्या सेवेत अनेक मुख्यमंत्री व अनेक मुख्य सचिवांना सेवा दिली आहे. सितप यांचा त्यांच्या सव्वेतील अनुभवदेखील अविस्मरणीय ठरला आहे.

विशेष म्हणजे कोरोना काळात लॉकडाऊन ज्या दिवशी सुरू झाले त्या २३ मार्च ते ६ जून २०२० कालावधीत त्यांनी मंत्रालयातील कॅन्टीनमध्ये वास्तव्य केले नियंत्रणकक्ष, मुख्य सचिव तसेच अन्य सचिव यांना डाळभात, भाजी, चहा बिस्कीटे वेळी पोहचवली. तीन कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन उपाहारगृह व्यवस्थित चालविले. या कालावधीत त्यांनी एकही सुट्टी घेतली नाही. हे त्यांचे विशेष म्हणता येईल.

नोंद

या काळात त्यांनी दिलेल्या सेवेबद्दल त्यांना मंत्रालयात कोरोना योद्धा म्हणून घोषित करून त्यांचा सत्कार करण्यात आला. मंत्रालयातील सुमारे ११ महाव्यवस्थापकांच्या हाताखाली त्यांनी काम केले आहे. त्यांचे सहकारी त्यांच्या भरवशावर उपाहारगृह सोडून जातात. कुणालाही हवा हवासा वाटणारा हा कामगार आहे.

परशुराम गंगाराम सितप यांचा जन्म २५ सप्टेंबर १९६३ रोजी मुंबईत झाला. वडील रेल्वेमध्ये नोकरीला होते. त्यांना दोन भाऊ, एक बहिण पण लहानपणीच आईवडिलांचा मृत्यू झाला. त्यामुळे गरीबी नशिबी आली. शिक्षण घ्यावयाची इच्छा असूनसुद्धा शिक्षण घेता आले नाही. माहीम येथील शितलादेवी मंदिराच्या मागे व सारस्वत कॉलनीच्या बाजूला असलेल्या झोपडपट्टीमध्ये त्यांचे आयुष्य गेले. भावाला वडिलांच्या जागेवर नोकरी मिळाली. शिक्षण नसल्यामुळे सितप यांच्या नोकरीचा प्रश्न होता. शेवटी त्यांचा चुलत भाऊ गणपत हरी सितप, जो मंत्रालयात बांधकाम विभागात होता, त्यांनी १ एप्रिल, १९७९ रोजी मंत्रालयात त्यांना बॉय वेटर म्हणून कामाला लावले. १९८४ साली ते कायम झाले. आतापर्यंत बॉय वेटर, वेटर, पर्यवेक्षक, सुपरवायझर आणि आता कूपन विक्रेता या पदावर त्यांनी अत्यंत निष्ठेने काम केले.

आज ते जवळ जवळ ६० वर्षांचे झाले आहेत. पण त्यांच्या चेहऱ्यावरील एकही रेषा पिकलेला दिसत नाही. सितप यांनी ते अविवाहित असल्याचे हसतमुखाने सांगितले. तसेच लग्नाचा विचार कधीच मनात आला नसल्याचे सांगतात. सकाळी ७ ते रात्री ७:३० 'मंत्रालय उपाहारगृह हेच माझे घर आहे' असे ते आवर्जून नमूद करतात. घराप्रमाणे त्यांनी सेवेवर प्रेम केले. सितप यांनी दाखवलेली कामाबद्दलची आस्था, निष्ठा इतरांनादेखील आदर्शवादी आहे, सेवानिवृत्ती नंतर काय असे विचारले असता, माझी बहिण अविवाहित आहे. आम्ही दोघे भाऊ बहिण मिळून-मिसळून राहू, एकमेकांना सांभाळू, असे सितप म्हणाले. अशा सेवा तत्पर कर्मचाऱ्याला त्यांच्या भावी आयुष्यासाठी मनापासून शुभेच्छा.

**- नासिकेत पानसरे**
**९९३०९९८९७८**

# महिला मुख्य सचिव का नाही ?

महाराष्ट्राला आपण संतांची भूमी म्हणतो. संतांनी या भूमीत समतेचे बीज पेरले. ही समाजसुधारकांचीही भूमी आहे. शाहू, फुले आणि आंबेडकरांचे नाव घेऊनच येथील धोरणे ठरतात. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र नेहमीच पुरोगामी मानला जातो. इतर राज्ये महाराष्ट्राचा आदर्श समोर ठेऊन वाटचाल करताना दिसतात. सावित्रीबाई फुले यांनी येथे स्त्री शिक्षणाचा पाया घातला. समाजाचा रोष पत्करून, प्रसंगी शेण, माती अंगावर झेलून महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. आजही राज्यातील महिला स्वतःला 'सावित्रीच्या लेकी' म्हणवतात. काळाच्या पुढे पाहणाऱ्या सावित्रीबाईंच्या महाराष्ट्रात यावेळी तरी प्रशासनातील सर्वोच्च पद मिळण्याची अपेक्षा होती; पण ती फोल ठरली आहे. आजतागायत एकाही महिलेला प्रशासनातील सर्वोच्च पद मिळालेले नाही. महिलांची सर्व क्षेत्रातील वाटचाल दमदारपणे सुरू असताना, राज्यात महिलेला मुख्य सचिवपद मात्र मिळालेले नाही, याचा विषाद वाटतो.

नुकतीच मनोज सौनिक यांची राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती झाली. एका कर्तबगार अधिकाऱ्याची निवड झाल्याचा आनंद आहेच; पण त्याबरोबर यावेळीही सेवाज्येष्ठता असूनही सुजाता सौनिक यांना डावलण्यात आले आहे. सुजाता सौनिक या १९८७च्या तुकडीच्या सेवाज्येष्ठ अधिकारी आहेत. त्यांना आणि दुसऱ्या क्रमांकावर अश्विनीकुमार यांना डावलण्यात आले. प्रशासन सेवेतील ज्येष्ठ अधिकाऱ्याला हा मान मिळतो. मुख्य सचिवांची नियुक्ती होते, तेव्हा त्याला बरेच राजकीय कंगोरे असतात; पहिल्या तीन अधिकाऱ्यांच्या नावाची चर्चा होत असली, तरी प्रसंगी सातव्या क्रमांकावर असलेल्या अधिकाऱ्याचीही निवड होऊ शकते. यंदा सेवाज्येष्ठतेच्या यादीत वरच्या क्रमांकावरील अधिकारी होत्या १९८७च्या तुकडीतील अधिकारी सुजाता सौनिक. त्या मुख्य सचिव होणे अपेक्षित होते. त्यांची नियुक्ती झाली असती, तर २०२५ पर्यंतच्या कालावधी त्यांना मिळू शकला असता; शिवाय पहिल्या महिला मुख्य सचिव होण्याचा बहुमानही मिळाला असता. मनोज सौनिक यांना केवळ आठ महिन्यांचा कालावधी मिळणार आहे.

भारतीय प्रशासन सेवेचे नेहमीच आकर्षण राहिले आहे. लोकसेवा आयोगाच्या या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी खडतर साधना करावी लागते. लाखो उमेदवार या परीक्षेला बसतात, तेव्हा त्यांपैकी ३०० ते ४०० उमेदवारांना 'आयएस' होऊन प्रशासकीय सेवेत जाण्याची संधी मिळते. बाकी उमेदवारांना पोलिस प्रशासन, पोस्ट, माहिती, वन, महसूल अशा खात्यांत नियुक्ती मिळते. या परीक्षेनंतर दोन वर्षांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. साहजिकच, या उमेदवारांना प्रशासनात उच्च पदावर काम करण्याची संधी मिळते; पण पदनियुक्तीमध्ये अनेकदा तरतम भेद केला जातो. मागे वळून बघता, या नियुक्त्यांमध्ये पुरोगामी महाराष्ट्राला न शोभणाऱ्या, समानतेला हरताळ फासणाऱ्या अनेक घटना घडलेल्या दिसतील. या पूर्वीही अनेकदा राज्यात महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती करताना महिलांना डावलले गेले आहे. चित्कला झुत्शी या कर्तबगार अधिकारी ज्येष्ठतेमध्ये प्रथम क्रमांकावर होत्या. त्यांना डावलून जॉनी जोसेफ यांना मुख्य सचिवपद देण्यात आले होते. त्यावेळी जोसेफ हे मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव होते. झुत्शी यांची नाराजी दूर करण्यासाठी, त्यांना गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिवपद देण्यात आले होते. त्यानंतर अत्यंत कर्तबगार आणि धाडसी चंद्रा अय्यंगार या नक्कीच मुख्य सचिव होणार असे वाटत असताना, त्यावेळी तुलनेने मवाळ असणारे जे. पी. डांगे यांना हे पद बहाल करण्यात आले. चंद्रा अय्यंगार कर्तृत्ववान अधिकारी होत्या. शरद पवार मुख्यमंत्रिपदाच्या काळात देशातील पहिले महिला धोरण तयार करण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्यानंतर देशभरात या धोरणाची चांगली चर्चा झाली. अय्यंगार यांचे माध्यमांत कौतुकही झाले. त्यानंतरही मुख्य सचिव पदासाठी त्यांना डावलले गेले, तेव्हा त्यावर चर्चा झाल्याशिवाय राहिली नाही. तसेच याबाबत संबंधित स्तरावर यापुढील काळात विचार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त झाली.

मेधा गाडगीळ या सरळमार्गी अधिकाऱ्याला डावलून हे पद संजयकुमार यांना देण्यात आले. मेधा गाडगीळ यांचे पती अनंत गाडगीळ तेव्हा काँग्रेसचे आमदार होते, हे वरकरणी कारण देण्यात आले. प्रत्यक्षात अनंत गाडगीळ यांचा त्यांच्या कामात कधीही हस्तक्षेप दिसला नाही. वंदना कृष्णा यांनाही हे पद नाकारण्यात आले. त्या वेळी देवाशिष चक्रवर्ती यांना केवळ चार महिन्यांसाठी मुख्य सचिव करण्यात आले. सरकारी नोकऱ्यांत महिलांसाठी ३३ तर स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये ५० टक्के राखीव जागा देणाऱ्या महाराष्ट्रात, आजतागायत एकही महिला प्रशासनातील सर्वोच्च पदी जाऊ शकलेली नाही. सेवाज्येष्ठता आणि कर्तृत्व असूनही, केवळ महिला असल्याने, हक्काच्या पदापासून तिला दूर ठेवण्यात आले. दुर्दैवाने, या विषयाची फारशी चर्चा होत नाही. महिला अधिकाऱ्यांनीही यावर आवाज उठवलेला नाही, की महिला संघटनांनी याबाबत चर्चा केल्याचे ऐकिवात नाही. दिवंगत ज्येष्ठ सनदी अधिकारी नीला सत्यनारायण यांनी एकदा जाहीरपणे म्हटले होते, की महिलांना बालकल्याण, अल्पसंख्याक कल्याण, एड्स नियंत्रण, क्रीडा, युवक कल्याण किंवा तुलनेने कमी महत्त्वाची खाती दिली जातात. या वक्तव्यानंतर महिला सचिवांना महत्त्वाची पदे दिली गेली. महसूल, गृह, नगरविकास अशी महत्त्वाची खाती महिला अधिकाऱ्यांना मिळाली, त्यानंतर या पदांवरून महिला सचिवांनी आपली कर्तबगारी अनेक वेळा खणखणीतपणे सिद्ध केली आहे.

तरीही महिला मुख्य सचिव पदापासून दूर का? महिला राज्यकर्त्यांना गैरसोयीच्या वाटत असाव्यात, की हव्या त्या गोष्टी करून घेण्यासाठी त्या अडचणीच्या ठरतील, अशी भीती वाटत असावी? एकूणच प्रक्रियेत महिलांना डावलण्याचा प्रवाह राजकारणातही दिसतो. राज्यात अजूनही महिला मुख्यमंत्री नाही. मंत्रीमंडळात आज एकही महिला मंत्री नाही. यापूर्वी फार तर एका वेळी, जास्तीत जास्त तीन महिलांना मंत्रीमंडळात स्थान मिळाल्याचे दिसते. शालिनीताई पाटील यांना अल्प काळासाठी महसूलमंत्रिपद देण्यात आले होते, तर प्रतिभाताई पाटील यांना समाज कल्याण, अन्न, नागरी पुरवठा ही खाती मिळाली होती. पुष्पाताई हिरे आणि डॉ. विमल मुंदडा आरोग्य मंत्री होत्या. प्रशासनातच महिलांवर अन्याय होत असेल, तर दाद कुणाकडे मागायची? पावसाने झोडपले आणि सरकारने मारले तर काय करणार, म्हणून गप्प बसायचे? मला वाटते महिला अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि माध्यमांतून यावर चर्चा व्हावी.

**- श्रद्धा बेलसरे खारकर**
**(निवृत्त माहिती संचालक)**

* संपादक : एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण * कार्यकारी संपादक : अशोक रामचंद्र शिंदे प्रकाशक-मुद्रक : श्री. एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण यांनी कर्मचारी टाइम्स हे मासिक राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीअल इस्टेट, केशवराव खाडये मार्ग, जेकब सर्कल, मुंबई ४०००११ येथे छापून राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले. शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त. * संपर्क संपादकीय : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६, जाहिरात : ९८९०९१६५८८, ९६०३५७९६६२ वितरण : ९८९०९१६५८८, ९६०३५७९६६२ ईमेल : karmacharitimes@gmail.com वेबसाईट : www.karmacharitimes.com * सर्व कायदेशीर बाबी मुंबई न्यायालयाच्या कक्षेत * (प्रेरणास्थान : आदरणीय कै. र. ग. कर्णिक, संस्थापक : भाऊसाहेब पठाण)

Editor : M.M. Alias Bhausaheb Pathan Executive Editor : Ashok Ramchandra Shinde Publisher Printer : Shri. M.M. Alias Bhausaheb Pathan printed the magazine 'Karmachari Times' for State Government Group D (Class IV) Employees Central Federation at Plascote Industries, 23 Municipal Industrial Estate, Keshavrao Khadye Marg, Jacob Circle, Mumbai 400011. State Government Group D (Class IV) Employees Central Federation, 9, New Administration Building, Ground Floor, Madam Cama Marg, Opposite Mantralaya, Mumbai 400032. Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India. + Contact- Editorial : 9890916588, 9821374626 + Advertisement : 9890916588, 9603579662 + Distribution : 9890916588, 9603579662
E-mail : karmacharitimes@gmail.com Website : www.karmacharitimes.com + All Legal matter subject to Mumbai Jurisdiction